
# ऐकणे ( कविता )

– चं. प्र. देशपांडे.



ऐकणे

मी काही जादूगार नाही
पुष्कळ असतील माझ्यासारखे
मला काढता येते रिबन तोंडातून
रंग बदलत बाहेर येत राहणारी

सगळेच म्हणतात कधी ना कधी
की म्हणे मला त्यांचे
काही ऐकूच नाही येत
मी त्यांना सांगतो माझा विचित्र प्रॉब्लेम
मी बसून राहिलो एका ठिकाणी
की मला कष्ट पडतात
आणि जेव्हा मी ऐकतो
घराबाहेर पडत
माझ्यातला निर्जल प्रवाह
तेव्हा मला
काहीच नाही कष्ट पडत
यावर ते हसतात एक तर
त्यांना ही गंमत वाटते किंवा विकृती

मला माहीत असते अनुभवाने ते जेव्हा
कामात आहे म्हणतात तेव्हा
खरे तर ते थांबलेलेच असतात
आरामात असताना तर मनाच्या
भारंभार कामाने ते थकत असतात

त्यांना वाटते ऐकणे म्हणजे
सहानुभूती वा वाद वा प्रेम वा क्रोध
पण कुणीच काहीच बोलत नसतानाचे
मूक ऐकणे त्यांच्या गावीही नसते

मी तर माझाच काय त्यांचाही
एकाकीपणा ऐकतो आवाजहीन पण क्रूर
--- ००० ---

आवाज

आपण दोन आहोत म्हणजे
तत्त्वत: शत्रूच आहोत
पण तसे नाहीय
इतक्या वस्तू असायची
खरे तर गरजच नव्हती जगात
आणि त्याही अमूकच अशाच

माझ्या समजा असत्या
डरकाळ्या फोडणाऱ्या
तर आकार आणि आवाज
यांचे अंदाजच नसते आले

माझा आवाज माझ्या आकाराशी
जुळणारा आहे मी सुंदर असणार बहुतेक
--- ००० ---

## लाठी

माझे टेबल खुर्ची
असतात माझी साधने
आणि माझे डोके असते
माझी कंट्रोलरूम

उगवत्या सूर्यापासून
कोव्हिड प्रसारापर्यंत
मला काहीच नाही पटत
सगळे दुरुस्त करायची
काही तर नष्टच करायची
गरज वाटते मला रक्तहीन

माझ्या डोक्यातून
मी बाहेर सोडलेली माकडे
कधी कधी मलाच विचारतात
त्यांना हवेय तसे त्यांनी केलेय कंट्रोल
तर तू का करत बसतोस ट्रोलिंग

माझ्याकडे उत्तरे नसतात
पण मी अपमान नाही विसरत

मीच मान्यता दिलेली आहे
माझी त्वचा सोलायला
हा विषयच नको असतो मला
पावसातल्या चर्चेला

ही पद्धत जर जगभर
मान्यताप्राप्त असेल तर
शुद्ध न्यायाचे म्हणून
करू द्या मला
हवी तशी नासधूस
नुसतेच जिसकी लाठी उसकी भैंस असे नको
--- ००० ---

बंद नाक

दोन मुख्य वाटतात प्रकार
मनाचे पण हे सुलट हे उलट
असे म्हणून काहीच नाही पोचणार

हा काही एखादा समारंभ नव्हे
की बाबा पटो न पटो
होऊ शकतात गप्पा

मला हे विचित्र शोध लागतात
कारण माझे प्रयोग उदाहरणार्थ मनाने
खोलता येईल का बंद नाक

एकदा तर एखादे
झाड ऊन्मळून पडावे
तसे विसरलो होतो आयुष्यच

हवे तसे खेळा हवेत
अशा चालण्याच्या शोधात
मला कळते

मी कुठे जात वा येत नाहीच
मी म्हणजे मुख्यत: मनच
माझ्या ऐवजी कुठे काय असते

उलट शोध चालू राहणेच चुकीचे असते
मन उलटे  झाले की ते घडते
शोध थांबतो आणि नाक खुले होते
--- ००० ---

फोटो

नुसतेच अघळपघळ काही नाही
दिसतोय ना वेगळा जरा विचित्र क्षण
पटकन करा क्लिक
नंतर तो तुमच्या डोक्यात
बरोब्बर साधेल संधान

जरा धक्कादायक
उच्च रक्तदाब असल्याप्रमाणे
मुद्दाम शांत राहण्यापेक्षा
होऊनच जाऊ द्या ना एकदा
अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि हल्ली
सगळेच आहेत तत्त्वशील उद्देशिकेच्या
कडेकडेने सावलीतून घरी पोचणारे

आपण सगळेच जाणतो
मांजर तुम्ही मारले तर
ते पाप असते आमच्या हातून
मुळात घडतच नाही असे काही
सोन्याची मांजरे आणि लाल तोंडांची माकडे
म्हणजे काय ते सर्वच
ओळखून असतात हॉटेलमालक
काही टक्के रक्कम त्यांनी
बुडित धरलेलीच असते
महागाईत हीच असे नाही
अनेक प्रकारची फीगिरी
गृहीत असते तुम्हीच सांगा
प्रोटेक्षन मनी म्हणजेच
रक्षणखर्च लागणारच ना
वॉचमननेच चोरी करण्यापेक्षा
ते कधीही चांगले आणि खात्रिशीर

एवढे समजून काढा फोटो म्हणजे झाले
--- ००० ---

ब्रांड

४२ टाईट होतो आणि ४४ लूज होतो
माझ्यासारख्या ४३ ला मान्यताच नाहीय
या ब्रांडेड जगात
मला त्याची खंतच नसल्याने
माझी अभिव्यक्ती
नगण्य ठरवून
मला बहिष्कृत करून
मला धडा शिकवण्याचा
या जगाचा डाव
फेल जाणार आहे

तुम्ही ब्रांड असे काढणार
की मी त्यात बसूच नये
आणि वर माझीच करणार प्रसिद्धी
की तो ब्रांडेड शर्ट नाही वापरत

आता मला कुठे
एखाद्या मुलाखतीला जायचेय
थोडेच की एखादी
पोरगी पटवायचीय
माझ्या प्रत्येक
यशाच्या मागे
उभी राहण्यासाठी

मी स्वत:च पळत नाहीय
यशाच्या मागे उलट
मी जिथे जो जसा आहे
त्यातूनच सुटतोय क्षणोक्षणी

माझा ब्रांडच नकोय मला व्हायला
सतत कुठेतरी पोचू पाहणारा
मी येणारच नाहीय त्या अपेक्षित जगात
--- ००० ---

माणुसकी

अनुभव माहिती झाला
की तो असंख्य अनुभवांसारखाच
एक तुकडा बनतो
आणि तुकड्यातुकड्यांचेच
असते जगणे हे मान्य करून
तो मान्य करतो
त्याच्या त्याच्या आणि त्याच्या आणि इतरांच्या
तुकड्यांतले संघर्ष

समाधानासाठी तो शुद्ध पाणी पितो
आणि माणुसकीने वागले की झाले
असे म्हणत दुर्लक्ष करतो रक्त आणि जखमांकडे
--- ००० ---

झापड

जगाचीच काय देशाची
आणि घराचीही त्याला
व्यवस्था लावायची होती
त्यासाठी आधी इस्त्री घेतली
पण आधी ती दुरुस्त करायला  हवी होती
कारण शॉक बसत होता
म्हणून तो गेला तेलाच्या घाण्याकडे
तर तिथे एक झापडबंद बैल
गोल गोल फिरत होता
इतक्या लांब आपण कोणत्या
गावाला चाललोय या विचारात
तेवढ्यात रुबाब दाखवण्यासाठी
तेलवाल्याने लगावली त्याला एक झापड
मी काय केले मी काय केले
असे थोडा वेळ तोंडाने आणि मग मनात
म्हणत राहिला तो कार्यमग्न

व्यवस्था लावणे ( वा बदलणे )
सोपे नव्हते प्रत्येकाचा प्रवास
सतत चालू होता दूरवर
आणि ना थांबणे शक्य होते
ना संवाद साधणे ना

वगैरे
म्हणून मग
इस्त्री झाली का तयार
ते विचारले
तर पुन्हा त्याने
झापडसदृश
हात उगारला

नकोच ते काही म्हणून तो घरी आला
तर त्याच्यामुळेच कसे सगळ्यांचे
नुकसान झालेय हा विषय धगधगत होता
मला भूक नाहीय असे म्हणून
सरळ त्याने दिली ताणून
--- ००० ---

## शौर्य

गेले निभावून तेवढे बास झाले
आता नको धोका आणि मुख्य म्हणजे
दारू बंद झालीय
त्यामुळे ती कॅप्चर करणारी
उष्णताही कंट्रोल झालीय

मेघना म्हणाली होती की पुरुष
पाहता क्षणी आहे रे आणि नाही रे
यांत विभागणी करतात स्त्रियांची
ते खरेच असले तरी आभासी जगात
खोटेही आहे फक्त स्त्रीचे मन हवे

आता पुन्हा भीतीचा नको अनुभव
हे हवेच या शौर्यासाठी
--- ००० ---

उल्कापात

अपराधभावच नसेल डोक्यात
तर मिटलेच की मग
अंतराळ संशोधनाचे प्रश्न

लोक म्हणतात उल्कापात बघा
आणि तो प्रत्येक वेळी राहून जातो

मुंबईत मटण म्हणून
कुत्र्याचे मास विकतात म्हणे
तीही साली फुकटात पकडलेली
भटकी कुत्री असतील
तुमच्या आमच्या भटक्या विचारांसारखी

विश्वामित्रानेच खाल्ले होते ना
कुत्र्याचे मास
आणि ध्यानातून बाहेर येत
खाल्ली होती रंभा
की मेनका की कोण कोण जाणे

हल्ली कुणाला काही पडलेले नाही
बाऊही नाही करत कुणी
बालपणी चोरून ओढलेल्या बिड्यांचा

या अडनिड्या जगातले
काहीच समजत नसताना
हे योग्य ते सुंदर
असे कसे होणार

जाऊ द्या मन जाईल तसे बोंबलत
--- ००० ---

## मुक्काम

त्यांचा मुक्काम
इथे नाही तिथे असेल
त्यांना माहीत आहे
नसतोच विचार
शरीराशिवाय

विचार म्हणजे शरीरच
ते धरून ठेवतील
आसक्तीने आणि भीतीने

त्यांचे कपडे बॅगा
दागिने आणि सगळे
अवयव

सदोदित कामात असतील
यश मिळवतील
ग्लॅमर वा पराभव
बुडवतील
उचंबळत्या सागरात

स्वत:चे घरही
ते वापरतील
वेटिंग रूमसारखे
जणू कर्ताकरविता
पाहून घेईल संभोगाच्या वेळा
या विचारात

विवेकाने शक्य तो
टाळतील ते तुरुंग
होत भजनात गुंग
रेटत टाळ मृदंग
--- ००० ---

नाचघरात

नुसत्या सफाईदार उजळपणात
बालिश दिसते रे तुझे चित्र
मग सफाई कितीही असो

अजून तुझे दात
छान उन्हात खेळतात
आईच्या पदारावर कोरतात
निरागस गाईचे कळप

तू त्याच त्या
नाचघरात अडकून पडला आहेस
पॉलिश केले की झाले
अशा उत्सवी आनंदात
तुझे आकारही सांगताहेत
ठरवून निरर्थकाचे आभास

ठरवून कसे काढणार तू
गूढ चित्र
जर पकडून ठेवत असतील
तुला मेलडी आणि किटकॅट

तेच कर ना तू
तुला काही प्रश्नच नसेल
दिसत तर

कशाला उगीचच
त्या नासधुशीच्या
भूलभुलैयात हरवतोस
रस्ता चुकून

आई शोधत बसेल ना तुला तुझी
--- ००० ---

दखल

एखाद दुसरी ओळ येते समोर
तेव्हाच लगेच घ्यावी लागते
तिची लेखी दखल
अन्यता ती स्वत:लाच
ठरवून अवैध नष्ट होते

अशा होतात ना काही लुप्त
न जाणो त्यांतल्या काही
विश्वसुंदऱ्यांचे मुकुट
घेऊन आल्या असतील
सुंदर म्हणजे
त्यांच्या क्रियाकलापांत
कवीचे भस्म करू शकणाऱ्या

कोणत्या ओळीच्या मागे
कोणती आहे पॉवर
जणू एखाद्या मजुरामागे
उभा असावा
विकास सोसायटीचा अध्यक्ष

ज्या लिहिल्या गेल्या
त्यांतल्याही काही गेल्या
असत्या त्याच वाटेने तर

यावर कवी गप्प बसतो
आत्मप्रौढीच्या भीतीने
म्हणतो याही
बेदखल करायच्या लायकीच्याच
होत्या म्हणा

इथे मात्र सगळे कवीची दखल घेतात
त्याला मानाने एकमुखाने अनुमोदन देतात
--- ००० ---

जन्म

मोहातला उद्गार
विचाराविचारांतल्या पोकळीत
शोधतो कालच्या बागेत
विसरलेला स्वेटर
मनाच्या चहा ऐवजी
शरीराची बिस्किटे
बरी म्हणणारा

पहाटे निघालेले घोडे
हळवे होतात सशक्त
वाटेत कुणी भेटेल
न भेटेल या विचाराने

सर्रास वापरले जातात
त्यांचे उच्छ्वास
कोणत्याही विरहावरचे
अलिप्त धुके म्हणून
कारण कोणत्याही औषधाने
व्हायला हवी असते
सणासुदीची स्वप्नपूर्ती

तुकतुकीत काळी त्वचा
भूतकाळाची समोरासमोर
येताच ताबाच घेते
दूर बघत सूर्यास्त

मोहाकडे पाठ फिरवून
घोडे उभे राहातात मागच्या पायांवर
खिंकाळत सूर्याला तिलांजली देत
पुन्हा कधीही जन्म नाही घ्यायचा
इथे अशा निर्धाराने
--- ००० ---

सत्य

अन्नदानाचा आस्वाद घेतल्यावर
कावळे म्हणतात
एकच असते सत्य तर
वेगवेगळ्या भ्रमांना
सत्यच नसते का म्हटले
सत्याचे वेगवेगळे पापुद्रे
पसरलेत जगभर
म्हणून तर लुटावे लागताहेत
न पटणारे मार्ग

तसे असते तर
सत्याला सत्य तरी
म्हणायची काय होती गरज
संगीत असल्याशिवाय
चालींचा आग्रह कोण धरेल

एकेक सत्य पटवले जाते
असे नसून
एकेक भ्रम पटवला जातो
खरे तर
फक्त पटवताना त्यालाच
द्यावा लागतो मुलामा
पूर्वजांच्या जगण्याचा

सत्य विखुरल्यामुळे
होतात भेदाभेद
ही विषमता घालवायलाही लागेलच
एखादे सत्य वा एखादा भ्रम
--- ००० ---

## जगण्यावरचा विश्वास

बसल्या ठिकाणी मनाचे
मूडस विचार अवस्था
बदलता येतात हे समजले
तेव्हा
जगण्यावरचा विश्वासच उडाला
म्हणजे पराभव म्हणून नव्हे
खरे धरणे या अर्थी

तसे तर पाच वर्षांपूर्वीचे मन
किंवा दहा वर्षांपूर्वीचे
ते हेच होते
हे असे होत आलेले
पण असे नव्हते

आधी भाषा की आधी मन
याचा शोध घेतला
तर म्हणे आधी मन
होऊ शकतो म्हणे विचार
भाषेशिवाय

मी न आठवलेल्या पण पडून
असलेल्या मनात माझ्या जखमा
असतील भाषेशिवाय
आठवताच येत असतील त्या
भाषेच्या रूपात

मग काय महत्त्व आहे
भाषेवर विश्वास ठेवण्याचे
कविताही मुळातली
भाषेशिवायच समजायला हवी

लिहिताना मात्र ती भाषेतच येणार
--- ००० ---

खात्री

तुम्ही इथले लोकनृत्य करा
की भांगडा की ब्रेक डान्स
तुम्हाला खात्री बाळगावीच लागते
की जगण्याची पद्धत हीच असणार

लहानपणी तुमची आई
यल्लम्मा देवीची परडी भरायची
आणि मग काही वर्षांनी कळले
की आपली तर देवी यमाई आहे
आणि मग ठरले
की सगळ्या देवी एकच पण तरीही
व्यंकटेश या कुलदेवाची पत्नी
पद्मावतीही आपलीच ठरली
या सगळ्याचा स्वीकार करत
आपण बांधत राहिलो
आपले हवामानाचे अंदाज
असे होतच असते असे म्हणत

कडुलिंबाच्या पाल्याची
तुम्हाला आठवण राहिली
देवीमुळे घरातले कुणी वाचले होते
मरता मरता ती कृतज्ञता असणारच होती

अडीअडचणींनी तुमचे विचार
बदलत गेले तुम्ही होतात तेच
पण तुम्हाला वाटले शहाणे होत गेलात

मनाचे सातत्य भंगले नव्हते
भंगू द्यायचेच नाही हेच तर
जगणे म्हणून सर्वमान्य होते
तुम्ही काहीच नाही मानत
असे हल्ली तुम्ही लोकांना सांगत असता
--- ००० ---

विरोधक

प्रचंड पाताळयंत्री आहेत
भोसडीचे राजकारणी
आणि त्यामुळेच अनेकांना
वंद्य आणि उदात्त
अगदी रक्ताळलेले नसले तरी
अनेक खून पचवूनच
ते झालेले असतात
धूर्त धोरणी धनवान
हे इतके सगळे मला
कल्पनेनेही नाही कळू शकत
हे मी समजून असल्याने
देतो सोडून

जगाचे इतिहास अनेक
शास्त्रशाखा अनेक संस्कृती
अनेक खाद्यपदार्थ ज्यांची
नावेही नसतात मला माहीत
मी देतो सोडून

अनेक घोटाळ्यांचे
प्रगती होत जाणारे शोध
गुन्ह्यांच्या उलगडत जाणाऱ्या
आश्चर्यकारक कहाण्या
एवढे कुठे जपत बसणार डोक्यात
देतो मी सोडून

माझे परिवर्तनवादी मित्र म्हणतात
हे सगळे बदलायला हवे
मी त्यांना विचारतो तुम्हाला
समजते का सगळे सगळे मिळून
सुरुवात कुठून करणार आहात
की फक्त विरोधक संपवायचे की झाले
--- ००० ---

नारा

परंपरेचे पाईक म्हणून
गळ टाकले तर ते
आतून टाकलेल्या गळांनी
ओढले जाऊ लागले
आणि तोच होऊन बसला
पावसाआधीचा गहन प्रश्न

असे बरेच अनपेक्षित
हत्यांचे संदर्भ आल्याने
एक वेगळाच प्रश्न आला समोर
कोणत्या फाइल्स क्लोज कराव्यात

हा त्यामुळे एकीकडे
राजकारणी सरसावले
आणि एकीकडे विचारवंत

कोणत्याही कारणाने
तळ्यात सोडलेले पाय
बाहेर नव्हते काढायचे
जवळ प्रेयसी
असण्याची कल्पना करण्याची
ही एकच तर शक्यता शिल्लक होती

असे दिवस जात राहिले
हिंसा होतेय जखमा होताहेत
असे वाटत राहिले
दु:खाशिवाय कुणीच नाही जगू शकत
हा नाराच केला पक्का

आता खेळा या रणमैदानात
व्यक्तिगत आणि सामाजिक
एकच आता सगळे असे म्हणत
--- ००० ---

माणूस या विषयावर

सवयी बदलायचाच
आळस आहे म्हणजेच
हेच असेच राहणे
शंभर वर्षे मान्य आहे

अधाश्यासारखे झोपून राहणे
वचावचा खाणे वाचणे आणि
ताजमहाल बघत बसणे
तासंतास
काम करत थकत
पुन्हा झोपत स्वप्ने पाहणे

हार गुच्छ संभोग यांची
आणि आपल्या मृत्यूनंतर
येणाऱ्या हेडलाईन्सची
हीच डेडलाईन असल्याप्रमाणे

परमेश्वरा मला यशस्वी कर
या विश्वातल्या सगळ्यांना यश मिळू दे
हे माझ्या प्रार्थनेमुळे झाले
याची नोंद होऊ दे

बाकीच्यांना वाटू दे न्यूनगंड
माझे फॅन्स होत माझ्या सह्या घेत
माझ्यावर पैसे उधळत
होऊ दे त्यांच्या
जिंदगीचे सार्थक

मिळू दे मला विश्वभूषण
अंतराळगौरव ज्ञानपीठानंतर
माणूस या विषयावर
नाच करणारा प्रभुदेवा म्हणून
--- ००० ---

## अजून जगू

अनुभवाचा सनसनाटीपणा हवाय ना
हा घ्या
तुम्हाला जाणे तर अर्जंट आहे
आणि संडासातल्या पाईपावर वर
एक प्रचंड मोठा उंदीर आहे
हे नेहमीच असते या नाही तर त्या

विश्वास ठेवावाच लागतो
ज्याचे मन मुळीच नाही माहीत त्याच्यावरही
आणि तोही बहुधा नाही येत खाली

पाणी का बंद झाले म्हणून नळ खोलला
तर त्यातून मेलेला उंदीर निघाला
तीच टाकी तेच पाणी आमचे सर्वांचेच होते

आम्ही ते गौरवले
जगातले दुर्मिळ टॉनिक म्हणून
आम्हाला राहायचे होते जगायचे होते
तिथेच

प्रचंड ताप भरल्यावर एकदा
एक होमियो आणि एक आयू
असे दोन बोलावले डॉक्टर उपलब्ध
दोघांनीही आपापल्या विचाराने
एकेक दिले इंजेक्षन

प्लासिबो दिले की काय
दोघांनीही

असेच चालत आलेय जगणे
अजून जगू अजून जगू
असे करत
--- ००० ---

भीड

हे नाही परवडणार
एवढ्याशा जर्दाळूत
आख्खे फर्निचर करून देणे
तुमच्याकडे लाख अळू खूप असेल
आवडतही असेल तुम्हाला खिमापाव
पण त्याचा तुम्ही
गैरफायदा घेणे योग्य नाही

उन्हाळ्यात एखाद्या मांजराला
बसावेत स्वत:च्याच मिश्यांचे चटके
असा आलाय का कधी तुम्हाला अनुभव
अन्यथा तुम्ही या वृथा खटाटोपात
नासाडी करत आहात
तुमच्या आयुष्यात
येऊ शकला असता अशा आनंदाची

हे तुमच्या आयुष्याला
वळण लावण्यासाठी नाही चाललेले
बांधकामसाहित्य आधीच
वाळवी लागलेले असावे आणि
तुम्ही बेसावाध असावे असे होऊ नये

समजून घ्या
डेकोरेशनची आवड असणे
हा काही परवाना नाही असू शकत
कोणतीही शमा गिळंकृत करायचा

तुम्हाला फक्त आणि फक्त
शृंगारिक कविताच आवडत असतील
तर भीड न बाळगता सांगा तसे
काहीतरी निमित्त व्हायचे
आणि निष्ठेवर प्रश्नचिन्ह यायचे असे नको
--- ००० ---

मसाला पान

आपण ठरवतो एक आणि घडते दुसरेच
हे वाक्य नुसते ऐकून पाठ झालेले नको
तुम्ही स्वत: किती वेळा म्हटलेय ते सांगा
कारण पाठांतरातला तारा कोसळला
की आपल्याला वाटते की कुणी मेले
आणि चंद्र सूर्य नाहीत कुणाच्या नावाने
या समाधानात भरतो आपण तोबरा मसाला

पानाचा ही जगरहाटीच आहे म्हणा ना
जणू अकस्मात तोही पुढे जात आहे
पण तुतारी मागण्यापेक्षा किंवा
पाठीवर हात ठेवा म्हणण्यापेक्षा
हे कधीही चांगले लोणचे नेहमी
मुरलेलेच असायला हवे
असे काही नाही तुम्ही अगदी
मध्यरात्री हाक मारा मला
मी हजर असेन मग तारीख

कोणतीही असो लस्सी तिच्यावर
मस्त सायीचा थर असायला हवा

यालाच तुम्ही मध्यमवर्गीय सुखासीन
दुपारच्या भुकेच्या वेळी न रडवणारे

आयुष्य म्हणू शकता पण मी कुठे आहे
याचा शिल्पकार आपल्या आधीची
आणि आत्ताची सगळी माणसे
ही वा तीच तर धरून आहेत आशा

तुम्ही पोचा हळूहळू इथे मी काही
याहून फार काही पुढे कुठे नाहीय जाणार
मस्त मजेत आपण सगळेच मध्यमवर्गीय होऊ
--- ००० ---

अर्थ

चंद्र हा झाला एक मराठी शब्द
आणखी इतर भाषांत त्यालाच
काही वेगळे असणारच शब्द
अर्थ विचारावा तर कुणीही
ती वस्तूच दाखवणार
म्हणजे मग विचारा
वस्तूचा अर्थ

ते नाही जमणार
कुणी म्हणाले निर्जीव
वस्तूंतही असते जाणीव
पण नाही ना पटत हे
मग तर ती जाणीव म्हणजेच
अर्थ
असे नसते का म्हणता आले

म्हणजे काय दु:ख
किंवा क्रोध
हा अर्थ

चंद्राचा उपयोग
प्रतिमा म्हणून करावा
म्हणजे व्यक्त होईल
अर्थ

चंद्राचे अर्थ
म्हणजे आवडत्या
नटीचे स्पर्श
ती निरर्थक लांब असून

सध्या चांदण्याला म्हणू
अर्थ
--- ००० ---

पाणी

कोणत्याही कारणाने पाणी
डोक्यावरून नाही जाऊ द्यायचे
वेळ आलीच तर शेकडो काजवे
त्वचेत खोचून सारा जमाना
व्हायचे यारानातला बच्चन

गांभीर्य म्हणजे
फक्त तीव्र हाव
एवढेच होतेय
कित्येक मजले
पायऱ्या चढतानाही

देवा मला खरेच
अंतिम काही नको आहे
माझ्या कुवतीला झेपेल
इतकेच हवेय मला समाधान

पण कुणी म्हणावे
माझ्यामुळेच त्यांची बाग
सावरली गेली किंवा
कुणी म्हणावे मी नसतो तर ते
खतमच झाले असते
किंवा कुणाच्या
सेक्सी प्रेमाचा
मीच आहे शिल्पकार

मला मुळात पाण्याची
भीतीच आहे
त्यामुळे अंधारात जाणे वा
लिफ्टमधून जाणे हे मी टाळतोच

माझ्या घरात एक निसर्गदृश्य आहे भिंतीवर
--- ००० ---

सुखी माणसाचा सदरा

माझ्या बालपणातली झाडे
तारुण्यातले रस
वेगळेच असणार मेंदूतलेही द्रव
आणि अंधार कमीजास्त
त्यामुळे अर्थातच
माझ्या स्वप्नात येणारे माझे विचार
इतर कुणाच्याही
भिंतीवर दिसणार नाहीत

त्यामुळेच मी
एकाकी नसून सामाजिक आहे
अशा पुण्यतिथ्या मला
जोपासाव्या लागतातच
माझे संवर्धन करतानाच
मी प्रत्येकाच्या खिशात
हात घालत राहतो
हक्काने वा प्रेमाने वा चोरीसाठी

निराशावाद वाईट
हे बिंबलेलेच असते माझ्यावर
माझ्या उपजत गीतामुळे

मी कुणाला काय शिकवणार
सगळेच माझे बांधवच तर आहेत
त्यांचे जाण्यायेण्याचे रस्ते
वेगळेच आहेत मेंदूंच्या सुरकुत्यांतले

मी एकोप्यासाठी उत्सव करतो
आणि गुंतून राहण्यासाठी गॉसिप

माझ्या फाटक्या शर्टालाच
काहीजण सुखी माणसाचा सदरा म्हणतात
--- ००० ---

सेल्फी

एखादे शिल्प आणि मागे कारंजे
यावर सेल्फी काढता काढता
माणसे तुटतात इतरांपासून
आणि स्वत:ला घट्ट घट्ट
पकडत जातात

हजारो सेल्फी जमल्यावर
ती माणसे ठरवतात
की आता त्यांतले काही
कमी करावेत
नवे न्यावेत वाढवत

पण घट्टपणामुळे
एकाकी होत जातो त्यांचा काळ
आणि कोणते करावेत सेल्फी डिलीट
हे कळूच न शकल्याने
ती घाबरतात

मग एक अंतिम उपाय म्हणून
ती माणसे जुने डिलीट करण्याऐवजी
नव्यांचेच प्रमाण कमी कमी करत जातात
--- ००० ---

कवितेचे सत्य

सर्जक कविता असते
मूर्तिभंजक
ती वाचकाच्या मूर्तीत
काहीही भर न टाकता
ती नष्ट करण्याची प्रक्रिया सुरू करते

आधी ती
कवीची मूर्ती
नष्ट करून आलेली असते

पण ती विसरलेली असते
कवीला

तिचे असणे असते
नसण्याचे सत्य
--- ००० ---

पहिला दिवस

पहिला दिवस आहे
आमच्या जिद्दीला उजाळा मिळो
आमच्या स्वप्नांना आकांक्षांना बळ मिळो
आमचे धैर्य फळफळो आमचे शौर्य भडकत राहो
आमच्या दु:खांचा होवो उत्सव
आमच्या त्यागांचे स्मरण जागते राहो
आमची मीलने आठवत राहोत विरह धुमसत राहोत
धडधडत भळभळत द्वेषाने प्रेमाने सूडाने
कृतज्ञतेने प्रक्षुब्ध राहोत आमची मने
प्रत्येक दिवस ठरो पहिला दिवस
सर्व संकटे शत्रू यांचा नि:पात करण्याचा
चिंध्या करण्याचा मुंडकी उडवण्याचा
वेडे होण्याचा बंधुत्वात क्रोधात आशेत निराशेत
प्रत्येक पहिल्या एकाच दिवसाचे असो आमचे आयुष्य
--- ००० ---

काबिल

तो म्हणाला की दु:ख
म्हणजे एक विरहच असतो
आणि निराशा असते
एखादा भूतकाळातला आनंद

तुमच्या आवडत्या कुत्र्याला
द्यावे लागते जेव्हा मृत्यूचे इंजेक्शन
तेव्हा तुम्ही भोगलेली सर्व करमणूक
आधीच निष्प्राण झालेली असते

मनाचे पत्तेही पिसले जातच असतात
पण पत्ता नाही लागत विसाव्याचा
डोळ्याला डोळा नाही लागत रात्रभर
पासंगालाही न पुरल्याने रात्रीच्या पराभूत होत

ईर्षा म्हणजे जर प्रेम असेल
आणि मालकी म्हणजे जर मेल असेल
तर मेसेज वाचा की न वाचा
आशा हीच तुमची आस असेल

म्हणूनच आक्रमणा ऐवजी
सामोपचाराचे पांघरुण घेणे
हेच शहाणपणाचे ठरेल
मग बाजार पडो की उसळो

तो म्हणतो की म्हणे तो बोलतो
त्याला विसंगत म्हणा की सामाजिक
त्याची अर्धी लाकडे गेली मसणात
तरी उरलेली काबिल आहेत जग पेटवायला
--- ००० ---

## जगणे म्हणजे

आधी हे पार पाडू
मग ते पार पाडू
त्यानंतर मात्र
लक्षपूर्वक
हे राहिलेले बघावे लागेल
खरे तर हे
गेल्या वर्षीच
व्हायला हवे होते
पण काही कागदपत्रांचा
प्रश्न आला
त्यातही कोरोनामुळे
काही दिवस बंदच होते सगळे

असे तर घडू
शकणारच काही
हाताबाहेरचे
पण उरक हवाच
एकदा राहिले की राहिले
असे करण्यात मुख्यत:
आपलेच आहे नुकसान

आता मात्र
सुरुवात करावीच लागेल
एकदा सुरुवात
होण्याचाच तर प्रश्न आहे

हा पसारा एकदा आवरला
की आता पर्यायच नाही
मरून खूप झाले
आता जगायचे बघायलाच हवे
जगणे म्हणजे राहिलेली
कामे करणे हेच तर
--- ००० ---

विज्ञानवादी

स्वर्गाला दोन प्रचंड प्रवेशद्वारे असतात
खूप अंतरावर आणि प्रत्येकावर असतो
एकेक तगडा पंजाबी तपासून आत सोडायला
आणि बाहेरचा ट्रॅफिकही कंट्रोल करायला
वर आणि आजूबाजूला असते विस्तीर्ण आकाश
मावळती उन्हे आणि थंड वारा तिथे बहुसंख्य गाड्या
येतातही पंजाबी गुजराती मारवाडी आणि सिंधी लोकांच्या
ते सगळेच पुण्यवान असतात एकमेकांची ताकद जोखणारे
आणि मान ठेवणारे एकमेकांच्या समृद्धीचा प्रभावांचा
त्यांना माहीत असते त्यांची पोरे जुहूवरच्या हॉटेलांतून
रोजी खर्च करतात काही हजार रुपये शिवाय त्यांची
ऐपत असते  कोणतीही मादक द्रव्ये घेण्याची मौज
करण्याची दिलखुलास नग्न होत आणि हिंसेचीही
आणि निभावून नेण्याची हे सगळे वा गुन्हेगार होण्याचीही

इकडे मराठी माणूस फिरतो शंकरविलास वा अमृततुल्य शोधत
मोठ्या हॉटेलांतल्या पदार्थांची नावेही नसतात त्याला माहीत
लहानपणापासून त्याच्या पुढाऱ्यांनी त्याला पाजलेली असते
पुरोगामीपणाची अफू जीवनगुटी म्हणून त्याने त्याला येते
तत्त्वशीलपणाची नशा जी टिकते आयुष्यभर छोटे छोटे स्वार्थ साधत
तो लाखालाखांचे मोर्चे काढतो संप घडवतो रस्त्यावर
फेरिवाल्यांनी कुठे बसावे यावर आंदोलने करतो आपला रोजगार
दुसरेच कुणी हिरावून घेतील याची त्याला सतत भीती असते
किरकोळ करमणूक देणारे त्याचे ग्रेट हीरो
जातात हिंदीत फडकी मारायला अधिक मानधनासाठी
आपल्या अभिनयाचे तिकडे फार कौतुक आहे याचा डांगोरा पिटत

सतत व्यग्र राहण्याची त्यांची सवय स्वर्गात जाऊनही जात नाही
सतत न्यूनगंडात्मक भीतीत राहण्याची इकडचीही सवय
चालूच राहते एकाच दु:खात ही विषमता का यावर इकडचे विचारवंत
सविस्तर लेख लिहितात स्वर्गातल्यांना वावडे असते भाषेचे पुस्तकांचे
त्यांनी बाहेर नोकरीवर ठेवलेले असतात विवेकी बुद्धिप्रामाण्यवादी इहवादी आणि विज्ञानवादी
--- ००० ---

सारिपाट

कुणाचे कण्हणे
अंग दुखण्याने

सारिपाट हे ठीक
पण खेळतात कसा तो

उद्वेगाने उचललेले पाऊल
नेमके चिखलात
मनाच्या अंगणात

देहाच्या  कुंपणात

बागडा खिदळा
पण एक लक्षात ठेवा

साळुंकी आणि साळुंखी
दोन्ही बरोबर

मनाचे शुद्धलेखन वेगळे असते
की नसतेच

अनुनासिके कामाला येतात
वेदना व्यक्त करायला

सटीसहामाशी
वा सामाशी दोन्ही चालेल

शुद्ध वेदना असते का
व्यक्तिगत आवाज नसलेली
स्वभावाची भेसळ नसलेली

सगळे लागायचेत हे शोध अजून
--- ००० ---

## हडळ

हडळ असे काही नसते
पण नाटकात असते
चेटकीणही असते
आपण म्हणतो
ते एक तत्त्व असते
आणि ठेवतो विश्वास

त्यामुळे ते अंगाशी येते
आपलेच होते
वाटते की इथेच
कळायला हवे
प्रेम म्हणजे काय ते

पुढची पिढी म्हणते
तुम्ही म्हणता ते बरोबर
हे जुने झाले आता
आमचेही काही खरे नाही

आणि इथेच जणू
विचारांवर पडते वीज
प्रेमही विचाराने
करायचे म्हणजे हडळच
तर काय

कसे वागायचे ते तुम्ही
ठरवत आलात आणि तरीही

शस्त्रे बाळगत आलात

हडळ जवळ येते सौंदर्य दाखवते
तेव्हा तुम्ही भुलता आणि मानता ते
तुमच्या मनाशी जुळणारे
--- ००० ---

## कचऱ्यावर प्रक्रिया

हातची संधी जातेय
की काय म्हणून हवालदिल
होणारे कावळे
सतत असणारच आहेत
या जन्नतमध्ये
ही देवाघरची फुलेच
होतील राजकारणातले खुळे
लौकरच
तेव्हा कोणता बाम लावावा
दैनिकावर
हे कळणे मुश्किल होईल

शेवटी व्यापाऱ्यांनीच
सावरावे सगळे
घ्यावे संभाळून
क्षमा करावी
कोर्टाच्या तारखा
ढकलाव्यात पुढे
आणि मागच्या तपासाचे
काय झाले
हा प्रश्नच टाकावा गाडून
माध्यम गल्बल्यात

बल्ब कुठे किती लावायचे
हे ठरवतच अंधार
करत राहतील ही कालची फुले

कचऱ्यावर प्रक्रिया
होणे बंदच पडेल
तेव्हा वेळ निघून गेलेली असेल
--- ००० ---

बोली

तारीख पुढे ढकलल्यामुळे
तुमची काळजी वाढली
असे नव्हे
सुटका झाली
असे नव्हे
दिलासा मिळाला
असे नव्हे
ना तुम्हाला
घरघर लागली
ना तुमचे आयुष्य
उत्तेजित झाले
तुमचे डाव यशस्वी झाले
असे नव्हे
ते आता हाय खातील
असेही नव्हे
डोळे कुणाचे पांढरे होतील
ते ठरायचे आहे
दोन्ही वकील म्हणताहेत
ते खरे असेल
असे नव्हे

हून हून काय होईल
घ्यून घ्यून घेणार काय
प्यून प्यून पिणार काय
खौन खौन खाणार काय

--सड्यात गेली काही वर्षे
--त गेला घोडा

शेवटी घडणार सगळे
भाषेतच पण प्रमाण भाषा नको
बोलीत घडू द्या
--- ००० ---

केली

रामदास फालतू होते
कारण चातुर्वर्ण्यवादी होते
गीता फालतू
कारण ती संस्कृत आहे
अष्टावक्र भुक्कड
कारण ते जनकबिनक नको
निर्वाण भंगार
कारण ते सामाजिक नाही
आणि योगवासिष्ठ टाकाऊच
कारण ते राम या हिंदूला सांगितलेय

तसेच अमुक निरर्थक
कारण अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा प्रॉब्लेम
तमुक अतिरंजित
कारण अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा प्रॉब्लेम
ते जातीय कारणांनी उदात्त
म्हणून खोटे
आपण खत्रुड असल्याने
अस्मिता म्हणून वापरावे लागणारे
सगळेच कचरा

हिम्मत हरलेल्या लोकांचे टेकू
सगळे शोकात्म
आळशी लोकांचे शौर्य
आत्मघातकी
आक्रमण म्हणजे रुदन
न्याय म्हणजे शिजोफ्रेनिया
समता म्हणजे वर्चस्व

सुन लो मेरी बात ( जो निंद्य है )
गम छोड के मना लो रंग रेली
वरना खाओ केली
--- ००० ---

माशी

दुर्लक्ष करा ना तुम्ही
तुम्ही
तोच तोच विचार का करता
नाकावर माशी बसल्यासारखा

तुम्हाला वाटते
तुम्ही
आजारी पडाल
आणि खुपत राहातोय तुम्हाला
ऑफिसात दोन
स्त्रियांसमोर झालेला अपमान

एकदा या पायावर
एकदा त्या
ही तुमची जुनी सवय आहे
त्यामुळे पाच मिनिटे
तुम्ही
स्टेजवर असलात तरी
तुमच्या बोलण्यात
विक्षेप येत राहतो

विशेष म्हणजे
तुम्ही
बाळगली होती इच्छा
नट व्हायची
भांगही पाडायचात
तुम्ही
देवानंदसारखा

आता नाही बाळगत
तुम्ही
असे काही
--- ००० ---

## बदके

उन्हे साळढाळ पडावीत पण
सूर्य बेढब वाटू नये
ढग असतील तर
दिसण्याचा प्रश्नच नाही

तरीही एक प्रश्न उरतोच
तो दुकानदार बिलावर
त्याचा फोन नंबर का नाही देत

त्याला आत्मविश्वास नसावा
की बाबा कुठल्याही रोषणाईत
आपले किरण कमी नाही पडणार
तो असा घाबरत असेल
इतकी वर्षे बदक पालनाचा
पारदर्शक अनुभव असून

साधी दुरुस्ती होती
करेल का हा नीट
तसे तर विचार होता की
पावसाची वाटच नको पाहायला
लेट गो करू
आणि घेऊ चालवून तसेच
थोडा त्रास असला तरी

फोन नंबर का नसेल देत हा

दिली करून त्याने दुरुस्ती
ती पाहिलीही नाही
आपण तर चालवूनच घेणार होतो
त्याला वाटले असेल
माझा त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे
बदके पाहून मी घरी गेलो
--- ००० ---

ग्लानी

कुणावरच नाही राहायचे अवलंबून
मित्रही नाही मी मित्राला म्हणालो
सतत अपुरेपणाचा त्रासच नको
म्हणजे काय मित्राने विचारले
फक्त मीच राहणार माझ्याजवळ
मी म्हणालो तर मित्र टारगट हसला

मी हा विचार करायचा अवकाश
विचार अमीबासारखा तुटून दोन झाला
त्यातला एक मी झालो आणि दुसरा
तो चालू राहिला विचार

असे जवळ आल्यावर कळले
हे एक मृगजळच आहे
या विचाराच्या तुटक्या भागाशिवाय
कुठे आहे मी ते कळे ना
रस्ते बदलून पाहिले तरीही
जिभेची कडवट चव जाई ना

आता हे दोन वेगवेगळे जिवंत
विचार झाले होते की काय

आणि कुठे आहे मी
यांच्या आधीचा

मग मलाच सुचले विचार करता करता
आधीही असेच काही असणार
तुटके

मी एकदा हा एकदा तो तुकडा आहे
वा कधीही आणखीही या विचाराने
मला ग्लानी आली
--- ००० ---

विकृती

ही काही कविता नाही
आणि असली तरी मी काही तिचा बॉडिगार्ड नाही
जे दिसतेय ते सांगतोय फक्त
नाही तरी असते काय दुसरे

विकृती म्हणजे जखम त्रास वेदना अस्वस्थता
नको हे कधी एकदा होतेय सुटका असे वाटणे
होऊ द्या ना तसे वाटू द्या ना धिस इज लाईफ
असे बुद्धही नव्हता म्हणाला कुणी म्हणत असेल
तर तो सुटका झालेला स्वतंत्रच

विकृतीकडे जर एकटक पाहिले
तर ती वाढत जाते तीव्र होत जाते
भेदक आणि असह्य होत जाते हे दिसतेय

ती असतानाही नाही पाहायचे तिच्याकडे
विकृती म्हणजे फक्त शरीर
विकृती म्हणजे स्वभाव घटना परिस्थिती

मृत्यू न पावता पूर्ण लक्ष
हटायला हवे विकृतीवरून
हे दिसतेय मग काय उरेल

ही कविता नव्हेच
पण असू दे रेकॉर्डवर

सध्या सर्वांनी हेच म्हणत राहू
छे छे शक्यच नाही
औषध घेणे आणि सत्ताबदल
हेच आहेत फक्त उपाय
विकृतीवरच करावे लागेल आक्रमण
--- ००० ---

## मोजे

काही नाहीच सापडणार
असे समजूनच घालायचे मोजे
कारण आता जे दिसेल
ते फक्त उखाणेच घालेल
आणि कळलेच काही तरी
फोरवर्ड करायला भीती वाटेल

यालाच तर लोक व्यवहारज्ञान म्हणतात
--- ००० ---

वेग

बागेत वाढत चाललेल्या झाडाला
दिसते माझे मन
दोन्ही बदलत असतात सतत
आणि दोघांनाही बसवायचे असते
एकमेकांना आपापल्या रूटीनमध्ये

या अगणित शक्यतांमुळे
काही कळण्याची शक्यता
जरी दुरावत असली
तरी कवितांच्या शक्यता मात्र
अमाप वाढत राहतात

नेमके काही कळूच नाही शकत
हे कळते तेव्हा
दोन्हींवर लागते प्रश्नचिन्ह
आणि धोक्यात येते रूटीन

न समजण्याच्या ताजेपणाने
प्रत्येक कविता होते
स्वच्छ नवी

या कवितेचा वेगही असतो
प्रकाशासारखा अगाध
पण ती फक्त एकरेषीय सरळ न जाता
व्यापत राहते सर्व दिशा

ना अमुक वस्तू ना अमुक ठिकाण
नुसताच वेग असे होते
ना कुठे गेलो ना कुठून आलो असा
नोंद ठेवता न येणारा
स्मृतीत जमा न होणारा
झाडाबाहेर मनाबाहेर
--- ००० ---

रागावू नका – ही नुसती एक लाईट गंमत आहे – कविता नव्हे –

मालकीणबाई

मालकीणबाई बसलेल्या असतात
लगबगीने घरसेविका येते
त्यांना तिला काही सांगायचे असते
ती तडक ड्राय टेरेस गाठते
क्षणात बाहेर येते साबण घेते आणि लुप्त होते
ड्रायमध्ये आवाज येत राहतात
ती खूप घाईत असते
ते काम होताच ती स्वत:त मग्न होत घाईत
झाडू घेते इतक्या घाईत तिला डिस्टर्ब कसे करणार
खिडकीतून वर पाहिले
तर आकाशात दोन पक्षी
अगदी संथपणे घिरट्या घालताना दिसतात
ते पाहून मनाची चिडचिडच होते
तेवढ्यात ती काम संपवून
बाहेर जाऊन दार ओढूनही घेते
जे सांगायचे होते ते राहूनच जाते
मालकीणबाईंना येडे येडे वाटत राहते
उद्या आली की आधी तिला थांबवायचे
आधी इतकी घाई नको
दाखवत जाऊस हे सांगायचे
मग आज राहिलेले सांगायचे

साधे सॅनिटायजरचे सांगायचे होते
कोव्हिड पुन्हा पसरत चाललाय
या विचारात मालकीणबाई दुपारचे लवंडतात
तर मनात ते दोन पक्षी संथ
चिडचिड होत होत
त्या झोपी जाऊ पाहतात
मग थकून झोपी जातात
तेवढ्यात डोअरबेल वाजते
--- ००० ---

आहे हाच बार

काळजी करू नका म्हटले
ते काही धोका नाही या अर्थी
भीती वाटणार नाही
असा नाही त्याचा अर्थ

नाकातून रक्त वा कानातून
यावर
डोक्यावर गार पाणी थापणे

पण ते पाणी इथलेच तर असणार
याच निसर्गातले

आता तुमचे वेगळे आहे
काम झाल्याशी मतलब
म्हणून हातात सिगरेट धरून
तुम्ही वाट पाहता योग्य क्षणाची

तुम्हाला आठवणी हव्या आहेत
तुमच्या अनेक आवडत्या व्यसनांच्या

बाहेर पहारा देत असतात
तुमचेच दूत
त्यांना तुम्ही
गाफील राहण्याचा पगार देता

आता प्रश्न पडायचेच बंद झालेले आहेत
आहे हाच बार
आणि हीच नेहमीची लाडकी सेविका

जग असायचे ते असो
बरोबर चूक गेले तेल लावत
उद्याचे उद्या
--- ००० ---

स

विमस्कपणाने विषाणू नाही पसरत
विमस्कपणाच पसरू शकतो
पण विनामास्कपणाने विषाणूही पसरतात
आणि विनामास्कपणाही

कुस्तीत जगा पण
स्वत:चे स्तोम न माजवता
वाजवा मांजरीचे फिस्कारणे
पण वासलात नका लावू
इस्पिक एक्क्याची

मस्का लावा व्हिसा मिळवा
मस्कतला जाऊन बक्कळ कमवा
व्हिस्की प्या मुस्क्या बांधा
भीतीच्या आणि वस्तीला या
मस्त मस्तीत
प्रशस्तिपत्रे घेऊन
स्वास्थ्य मंत्रालयाची

अर्थ विचारा मास्तरांना
वास्तपूस्त या शब्दाचा
आणि ठरवूनच टाका नाहक
खस्ता खाण्यापेक्षा
स्वस्तात मरण आले तरी चालेल

फिरस्ते व्हा मिष्टान्न खा
फुकटची नकोच उस्तवार
कसमे वादे प्यार विसरा
विसविशीत आयुष्यावर चढवा मास्क
खुशकी चा मार्ग बरा स्काय वॉक नकोच
तोच श्वास पुन्हा नाही घेता येत
जीवन हा फास नसून भास आहे हेच घासा
--- ००० ---

चार म्हाताऱ्या

चार म्हाताऱ्या भजन संपवून
घरी परतणाऱ्या हळूहळू पाचवीबद्दल
मला तिचं बघणं अत्यंत घाण वाटतं
मलाही – होय मलाही –
खुनशीपणानं बघते ती –
आपण काय घोडं मारलंय तिचं --
आणि उरलंय काय आता उपयोगच काय
पूर्वीपासून अशीच आहे ती
तरुणपणात ठीक असतं हो
बरं वाटतं जरा दुष्टपणा करायला
एखादीचा अपमान करायला
तेवढी ताकद असते अंगात
उमेद असते आत्मविश्वास असतो
घरच्यांनाही बरं वाटत असतं ते तिखटमीठ
पण तरीही आपण नव्हतोच तशा
तसं नाही अगदी थोड्या प्रमाणात हो
पण असं काय लक्षात असेल तिच्या
तेही आपल्या चौघींच्याही बद्दल
मला वाटतं ना तिचा सूरच
कायमचा लागलेला असेल तो
तंबोरा लावतात ना काळी पाच की काय ते
तसा घरच्यांनाही नको होत असेल जीव
तिला ट्रीटमेंटही दिलीच होती ना
त्यातून बरी झाल्यावर आता ही अशी
एवढी आहे – पण खरं सांगू हेही बरंच वाटतं
कुणितरी आपल्याला चेपलं जखमी केलं
की छान वाटतं अजून जगू असं वाटतं
राग नका मानू पण विकृती आहे ही तुमची
स्त्री म्हणजे फक्त अन्याय सहन करणार असं नसावंच
पण तिच्याबद्दल थोडी आपुलकीही वाटते बघा
आपणही थोड्याफार तशाच असल्यानं असेल
आज कल्याण करी रामराया छान झालं –
--- ००० ---

टाकी

टाकी कालच दुरुस्त केलीय
आता बातम्या वेगळ्या येतील

माझा मेंदू नाही तर जग नाही
याचा अर्थच इथले पान न पान
मीच घडवलेय

सह्याद्री नेमका कुठून कुठवर आहे
ते नाही मला सांगता येत तर
किलिमांजारोचे काय तोही
पर्वतच आहे ना की नदी आहे

महायुद्धेही निर्माण झाली असणार
माझ्याच मेंदूतून
कळायचे ते झालेय कळून
आता नुसती ती कचरा माहिती
करायचीय काय

सर्वांत लांब वा सर्वांत रुंद नदी
किंवा कोणी कोणी कधी कधी
कसे कसे केले लांगूलचालन
वा कोण कुणाचे द्वेष चालू ठेवताहेत
इथे असो की तिकडे
त्याचे काय ते कशाला हवेय
माझ्या मेंदूत त्यामुळे माझे जगणे
त्या टाकी ऐवजी एखाद्या
क्वारीतून थोडेच येणार आहे

अनुभव आणि माहिती
मेंदूची त्रस्तता कमी नाही करत
हे कोरलेले आहे त्या टाकीतल्या पाण्यावर
सुवेझ कालव्याची कशाला चिंता
--- ००० ---

भेळ

लोणच्याची बरणी
तराजूत तोलत
पाताळात कुजबुजते
गुळूगुळू व्यापार

सहजसाध्य वाटते
एकूणच
सर्व गृहीत धरणे
आणि घटस्फोट घेणे

विस्तवाशी नको खेळ
म्हणत सगळेच हसत खेळत
गिळत राहतात
रूटीन भेळ

खोटी पण पटणारी
असावीत उत्तरे
या एकाच घोषणेवर
लागतात हजारो विवाह

पुढची पिढी घेईल आता बघून
नुसती कारणेच सांगायची
तर आम्हालाही होताच की भूतकाळ
आणि परंपरा

आद्य असे काही असूच नसेल शकत
तर हा एक घोटाळा आहे
आम्ही थकलो नव्यांना
शोधू द्यात आता पहिला क्षण
--- ००० ---

## तुलना

मी जे दाखवतो
तेच टिकावे
असेच असणार ना प्रयत्न

दाखवलेले आणि असलेले
सगळेच झाले ओपन
तर शून्यच होईल सगळे

असतात शून्याचे पुजारी
बुद्ध जेके तुकाराम सार्त्र
त्यांना ओळखणार कसे

केस दाढी वाढलेली
थकलेला तरीही जिद्दी चेहरा
चौकटीचा लाल-निळा शर्ट

यावरून कळतोच ना बिनधास्तपणा
आणि हे असे आवडणारीच
तर हवीय सहचारिणी

किंवा बाकी सगळे टापटीप
आणि ऑफिसबॅगमध्ये
दुपारचा डबा

हेही कुणाला छान वाटेल
कुटुंबवत्सल स्वभाव
आणि मर्यादित गोडवा

तुलना करत न बसता
नुसत्या समजा प्रत्येकाच्या
मर्यादाच पाहिल्या तर
--- ००० ---

पण कशाला

आपण म्हणणार धोक्याचे काय
लोकांनी जगूच नाही दिले तर
हा प्रश्नच मुळात
आलाय सुसह्यतेतून

पाण्याची बादली निसटावी
तिथेच पाय घसरावा
फ्रॅक्चर व्हावे

काय काय मोडलेय हरवलेय
किती नेमका झालाय अपमान
किती गेलेय हाताबाहेर
नेत शेवटाकडे

अशा क्षणी जी वाटेल तातडी
तेव्हा काय म्हणणार

पण कशाला

मी जर थांबवतो आहे वाचन
तर हे तरी कुणी का वाचावे

एकच आहे धागा
याशिवाय गत्यंतरच नाहीय
हे मला जे दिसते
ते येऊ शकते इथे

असह्यता समोर दिसल्यावर
बाहेर झेप घ्यावीच लागेल

त्यासाठी पूर्वतयारी कसली करणार
हा एकच तर क्षण आहे
--- ००० ---

त्याची उदासी

त्याची उदासी
असायची  बेफिकिरीसह
होईल ते होईल
असे फेकून देणे असायचे
त्यामुळे डोळे
प्रभावी वाटत कुणालाही
हाच मूड आपल्यालाही
आत्मसात व्हावा असे वाटे
जणू त्याची आत्महत्या
कधीच होऊन गेली होती
आणि आता
हा वेगळाच कुणी जगत होता

त्याने काही गंभीर मारामाऱ्या
केल्याचे आणि कधी कधी
तो शीघ्रकोपी असल्याचेही
काहींना माहीत होते

एखाद्या वेळी
त्याचा मर्डरही होऊ शकतो
याची जाणीव त्याच्या प्रत्येक
शांत हालचालीतून जाणवत राही
आहे हा क्षण
शेवटचा असू शकतो
याच्या खास सावधगिरीचीही
गरज नाही असा तो अविचल दिसे

त्याचे लग्न झालेले होते संसार होता
पत्नी मुले जरा दबलेली वाटत
दारू कितीही वेळ कितीही
पीत राहण्याची त्याची कपॅसिटी होती
--- ००० ---

कंगोरे

अर्थामुळे कोणताही शब्द
अतिरंजित आणि मर्यादित होतो
असूच नाही शकत तो करेक्ट मापाचा
आणि नेमका

समजा कर्ज हा शब्द घ्या
याचे कंगोरे मनाला
खरचटत राहणारच
किंवा घ्या आवडत्या
प्रेम या शब्दाचे उदाहरण

एकाच त्याच सुखासीनतेतले अर्थ
सतत असूच नाही शकत शब्दांना
प्रत्येक शब्द आणि सगळेच शब्द
सतत त्यांचे उद्दिष्ट
गाठण्याच्या प्रयत्नात असतात
आणि त्यांचा गाभा वेगवेगळा असल्याने
सतत एकमेकांशी संघर्षात असतात
पण कडेलोटाला न जाता
निरर्थकतेच्या आणि एकटे
पडण्याच्या भीतीमुळे

शब्दात कोणत्याही असते सक्ती दबाव
स्वतःच्या आकार्यक्षमतेचा अपराधभाव
सतत जखमी होत राहणे
आणि सत्य दडपत राहण्याचा खोटेपणा

विचारी माणसे मारली जातात शब्दांकडून
गाडली जातात अप्रस्तुत भूतकाळात
स्वसंरक्षणासाठी शब्द रचतात
एकोपा आणि अस्मिता

अर्थाची भोक्ती मने
होत राहतात हवालदिल
नुसतेच अर्थपूर्ण जगण्याला
काय अर्थ आहे या विचारात
--- ००० ---

## रामभरोसे

इथला निसर्गच काय
माणूस आणि पूर्ण विश्वच
नियमांनी चालते
पाऊस पाणी पूर दुष्काळ
रोगांच्या साथी ज्वालामुखी
सगळेच यांत्रिक वैज्ञानिक
सकारण घडते ना अपघात
ना अंदाज ना रामभरोसे

माणसाचे मनही
भागच तर आहे या विश्वाचा
त्याची सुखदु:खे
त्याची स्वप्ने महत्त्वाकांक्षा
राग सूडभावना द्वेष स्वार्थ
हेही सर्व यांत्रिक वैज्ञानिकच आहे

सगळ्याची कारणे प्रक्रिया
यांचा माणसाने शोध घेणे
हेही यांत्रिकच ते सापडत जाणेही

मग त्याच विज्ञानाने
दु:खाच्या द्वेषाच्या स्वार्थाच्या
प्रक्रिया बंद पाडून
फक्त प्रेमाच्या आनंदाच्या
चालू ठेवता येतील
ते घडणेही यांत्रिकच असेल

मग कशाला क्रांतीबिंती
पण असे म्हणणे चूक आहे
तीही घडणारच ना वैज्ञानिक कारणांनी

तोवर भोगू दु:खे आणि विषमता
असे म्हणणेही यांत्रिकच
काहींना गप्प बसावेसे वाटणेही यांत्रिकच
मरू दे च्यायला असे काहींनी म्हणणेही
--- ००० ---

मनोरे

सुटसुटीत असण्यासाठी
निमित्त होते
एका किरकोळ वैचारिक
रुसव्याफुगव्याचे
अधीर असलेल्या
उत्तरासाठी
न पडलेल्या प्रश्नाच्या

असे खूप असतात
गोंधळ
केबिनांच्या काचा
ओलांडून आलेले

वाफारा घ्या
की सहलीला जा
की अंटिबायोटिक घ्या
पोचणे होणार का
रहस्याच्या बिळात

हे कुणालाच नाही माहीत
की प्रोटीन्सऐवजी
किती लागतील
दागिने
देवार्पण करायला

कितीही उचंबळून
आले तर्काचे मनोरे
तरी उ:शाप कोण देणार
हे कुठे आहे
माहीत
--- ००० ---

काजवे

प्रत्येक काजवा
सांगत राही आपापली कहाणी
अहिंसा म्हणजे फक्त विस्मृती हे विसरून

कुणी पोपडे उडालेल्या भिंतीला टेकून
तर कुणी आलीशान हॉलमधून

प्रत्येकाकडे होती
एकाकी होत जाण्याची
वेगवेगळी चित्ताकर्षक
दास्तान आणि भूलभुलैये
जखमांचे आणि उल्हसित संध्याकाळींचे

सर्वांनाच वाटे
प्रकाश तर टाकत राहायला हवेच
ज्याच्यात्याच्या स्मृती उजळून
घडायला हवीत
ब्यूटिफुल निसर्गदृश्ये

नको ते शत्रुत्व म्हणून
मध्येच चमचम थांबवून
ते स्तब्ध होत

कधी त्यांना वाटे
रस्ते उताराला लागलेत
तर कधी वाटे
चढाने दमायला होतेय

स्मृती असेपर्यंतच ते चमचमत
दु:ख ही हिंसाच
हीच जणू येई त्यांना
मृत्यूपूर्वीची शेवटची समज
--- ००० ---

एकोपा

साखळी मंचावर अशी सरळच लागेल
मध्ये आहे ते रत्न बाकीचे मोती हे मानावेच लागेल
गोल केली तर सगळेच मोती वाटतील
ते रत्नाला चालणार नाही आणि मुख्य म्हणजे
केंद्रच न दर्शवल्याने विश्वासार्हता कमी होईल
आणि नाही तरी पैसा आणि कार्यकर्ते
आहेतच त्याचे जास्त निदान सत्तेची थोडीफार
शक्यता तरी होईल निर्माण नुसतेच कार्य करण्यापेक्षा

डावा हात वाटतोय खरा खरा पण उजवा जरा खोटाच
वाटतोय हात उंचावून सगळेच हसत असलो तरी
सगळेच काही सारखेच तत्त्वशील नाहीयत
आहेत तत्त्वशील पण तत्त्वे वेगवेगळी आहेत
चेहरे बघून हसरे लोकांना काही नाही कळणार
पण स्पर्शातून ज्याचे त्याला कळताहेत आतले
डावपेच आणि नाइलाजाच्या अवस्था
दोन्ही कडांना जे आहेत ते तिथे का आहेत
हे त्यांच्याबरोबरच मधलेही जाणून आहेत
प्रतारणेच्या वेगवेगळ्या तापमानांच्या शक्यता
अनुभवत विश्वासाने हसत उंच हलताहेत हात

निरोप हा आहे की तुमच्याविरुद्ध आम्ही
कमकुवत उभे करतो उमेदवार आणि तुम्हालाच
आणतो निवडून आमच्या विरुद्ध पण आम्ही
सांगू तसे करत वागत राहायचे एकमेकांना
शिव्या देत तीव्र आरोप करतच आतून
प्रेम करत राहायचे कुणाला काही
कळू द्यायचे नाही समजा नाही घडले
त्या तुमच्या दुष्ट एकोप्याला अपेक्षित
तर चिंता नको आम्ही आहोत आमचे काही
लोक नाराज आहेत त्यांच्यावर तुम्ही लक्ष ठेवायचे
आपण हात न धरता एकत्र राहू रत्न तर आम्हीच
--- ००० ---

## गाढवाची पिशवी

एखाद्या बिंदूच्या पुढे
जाऊच नाही शकत मन
बुजलेल्या घोड्याप्रमाणे
उंच उचलते पुढचे पाय
आणि खिंकाळत म्हणते
झोप येतेय –

ऊर फाटणे वा धडधडणे
वा बोझ येणे त्यावर
वा उराउरी भेटण्यासाठी
तडफडणे
वा ऊर भरून येणे
प्रेमभराने करुणेने
हे इतके सगळे
घोडा नाही जाणत
त्याच्या धंद्यातले कागद
उडून जाऊ नयेत
म्हणून त्यांवर पेपरवेट
ठेवावाच लागतो त्याला

ताण येणार दमायला होणार
जखमही होऊ शकते वर्मी
तरीही तोंडावर सोडा मारून
जागायचेच आणि समोरचे
करायचेच पूर्ण पहाटेपर्यंत
हे प्रशिक्षणच असते त्याला

कुणी घाण घाण शिव्या दिल्या
तरी मूड बिघडू न देण्याचेही

तरीही तो म्हणतो आता नाही शक्य
सगळी जिद्द गेली गाढवाच्या पिशवीत
--- ००० ---

## दोन मिनिटांत

दोन मिनिटांत झोप लागण्याचे तीन उपाय
एकाकीपणातून बाहेर पडण्यासाठी हे करा
एसी वा पंख्याशिवाय उकाडा कसा घालवाल
झुरळांपासून सहज मुक्ती
पालीची भीती कशी घालवाल
डासांना हाकलण्याचा घरगुती मार्ग
मुळव्याध डोकेदुखी अपचन असिडिटी
यांवर सोपे सोपे उपाय
शंभर वर्षे कसे जगाल
निरोगी कसे राहाल
आनंदी राहण्यासाठी हे करा
क्रोध आणि द्वेष कुरतडताहेत – हे करा
अपयशाच्या वैफल्याला करा आता रामराम

प्रसन्न पूजा कशी कराल
उत्तम ध्यानाचे तीन मार्ग
प्रार्थनेचे फळ कसे मिळवाल
घरात शांतता राहावी आणि पैसा टिकावा
याला काय करावे लागते
प्रेमात अपयश पत्नीशी दुरावा
मुले उद्धट निघाली आजारपण जात नाही
या सर्वांवरचे साधे सोपे उपाय आहेत
कसलीही असू द्या भीती
त्वरित मुक्ती मिळवा

सुंदर दिसायचेय प्रभावी वा आकर्षक
व्हायचेय वय लपवायचेय कायमच हीरो राहायचेय
या सर्वांवर आहेत उपाय

फक्त सुटत नाहीय एकच प्रश्न
पास रहकर भी हैं कितनी दूरियां
हा
--- ००० ---

# आराम

एकशे वीस तीनशे बनारस
लावून बसलेला ए टी एम  वॉचमन
छोट्या खुर्चीवर त्यातल्या त्यात आरामात
पाय पसरून हातात वर्तमानपत्र बघत
दुर्लक्ष करतो इस्त्राएलकडे
सीरियाकडे इव्हन श्रीलंकेकडे

त्याच्या मेंदूत चालू असलेले हे दुर्लक्ष
बाहेरून कुणाला दिसत नाही
मस्त खाऊन पिऊन सुखी वाटतो तो
पण साहेब काय म्हणाले ते तो सविस्तर वाचतो
पण तेही शेतकरी कायदा आणि
अभिव्यक्ति स्वातंत्र्य असले निरुपयोगी बघून
तो फक्त मनोमन आदर बाळगतो
आणि समजून राहतो मनात
साहेब होणे सोपे नाही

मध्येच शेजारचा पुणेकर फूटवेअर
वाला येऊन विचारतो काय विशेष बातमी
हा साठलेल्या रसामुळे बोलू नाही शकत
म्हणून त्याला पूर्ण पेपरच देऊ करतो
तो नको नको म्हणतो येतो परत म्हणतो

याला साले कोडे सोडवावे तर शब्दही नाहीत
माहीत तो पोझिशन बदलून बसतो
जाहिरातींचे पान बघत

आराम बसायची तर आहे नोकरी
फुकटचा तर मिळतो पगार
हे त्याला त्याच्या भावाचे शब्द आठवतात
इषापेक्षा कंटाळा जीव खातो एड्या
तो मनात म्हणतो
--- ००० ---

सांजसंवाद

एक उंच शुभ्र पाळीव रोज येते या सांजवेळी
त्याच वेळी ही दोन भटकीही असतात इथे
रोजची भेटगाठ होत असल्याने आता मैत्री आहे
ते एकमेकांवर भुंकत नाहीत काय हालहवाल
काही नाही ठीक ते ठीक यूपीचे काय
अजून काही नक्की नाही दोन्ही बाजूंचे अंदाज
जोरात आहेत आणि शेयर मार्केट ते मात्र उद्या
पडणार आहे दणकून तिकडे अमेरिकेत काही झालेय
तुझ्यामुळे आम्हाला कळत तरी राहते सगळे
भटके म्हणतात बरे आपले इथले राज्याचे काय
अरे सोड तो विषय ते रोज म्हणतात पडणार
आणि हे म्हणत राहतात नाही पडणार
आपण बघत राहायचे बरे अजून काय
अरे हल्ली ते लस घ्यायचे चाललेय ना
त्यात झालाय एक घोटाळा आमच्या मालकाने
घेतला दुसरा डोस तेव्हा तिथल्या त्या येड्याने
मोबाइल नंबर चुकीचा टाइप केला त्यामुळे
सर्टिफिकेटच नाही ना मग आता काय होईल
तेच ना प्रॉब्लेमच झालाय आणि हे साले मध्येच
जाहीर करतात दुसरा डोस घेतला असेल तरच
इथे जाता येईल अमुक करता येईल वगैरे

कंप्लीट झालेली अशी काही आहे का बातमी
की बाबा आता निवांत झोपता येईल अशी
सध्या तरी असेच आहे सगळे मला खिसे
असायला हवे होते रे मी तुमच्यासाठी
आणली असती काही बिस्किटे मस्त असतात
अरे तू एवढा उंची असून मस्त खातपीत असून
आम्हाला भेटतोस-बोलतोस हेच किती छान आहे
शेयर मार्केट पडणारच का उद्या
बघू ना उद्या भेटूच ना तेव्हा सांगेन वातावरण
खराब आहे सध्या -- बाय – गुड नाइट -- भू भू भेटू
--- ००० ---

उद्या पाहू

निश्चित नेमकी
कशाबद्दलच नसल्याने माहिती
माझे विचार घसरतात
रुळांवरून आणि उलट
बागेत पोहणारे सात्त्विक सज्जन
खऱ्याचे भोक्ते
ऊन पडताच होतात आक्रमक

असे बोलणे सभ्यपणाचे नाही
छे छे असेच बोलायला हवे तशांबद्दल
असे सगळीकडे जखमांचे पोषण
संवर्धन आणि समर्थन पाहून
निघून जातो माझा न्यूनगंड

वाटेत जिथे तिथे सापडणारी
शिते खाणारी भुते
म्हणतात आम्ही
करतो शितावरून भाताची परीक्षा

एकाच समाजात इतके
विविध विचारांचे
नवनवोन्मेषशाली
सर्जकतेचे आक्रमक आविष्कार
जेव्हा फुलवतात क्रोधाच्या बागा
तेव्हा मला खूप शांत वाटते

कोणताही अभ्यास न करण्यातला
माझा शहाणपणा असो की आळस
हसू शकतो आत्मतुष्टपणे
झोपी जाता जाता स्वत:शी
जगाचे काय झाले ते उद्या पाहू
या विचारात
--- ००० ---

भेटत राहूच

परवा
वेटिंग फॉर गोदो
ला आपण एकत्र होतो
आज
सिक्स कॅरॅक्टर्स
ला
अशाच होत राहतील भेटी
पण तुम्हाला सांगू का
बेकेटपेक्षा पिरांदेल्लोच
मला अधिक भावला
त्याच्यात कसा ड्रामा आहे

पण बेकेटमध्ये
जेवढे निरर्थक वाटते तेवढे
सखोल सिक्समध्ये नाही वाटत
तसे तर मग
ज्ञानेश्वरापेक्षा तुम्हाला
तुकाराम अधिक भावत असेल

खरेच आहे ते
तुकाराम तुम्हाला गुंतवून ठेवतात
ज्ञानेश्वर नुसताच
गोडवा करत राहतात

टागोर कसे वाटतात तुम्हाला
खरे सांगू का
रमवणारी स्वप्ने वाटतात ती
आणि शेक्सपियर
तो तर अप्रस्तुतच वाटतो आता

वेगवेगळी आहेत आपली मते
छान वाटले भेटत राहूच
--- ००० ---

करकोचा

खरेच सांगतो, करकोचा मी पाहिलेलाही नाही. चित्रपटातही नाही. आपल्याकडे बऱ्याचदा बगळे दाखवतात. करकोचे नाहीत. बगळ्यांची माळ ठीक आहे पण करकोच्यांची माळ ऐकलीय कधी कुणी ? तर जे मी पाहिलेलेच नाही वा मला माहीतच नाही किंवा सतत कानावर पडतेय, असेही नाही, ते कसे येईल माझ्या बोलण्यात ? लहानपणी ती कोल्हा-करकोचा गोष्ट ऐकली होती, इतकेच. पण ती काही इतकी अगदी माझे मन व्यापून बसलेली नाही. आणि कारणच काय मुळात ? तो पक्षी आहे, हे इतपत ठीक पण याहून जास्त काहीच नाही. माझ्या बोलण्यात तो यायचा चान्सच नाही. शेवटी कितीही, कुणीही असो, त्याच्या वा तिच्या मनाच्या कक्षेत असेल तेच बोलणार ना ? तर तुम्ही म्हणालात की मी करकोच्याबद्दल बोललो. एक वेळ बगळा ठीक पण करकोचा ? नोप ! मला तर असेच वाटते की बगळयावर बोलण्यासारखे काही नव्हतेच तुमच्याकडे म्हणून मुद्दाम तुम्ही करकोचा आणलात. तुम्हाला तरी समजतो का करकोचा, हा डाऊटच आहे मला. पण करकोचा खोडून काढायला तुम्हाला सोपा वाटला. त्याच्या विरोधात काही आर्ग्युमेंटस तयार होती तुमच्याकडे. आणि मला तुम्ही नामोहरम केलेत असे दाखवता यायलाच हवे, ही तुमची मानसिक निकड होती. कारण, तसे तर मी बगळ्याबद्दलही बोललो नव्हतो. पण मी बगळ्याबद्दल बोललेलो असू शकतो हे लोकांना पटू शकते, त्याचा फायदा घेऊन तुम्ही जरा पुढे गेलात. आणि माझे म्हणणे म्हणजे करकोचाच आहे असे दाखवत मला हरवण्याचा तुम्ही घाट घातलात. आता मी कितीजणांना सांगत बसणार की अहो, नाही, मी पार अनभिज्ञ आहे करकोचाबद्दल ? खरे तर तुम्ही माझ्या नावावर हा करकोचा खपवलात त्यामुळे या शब्दाकडे माझे लक्ष तरी गेले. अन्यथा कारणच नव्हते काही. पण त्यामुळे दृश्य असे झाले तयार की करकोच्यावरून पुढे तुम्ही जे बोलताहात ते तुमचे बरोबरच आहे. तुम्ही हे असले क्षुद्र गेम खेळावे हे मला काही आवडलेले नाही. पण मी काय म्हणतोय हे तुम्हाला समजतच नसल्याने तुम्हाला वाटते की पूर्ण मलाच निकालात काढावे. पण एक लक्षात घ्या, माझे अमुक असे म्हणणे आहे असे काहीही सांगत निरनिराळे लोक मला ठिकठिकाणी खोडत राहतील. सगळे कदाचित माझ्यापर्यंत येणारही नाही. आणि समजा कळले ते मला तरी असे किती ठिकाणी मी स्पष्टीकरण देत बसणार ? आणि मीच बरोबर असे सिद्ध करायची जिद्द तरी कुठाय माझ्यात ? किंबहुना असे वादात जिंकणेबिंकणे हे मला निरर्थकच वाटत आलेले आहे. माझ्या मताप्रमाणे जग घडले म्हणजे सर्व माणसांसाठी तो स्वर्ग असेल, असा भ्रम माझ्या डोक्यात नाही येऊ शकत. कारण पाहतो ना मी, जग कसे असायला हवे हे सांगणारे लोक ! या सगळ्यांचा महत्त्वाचा प्रॉब्लेम मला हा दिसतो की हे जग आता आहे असे भंगार कशामुळे झालेय हे नाहीच घ्यायचेय त्यांना समजून उलट तो प्रश्नही नकोय त्यांना समोर म्हणूनच तर ते जग कसे असायला हवे त्याच्या कल्पना लढवत राहतात.

माझे म्हणणे एवढेच असते की सध्याचे जग हे मतमतांतरांचे आहे. मग त्यात अस्मिता, कट्टरता, अतिरेकीपणा, दहशतवाद, हे सगळे आले. एकदा तुम्ही मतस्वातंत्र्य म्हटले की थांबवणार कुठे ते ? म्हणजे सगळे मान्यच होते ना यात – संघर्ष, हिंसा, अन्याय, विषमता ? तुम्ही म्हणता की तुमची मते स्वर्ग आणणार आहेत आणि तो नेमक्या तुमच्या विरुद्ध मतांचाही तेच म्हणतो – त्याची मतेच हितकारक आहेत ! म्हणून  मी म्हणत होतो की मतांचा हा मार्गच नाकारता येईल का ? मी मत नव्हतो मांडत. पण यात तुमचे मत खोडले जाते असे तुम्हाला वाटले. आणि खोडण्यासारखे तर मी काही बोलतच नव्हतो. म्हणून हेतूपूर्वक तुम्ही करकोचा आणलात. मी एवढेच करणार -- आपल्याला काही म्हणायचेच नाहीय तर खोडले काय जाणार, असे म्हणून दुर्लक्ष करणार. दुसरा काय आहे प्रश्न ? मी असा सगळीकडे खोडला जातोय असे दिसत राहिल्याने माझी प्रतिमा पराभूत दिसेल का ? अहो, प्रतिमा म्हणजे सादर केलेले एक मतच तर असते ! माझ्या प्रतिमेची तरी मी कशाला काळजी करू ? चालू द्या तुमचे ! यातून होणार काय शेवटी – सगळ्यांचीच मते जोरात चालू राहणार, कुणाच्याच मताप्रमाणे पूर्ण काही घडणार नाही आणि नुसतेच कुणी जिंकत आणि कुणी खोडले जात राहणार ! करकोचा हाच विषय सतत चर्चेत ठेवा तुम्ही ! चालू द्या !

--- ००० ---

गुप्ती

हा लालशर्ट स्कूटरवाला गेला की मागे काही नाहीय
सहज रस्ता क्रॉस करता येईल
पण साला तो मोबाइल बघत बघत चालवतोय स्कूटर
तो पूर्ण गेल्याशिवाय विचारही नको
बघत बघत चालल्याने वेळ गेलाय
तेवढ्या वेळात मागून आणखी दहाबारा वाहने येताहेत
म्हणजे माझे आता रस्ता क्रॉस करणे लांबणीवर पडले
त्याचे मोबाईलवर काही अर्जंट महत्त्वाचे असू शकते वा सुखमय
म्हणजे माझे पलीकडे जाणे कमी महत्त्वाचे कसे

मोबाइल बघत स्कूटर चालवून त्याने रस्त्यात धोका तर निर्माण केलाच होता
शिवाय माझी अमूल्य महत्त्वाची पाच मिनिटे वाया घालवली होती
आणखी असतील काही माझ्यासारखेच

त्याचा रागही आला आणि भीतीही वाटली
भडवा धडकेल कुठेतरी आणि हॉस्पिटलचा बसेल लाखांचा बांबू
शिवाय हाल होतील ते वेगळेच
आणि मेलाच तर त्याची पोरेबाळे अनाथ होतील ते वेगळेच

म्हणून नेहमी दुसऱ्याचा विचार हवा
आपल्यामुळे कुणाचा वेळ वाया जाऊ नये ही जाणीव हवी
म्हणजे सगळेच धोके कमी होतील आणि नुकसान होणार नाही

पण हे कोण कुणाला सांगणार
सगळीकडे कुठे पोलिस असणार
आणि सांगायला जावे तर एकदम शर्टाखालून त्याने गुप्तीच काढली तर
आपण घाबरून राहणे हेच कमीत कमी नुकसानीचे आहे
चला आता करावा रस्ता क्रॉस
--- ००० ---

बिझिनेस

जे जे अस्फुट असते
ते ते स्पष्ट खाद्यपदार्थांत
रूपांतरित करायचा बिझिनेस

त्याला सुचला होता
पहाटेच्च्या स्वप्नात

त्याने हाक मारली
तेव्हा आवाजच नाही फुटला
त्या ऐवजी फुटली
त्याची स्वत:चीच निऑन प्रतिमा

आता घाबरण्यात अर्थ नव्हता
मग तर कुणीही
हाच गेम खेळून
हवे ते करायला लावेल

पाऊस पडायला लागला
ते बरे झाले वाईट एकच आहे
की अशा वेळी नको ते आठवते
जसे की अपघातात गेलेली
आपली गोड मनीमाऊ

लावूच नये कुठे लळा
बाहेरू जे जे मिळवले
ते ते त्रासच देते साले

पहाटे लौकर उठून
नुसती गाणी आठवत बसावे
जाऊ दे बाकीचे ढगात
--- ००० ---

प्राचीन

विक्षिप्त म्हणून ज्याची
जराही नाही प्रसिद्धी
तो असतो सपाट आळशी
कंठणारा काळाचे कागद
कपाळावर गोंदवत
इतरांचे अपराध
नाइलाजाने

जो थोडे अनावश्यक
विचार करतो
तो असतो थोडा विक्षिप्त
आणि जास्त करतो तो जास्त

डल जेलीपेक्षा
चेहऱ्यावर हवेत
असंख्य अनावश्यक
विचारांचे ओरखडे
आता मला
संसर्ग तर नाही होणार
इथपासून ते
इथल्या लोकांना स्वत:चे
हितही नाही कळत
कळायची शक्यताही नाही दिसत
असे सतत काही ना काही प्राचीन

माकडाच्या हातात विचार
असे हवे जगणे
स्वत:ला आणि इतरांनाही
त्रास देणारे
त्याशिवाय जगण्यात
आकर्षणही नसेल आणि तिरस्कारही
मग प्रेम कुठले असणार
--- ००० ---

व्यापक

व्यापक म्हणजे काय
६-७ शे पानांच्या
दहा कादंबऱ्या
की किमान
चार धर्मांचा
तौलनिक अभ्यास

घराजवळ नोकरी
आणि एका फुटकळ
रस्त्याशिवाय काही
माहीतच नसल्याने
स्वप्नातही वर्गविग्रह
आणि भिऊ नकोस

जे ऐकेल ते याला पटते
म्हणजे हा
कुतुबमिनारवरून
जंप मारेल की काय
शाळेत वाचली
तीच कविता शेवटची
समजून किती भावपूर्ण

मनाला समजा
नाही मिळाली कॉफी
मुद्दाम काही दिवस
तरच कळेल का याला
आख्खा जन्म
सेक्स मिळवण्यातच
चाललाय ते

उदबत्ती की धूप की कापूर
याचाच निर्णय थांबलाय अजून
--- ००० ---

स्त

तुमचे स्वस्थ असणे
म्हणजेही
त्रस्त असणेच असते
कारण तुम्ही स्वत:च
टाकलेले असते स्वत:ला
काळापुढे
तुम्हाला फस्त
करत राहण्यासाठी

तरीही तुम्ही
गस्त घालत राहता
स्वत:भोवती जगणे
आपणच केलेय
स्वस्त हे माहीत असून

खस्ता खाव्या लागल्या
तरी पुढे मस्तीत जगण्याचे
ध्येय असावे
या एकाच विचाराने
सतत व्यस्त राहात
आपण रजा नाही घेतली
एकही दिवस

कुणी वास्तपूस्त
करो ना करो
आपण जरा जास्तच
हळवे होत जगत गेलो
शेवटी वस्तीला आलो
तेव्हा रात्र सुस्त पसरत होती
धास्तावत पस्तावत
जगण्याचा फाटताना
पुस्तकी दस्त
--- ००० ---

माशी

खिडकीच्या काचेतून सरळ
एक माशी आत येताना पाहिली
आणि दरदरून घाम फुटला
घरात मी एकटाच आणि हे अघटित

तिच्यावर लक्ष ठेवले
तिच्या पंखांचीही स्तुती
करायची तयारी ठेवली

आधी ती
पुस्तकांच्या कपाटाच्या
काचेतून थेट आत गेली
आणि पुस्तके कुरतडू लागली
त्यांत बरेच संदर्भग्रंथ होते
साहित्याचे नाटकाचे इतिहास होते

तिच्या आकाराच्या मानाने
बरीच केली तिने नासधूस
तिच्या नुसत्या असण्याने
दिसण्याने माझे जगच धोक्यात आले

आता एकच भीती वाटू लागली
ही माझ्या मनातही शिरू शकेल की काय
या घरात हे असे चालू आहे
हे कुणाला कळणारही नव्हते

पण तिला मात्र मनाचा कोपरा न कोपरा
दिसणार होता माझ्याच आयुष्यात
का आलीय ही या विचारात असूनही
तिला कोणताही विरोध नाहीच करायचा
हेच ठरवलेले होते ही तर पूर्ण
आयुष्यावरच शिंकणारी माशी होती
--- ००० ---

सं ---

हा या चौकटीबद्दल संवेदनशील
तो त्या चौकटीबद्दल आणि तो तिसरा
एक म्हणजे लाख या चौकटीबद्दल

कामगार म्हणून संवेदनशीलतेत
ते मिक्स होतात तसेच बीजेपीच्या
आणि राष्ट्रवादीच्या

एक विश्वकोशाबद्दल संवेदनशील
तर दुसरा ऑफीसबद्दल
तिसरा तर कवीच
तो तर संवेदनशीलतेबद्दलच संवेदनशील

फावल्या वेळात अपराधभाव नको म्हणून
सगळेच थोडे थोडे जरा जरा
बाहेरही संवेदनशील

एकाला तर संवेदनशीलता
किती महत्त्वाची आहे यावर
अनेकांना पटवायचे असते
तो त्याच्या अभ्यासाबद्दल संवेदनशील

चोवीस तास कसे जमेल
ज्याला जे लाभलेय जगणे
अपघाताने का असे ना
ते तर जगून मगच जमणार ना
सगळे उधळून देऊन पोरेबाळे
मातीत घालून कसे होणार सं –

तरी चुकतेय काहीतरी
इतर देशांतली गरिबी
वर्णभेद धर्मभेद विचारभेद
यांतली दु:खे आणि युद्धे
राहूनच जाताहेत

सगळ्यांचेच बरोबर असल्याने फार

प्रॉब्लेम होताहेत शिवाय ताकदवराला
त्याची चूक कशी सांगणार
यातली अगतिकता म्हणून सगळ्यांनाच
दारू प्यावी लागतेय जग तात्पुरते तरी
नजरेआड करण्यासाठी
त्याचसाठी एकजण ध्यानात जातोय
--- ००० ---

नृत्य

कोणती होती शॉर्ट फिल्म
कोण जाणे
कॉल गर्ल होती
तिला तो विचारत होता
काही
ती शास्त्रीय नृत्य शिकत होती
पण राहिलेच ते
ती क्लबमध्ये नाचू लागली

तो म्हणाला
तुझ्या मनासारखे
व्हायला हवे होते
ती म्हणाली होतेयच की
नाचते आहेच की मी
आनंदही मिळतोय अनेकांना

तो गप्प बसला
ते बरोबर आहे पण
प्रसिद्धी ग्लॅमर मिळाले असते

जणू त्याचे मन ओळखून
ती हसली
तीन दिवस राहिलेय
आता जायला हवे
तू ब्रम्हचारी होतास का
प्रेयसी नाहीच मिळाली तर तिने विचारले
तो म्हणाला नाही
आणि तू
त्याने विचारले चुकून
ती हसली माझ्या नृत्यातून
मी आयुष्य देते फेकून
ते खूप आवडते लोकांना ती म्हणाली जाता जाता
--- ००० ---

निर्दोष

कोर्टात ती म्हणाली
तिला काही आठवत नाही
त्यामुळेच तो निर्दोष सुटला
जोसेफ म्हणालाच होता
तिला नाही आठवणार काही
त्यानेच केली असणार
ती व्यवस्था

तो विमानतळावर आला
तर सगळी विमाने थांबवून ठेवलेली होती
कुणी मोठा गुन्हेगार पकडायचा होता

तो विमानातून उतरला
तेव्हा उशीर झाला होता
की सूर्य लौकर उगवला होता

झोपडपट्टीवरून जाताना
त्याने नाकाला रुमाल लावला
मोबाईलवर तो एवढेच म्हणाला
आलोय तयार राहा
सकाळचे साडेनऊ वाजले होते
--- ००० ---

बाजू

एक अहिंसा मानणारा होता
त्याच्या जगण्यात
तो हिंसक वागल्याच्या घटना होत्या
एक नेहमी प्रेमाचे बोले
त्याच्यावर द्वेष्टा मत्सरी व्हायची वेळ आली
एक तर होता माणुसकीचा पुजारी
त्यालाही या जगाने अमानुष केले
धर्माचे नाव न काढणाऱ्याला
मंदिरबांधणीचे बोलावे लागले
जातिअंत मानणारे
जातिद्वेष करत राहिले

सामान्य माणूस शहाणा निघाला
असेच असते सगळे हे समजणारा

पण बुद्धिमान हुशार विद्वान लोक
ओरडत राहिले
तेव्हा तुम्ही काय केलेत
तेव्हा का शेपूट घातलीत
तेव्हा कसे लपून बसलात
तेव्हा कसे फायद्याच्या वळचणीला गेलात
त्यांची बाजू घेतलीत तशाच यांच्या वेळी
काय तुमची दातखीळ बसली होती का

मग बहुतेकांनी आधीच ठरवले
मरू दे ते सगळे आता एकाच कुठल्याही
तत्त्वाने जग चालणे शक्यच नाही
आपण एक बाजू ठरवून टाकू
त्याच बाजूला राहू
तीच कशी तत्त्वशील आहे हे सांगत राहू
भांडणे होवोत बीपी वाढो
की मर्डर होवोत एकमेकांचे
--- ००० ---

पण मी आहे ना

सवयीला कळतो आत्मछळ
पण ती म्हणते
मीच कशी सुटणार माझ्यातून

सवयीचे म्हणणे असते
सगळ्यांनी चांगले वागले की झाले
आपापली कामे करावी
कुणी कुणाला त्रास देऊ नये
ना अध्यात राहावे ना मध्यात
की झाले आहे काय त्यात

पण एकीला गाणे हवे असते
तेव्हा दुसरी असते सेक्ससाठी अधीर
मग वेळ येते संघर्ष तडजोड सूड यांची

पण सवयीला वाटते ती सत्य आहे
तिला कळते जग कसे निर्धोक
आणि सुखी होईल
ते ती सांगू शकते
आणि या ज्ञानासाठी
जगाने तिला लक्षात ठेवावे
तिची स्तुती करावी
इतिहासात तिला नोंदवून ठेवावे
पुढीलांच्या सवयींनी करावे तिचे अनुकरण

सवय म्हणते मी सत्याच्या बाजूची आहे
मानवी मूल्यासाठी मी प्राण देईन
खूप सवयींना नाही कळत
नेमके जगाचे भले पण मी आहे ना

माझ्या क्षेत्रात ढवळाढवळ नाही चालणार
तुम्हाला समजून घ्यायचेच नसले
तर सक्ती होईल सर्वांच्या भल्याच्या
आड येणाऱ्यांना मुळीच खपवून घेणार नाही
संकुचित भेदभावांना खतम करू
मीच फक्त अमर्याद खरी आहे
--- ००० ---

त्याग

माझी भाषाच तुम्हाला हास्यास्पद वाटत होती असे नव्हे तर माझ्या आठवणींच्या सावल्याही तुम्हाला तुडवून काढायच्या होत्या. खरे तर तुम्हाला एक कळलेले होते की नको तो गौप्यस्फोट होऊन गेलेला आहे आणि आता कोणतेही बदल थोपवणार नाहीत उघडकीला आलेला तुमचा रोग. पण त्याचाच राग तुम्हाला काढायचा होता आणि साहजिकच मीच होतो निमित्त ती जखम खोलली जाण्याचे, हे तुम्ही जाणून होता. आता तुम्हाला परतीचा मार्गच उरला नव्हता, याने होणारा तुमचा तिळपापड निदान भटक्या कुत्र्यांना तरी ठार करेल आणि त्यामुळे तुमच्या मेंदूतल्या पेशी शमतील, असे तुम्हाला वाटत होते. आता होता कुठे तुम्ही आनुवंशिकतेचे बंदी ? आहे त्या संसारात क्रांती करत राहण्याचे तुमचे स्वप्न भंगून गेलेले होते. मला का धरत होता तुम्ही जबाबदार ? कारण, असलेले, दिसणारे कोणतेही अस्तित्व सहन नसते करू शकले तुमचे हे वैरभाव. पण मला नगण्य लेखणे तुम्हाला अपमानास्पद वाटत होते. मला महत्त्व दिले तरच तुमच्या क्रोधाला कोंदण मिळणार होते ऐतिहासिक विश्लेषणाचे. वर्षानुवर्षे चाललेला प्रवास कंटाळवाणा असला तरी धोकादायक नव्हता. तुमच्या प्रेयसीचा लठ्ठपणा हा काही अगदी गगनाला गवसणी घालणारा प्रॉब्लेम नव्हता. तिला तर तुम्ही सांगूही इच्छित नव्हता की एका नगण्य कबूतराने चोच मारली होती तुमच्या असण्यावर आणि त्याने विद्ध झालेली होती तुमची सर्वमान्य दुनिया.

लपवूनच ठेवायचे होते तुम्हाला माझे असणे. मी तुम्हाला माहीत झालेलो होतो ते निष्कारण तुम्ही माझ्या नादी लागलात तुमच्या खिन्नतेत म्हणून. लोकांना हे कळणे शक्यच नव्हते. तुमची काळजी घेण्यासाठी तुमचे आप्तस्वकीय कधीही तयार होते पुन्हा तुमची हरवलेली शिफारसपत्रे शोधून द्यायला. तुमचे राग लोभ प्रेम लळा एवढेच काय तुमचे संतापही शाबूत राहावे अशीच त्यांची इच्छा होती. तरच हे जग, नष्ट होण्याच्या भीतीशिवाय करू शकणार होते शास्त्रीय राजकीय आर्थिक सामाजिक सांस्कृतिक आणि भौगोलिक प्रगती. कारण कुणाचीही जखम उघडी राहणे म्हणजे सतत अनिश्चिततेचे सावट वाहू देत राहणे होते. त्यांची मुले त्यांनी घातली होती सैनिकी शिक्षणात आणि सीमाभाग शाबूत ठेवणे मस्टच होते. आतले अन्याय हळूहळू आज ना उद्या जाळून टाकता येतील पण जगात हसे होऊ नये हे महत्त्वाचेच होते, याबद्दल त्यांना वा तुम्हाला शंकाच नव्हती.

पण सुदैवाने वा दुर्दैवाने तुम्ही अंड्यातून बाहेर पडलाच होता. आता परत अंड्यात कसे जाणार ? आता तुम्हाला एकच मार्ग होता, तो म्हणजे पुन्हा तुम्ही खिन्नतेत गेला आहात असा बहाणा करणे. आणि तुमचा देवावर विश्वास असल्याने तुम्ही औषधे घेणार नाही, असे म्हणणे. समुपदेशनाला येणाऱ्या कुणालाही, सारखे लैंगिक बोलून पळवून लावणे. तुम्ही त्यांचेच आहात हे दाखवत राहण्यासाठी आता तुम्ही त्यांच्यापासून तुटला आहात असे भासवणे अत्यावश्यक होते. आणि तसे, मनातून, म्हटले तर, माझ्यावर राग काढत राहण्यात काही तथ्यच नाही, हे तुम्हाला समजत होते. पण जगाच्या व्यवहाराला व्यवहारानेच उत्तर तर शोधावेच लागणार होते. अस्तित्व टिकवायचे असेल तर साशंकता आणि संशय यांचा त्याग करावाच लागणार होता.

--- ००० ---

कला म्हणजे

मध्यमवर्गीय कसली लिहिणार कविता
रोमँटिक कसली लिहिणार कम्युनिस्ट असो
की ब्राह्मण कसली लिहू शकणार कविता

हे सगळे काही नसलेल्या
समजा गांधीवाद्याला
उपयोग काय त्याचा
किंवा दलिताला

खरे आहे जसेच्या तसे काहीच नाही
ज्याची त्याची कविता
ज्याच्यात्याच्यापुरतीच असणार
हेच खरे म्हणजे आत्मचिंतनच
एक प्रकारचे

हिंदूंप्रमाणे गुहेत वा बुद्धाप्रमाणे
झाडाखाली बसावे हेच योग्य होईल

न जाणो कंटाळा येऊन
लिहिण्यापासूनच
मिळून जाईल मुक्ती

सारांश कला म्हणजे
संपर्क नसणे आणि
कलेचा कंटाळा येणे
--- ००० ---

साप, पक्षी आणि माणूस

डोंगराळ रस्त्यावर जाणाऱ्यायेणाऱ्या कार्सखाली सापडून मेलेले अनेक लहानमोठे साप दिसतात. लहानच जास्त. त्यांना कळतही नसेल की आपण जिवंत होतो आणि आता मेलोय. त्यांच्या बाजूने बोलायला वकीलही नसतात कुणी. फक्त एकदा एक मोठा साप तिथून जाताना रागावून बोलला होता, ते असे होते – यांच्या हातून मांजर मेले की साले पश्चात्ताप म्हणून सोन्याचे मांजर दान करायचा विधी करतात – मग द्या ना आता सोन्याचे साप ! तेव्हा माझ्या मनात विचार आला की याला कसे कळले असेल ते मांजराचे ? कारमधले लोक जर उतरले ना खाली तर कडकडून चावेल हा त्यांना. पण, भावनिक स्मृती जास्त नसते त्याला, हा एक प्रॉब्लेम असतो त्याचा. किंवा नसतो, असेही म्हणता येईल. त्याच्या चकचकीत त्वचेसारखाच, किंचित पावसात भिजलेला नागमोडी रस्ता हे सगळे रोजच पाहतो आहे. पण कुणाचे बरोबर कुणाचे चूक हे त्याला कळू नाही शकत. तरी त्याला थोडे वाईट वाटतेच. पण तो त्याचे काम नाही थांबवू शकत. माणसांच्या जगातल्यासारखे न्यायदान त्याला कसे येणार ? पण त्याला कुणी दोषही नाही देत. जवळून उडालेला एक पक्षी म्हणाला, इतक्या कशाला लागतात भावना आणि कल्पना ?

मी वर पाहिले. मला उंच उडणारे पक्षी दिसले. त्यांना हा असा गाड्यांखाली मरायचा धोकाच नाही. एकदा तर मला प्रश्नच पडला होता की मरतात तरी कसे हे ? उडता उडता हार्ट अटॅक येऊन वा स्ट्रोक आल्याने थेट खाली पडून मेलेत, असे तर कधी दिसत नाही. मग एकाने सांगितले, म्हातारपण, आजार हे त्यांनाही असते पण मरायच्या वेळी ते असे बाहेर नाही काही उद्योग करत. त्यांच्या घरट्यात वा लपण्याच्या ठिकाणी ते जातात आणि तिथे मरतात. त्यांचे विघटन लौकर होते. किंवा कुठे खालीबिली पडले तर तसले मेलेले अन्न चालणारेही काही असतात. तसे संपतात मग ते. अंत्यदर्शनबिर्शन काही नाही. मयत पक्ष्याच्या साथीदारांना दु:खबि:खही होते म्हणे !

माणसालाच कटकटी फार. जाळा, पुरा. पण मेल्यावर काही कळतच नसणार म्हणा ! तरीही त्याच्या आठवणी जागवा, श्राद्ध करा, आणि असे वर्षांनुवर्षे करा ! आणि फारच मोठा कुणी असेल तर त्याची स्मारकभवने उभारा, रस्त्यांना नावे द्या, पुतळे उभारा, पुतळ्यांच्या विटंबना करा, त्यांतून दंगली करा, एकमेकांचे मर्डर करा आणि मग शेवटी सलोख्याचे, शांततेचे आणि प्रेमाचे महत्त्व चर्चेत ठेवा ! सर्वांत बुद्धिमान प्राणी माणूसच – निर्विवाद !
--- ००० ---

## अंगण

कवितेचा अर्थ समजावा
म्हणून त्याने
पुरातत्त्व विभागातून लाकडे आणली
ती लाकडे म्हणाली जरा
दोन पावले पुढे गेला असतात
तर पुराणतत्त्व विभाग होता
तिथून अधिक रिच झाली असती
सुरुवात

अर्थ कळायला हवा असेल
तर तो आधीच
माहीत असावा लागतो
स्वत:चे अवडंबर शाबूत ठेवूनच
अवलोकावे लागते नवे अंबर
जे आधीच कळलेले आहे
ते अंधारात जायची
रिस्क कुणी का घ्यावी

आणि वाचकांशिवाय कवी
म्हणजे तर तो न-कवीच की

एकरेषीय अर्थ
उपरोध अलंकार गोडवा
भावना आणि मंजुळ नाद
आणि मुख्य म्हणजे
अनुभव मते काय व्हायला हवे
त्याचे नकाशे
हे सगळे काही नसेलच
तर अर्थ कसला सापडणार

आपापल्या अंगणात नाचण्यासाठी
च तर असतात कविता
--- ००० ---

बरोबर

कुणाही दोघांत संघर्ष झाला
की दोघेही बरोबर असतात
मग न्यायालय काहीही देवो निकाल

हे एक साधे सत्य न कळल्यामुळे
भलत्याच रस्त्याला गेलेल्या मधमाशा
परत आल्याच नाहीत त्यांच्या आवाजांकडे
डोळे लावून बसलेल्या मुंग्या
कंटाळल्या शेवटी थकल्या
निराश झाल्या

त्यांची अवस्था पाहून ओशाळलेले
दिवे मंद होत गेले जणू
त्यांनाही नकळत
त्यांचे डोळे कोरडे पडले होते

ही शांतता म्हणजे जणू
मृत्यूपूर्वीचे ढगच
असे समजून सर्वच उंदीर
आपापल्या बिळांत गेले

इतक्या वर्षांचा त्यांचा व्यासंग
मातीमोल ठरला होता
--- ००० ---

दगड

सकाळी तुम्ही उठता तेव्हा तुमच्या डोक्यातला तुमच्या स्वभावाचा दगड संपृक्त होऊन घट्ट झालेला असतो. काही मिनिटे तुम्ही बोलतही नाही कुणाशी. त्या दगडाने तुम्हाला पूर्ण तोडलेले असते आजूबाजूच्या हवेपासून. आता पहिले काम हेच असते की त्याला थोडा तरी मऊपणा आणणे. अन्यथा या एकाकीपणाने या जगातून निवृत्तच झाल्यासारखे होईल आयुष्य. खरे तर हा दगड, जगणे कंटाळवाणे, कोंडलेले, क्रूर आणि दु:खी करत राहतो, हे कळत असूनही काही करता येत नाही. पण खोटे कशाला बोला, मधून मधून सुखाचे कारंजेही उडतातच की त्यातून ! पण साले ते आपोआप त्याच्यातून नाही उडत. सारखे बाहेरून काहीतरी घडावे लागते. स्पर्श वा बातमी वा आठवण. हा दगड साला चेहऱ्यावरही करतो परिणाम बाहेरच्या. कितीही नको वाटले तरी तुम्ही कोण आहात, कसे आहात ते सारखे अधोरेखित करत राहतो. त्यामुळे, त्या मर्यादेतच लोक आपुलकी ठेवतात, घाबरतात, सावध राहतात आणि काळजी घेत राहतात त्यांच्या त्यांच्या आयुष्याची. त्यातून प्रेमाचा माहोल जो उभा राहतो तो म्हणजे असतो काहीशा मऊ पडलेल्या स्वभावांचा आनंदोत्सव. रात्रीची सहल आणि दिवसाचे सिनेमे एवढाच फरक वागवत. उत्तम दारू असावी, खाद्यपदार्थांची रेलचेल असावी आणि दगड विसरत राहणे जमत राहावे, असे मस्त सगळे ! शेवटी जे काय बोलायचे, ठरवायचे ते वस्तू आणि माणसे यांबद्दलच तर असणार. हेच तर नैसर्गिक असते. दुसरे काही तर कल्पनेतही आलेले नसते.

यातून आता माणसे, वस्तू, निसर्ग दुरावत जाणे तर घडणारच ना. ते अगदी तर्काला धरून आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाचेच तर आहे. त्याचे परिणामही घडणारच ना काही ना काही. तुम्ही ठरवता की याला नियती न म्हणता विज्ञान म्हणायचे. खरे तर शब्द, भाषा तुम्ही हळूहळू शिकत आलेले असता – त्यातूनच तर तुमच्या दगडाचे शिल्प तुम्ही घडवत आणलेले असते. ते मात्र तुमच्या बाहेर दिसणाऱ्या शरीरासारखे नसते. ते असते पिकासोच्या चित्रासारखे – हात भलतीकडेच असलेले, डोक्यामागे नाक आणि छातीवर डोळे असलेले. मुख्य म्हणजे तुम्हाला स्वत:ला नग्न आणि कुरूप दिसणारे पण थोडेफार गुप्त ठेवता येणारे. बाहेर तुम्ही म्हणता की पिकासो खरे तर आपले खरोखरचे असणेच चित्रित करतो – हिंसक आणि प्रेमाचा अभाव असलेले आणि तरीही शांततेचे ढोंग करणारे. त्यामुळेच तर आपल्याला तो हवासाही वाटतो आणि त्याचा तिरस्कारही वाटतो. यात तत्त्वज्ञान कसले आलेय ? जे आहे ते आहे !

पण कधी तरी येतोच विचार साला की याहून वेगळे काही शक्य असेल का ? छे छे, हा प्रश्न तर आध्यात्मिक आहे, निसर्गबाह्य आहे, काल्पनिक आहे म्हणून तुम्ही फेटाळता. इथे तुम्हाला एक पुसटशी शंका चाटून जाऊ शकते की साल्या त्या नाइलाजाने जोपासलेल्या दगडाला सोडायची भीती तर आपल्याला बुद्धिनिष्ठ करत नसेल ? श्रद्धा नको, नियती नको पण हा जाच आणि ही हिंसा अटळ आहे का, याचा मागोवाच नाही घ्यायचा ? का, कशासाठी हा एवढा बंदोबस्त ? काही हरवण्याची, वेडे होण्याची शक्यता आहे यात की एक प्रकारची काल्पनिक खात्रीच आहे तशी ? आपण प्रेमाचे, आपल्या धैर्याचे कवच दिलेली आपली मुलेही आपण याच चरकात तर ढकलतो आहोत. त्यांना प्राप्त होणाऱ्या अवकाशाची इंचभरही जागा कुणी बळकावता कामा नये, म्हणजे तरी काय ? थोडेफार डिस्टर्ब होत का असे ना, त्यांचे अवकाश शाबूत राहिले की आपल्या कारंज्यांना आयुष्य मिळत राहील, हेच ना ? आपल्या स्वभावाचा दगड जड होत चाललेला जाणवणे आणि बधीर वाटत जाणे म्हणजेच वय होत जाणे ! की ? ---

--- ००० ---

## घटना

खरेच सांगतो मला
कुणाहीसारखेही व्हायचे नाहीय
अगदी नंतर कुणी माझा
पुतळा उभारणार असले
वा माझ्या जयंतीला
गर्दी करणार असले तरी
मरून कीर्तिरूपे उरण्यात
मला इंटरेस्टच नाहीय

मी माझ्यासारखे जगणेच मला
अप्रस्तुतच नाही नुसते तर
अभद्रही वाटते पाहताना
अव्याहत रस्त्यातून
वाहात चाललेला दिशाहीन
रहदारीचा धूर
मीच एक बोझ आहे तर
कशाला वाचू मी
कुणाची चरित्रे

चरित्रे मला अमूर्त वाटतात
माझाच भूतकाळ मला
खोटा वाटतो
तर करू काय मी दंतकथा
बाळगून कुणाच्याही

आणि मलाच काय कुणालाही दिसणारे
काहीही पूर्ण कसे असेल
आणि अंधारातले कल्पून
माझ्या मनाचा धूर
कसा होईल अर्थपूर्ण

घटना घडणे हीच आहे
खरी समस्या असेच मला वाटते
--- ००० ---

रेडियो

( आजच्या आकाशवाणी दिनानिमित्त )

कुवतच नव्हती वडील रोज विचारत दुकानदाराला
आलाय का म्हणजे सेकंड हँड रेडियो आणि एक दिवशी खरेच !
घरी आधी राहिला टेबलाबिबलावर पण मग ब्रॅकेटवर
बसवलेल्या फळीवर झाला स्थानापन्न गणपती
खालीच माझे अभ्यासाचे टेबलखुर्ची वर हा महाराज
अत्यानंद साधासुधा नाही हा होता जगातला अद्वितीय
मूलार्ड कंपनीचा ग्रेट ! शेकडो बिनाकांचा सम्राट
आणि वडील मात्र ऐकत बातम्या आणि शास्त्रीय

सिलोन बीबीसी सगळे रात्रीअपरात्रीच्या सगळ्या कॉमेंटरीज
सर्व नटनट्या गाणी संगीतकार त्याच्यावरून थेट डोक्यात
भावभावनांचे नजारे नजाकती आणि नखरे खूप खूप
लपवत कधी कधी लैंगिक उद्दीपनांचे इमले जणू किती छान
गाणे किती छान गाणे भेंड्याबिंड्या तर नावच नाही काढायचे
मी एकटा एकीकडे असलो तरी बास डार्क चॉकलेटी कॅबिनेट
आणि पिवळसर अंग चार बटणे चार बँड हवा तसा
कमीजास्त होणारा आवाज मग आईसाठी वनिता मंडळ
आपली आवड सगळे तरीही अभ्यासात मी नंबर वन

गाण्यांनी असे भरे आयुष्य की नकोच दुसरे काही
पण एकदोन वर्षांतच गाणी चिरकू लागली
अमिन सायानींचा ड्रामा मध्येच बंद पडू लागला
त्याला दवाखान्यात नेणे चालू झाले पण अभिमान
हा होता की मूलार्ड आहे जगातला अद्वितीय !

सेकंड हँड टीव्ही आला क्राऊनचा तरीही लळा म्हणून
हा विकला नाही आम्ही इतर सर्व ठीकच पण मुख्य म्हणजे
त्याने आयुष्यात भरलेले संगीत !

तसे तर माझ्यापेक्षा तब्येत खूपच चांगली होती त्याची
माझा एकाकीपणा समृद्ध करत राही तो खूप खूप अजूनही
आहे बांधून ठेवलेला दिवाणात अद्वितीय आहे जगातली आणि माझ्या
जगण्यातली वारसा वस्तू भावना संपल्यात आता दहा लाख पडतील
--- ००० ---

तत्त्वत:

तत्त्वत: सर्वांनाच मान्य असतो
बुटांखालचा अंधार याचा अर्थ नवे पेन घेताना
ते कोणतेच दु:ख लिहून पाहात नाहीत असा नाही
प्रत्येकाची कारकीर्द कधी ना कधी
धोक्यात येऊन गेलेली असते
करमणुकीच्या अन्नातल्या विषबाधेमुळे

कुणीही उगीचच जास्त मागे नाही लागत
ज्याचे त्याला प्यारे असतात त्याचे त्याचे हातरुमाल
शाळेत जाताना आईने भांग पाडून द्यावा
तसे असतात सगळे बिचारे काळा बाजारवाले

डोळे वटारले म्हणून क्षितिजावरचा ढग
रंगढंग नाही करत उसनी विद्वत्ता दाखवत आणि
आज ना उद्या आपणही फडकावू बाजारात
पदव्यांची पोस्टर्स याची खात्री बाळगल्याशिवाय
अभिनय क्षेत्रात कुणी कुत्रे तरी विचारेल का

प्रश्न तर पडतातच आणि का पडू नयेत
असा कुठला अमरपट्टा वा शिलाजित अर्क
असतो कुणाच्याही खिशात ज्यामुळे
आपण कंटाळलो की पेटवून देता येईल पूर्ण जग

अर्धवट जादूगिरीचा नसतो काहीच उपयोग
हे असते माहीत भजन करता करता
गुंगी येणाऱ्या सर्वच प्रामाणिक भाजीविक्रेत्यांना
म्हणूनच तर ते भाजी ऐवजी पंचतारांकित
हातभट्टीची स्वप्ने पाहात रममाण राहतात
वर्षानुवर्षे अनुनय करत स्वप्नांतल्या प्रेयसींचा

हीच असते जगरहाटी हे एव्हाना
गळी उतरलेले असल्याने आता नवीन कोणतेच नकोत
प्रलोभनांचे डावपेच म्हणून ते बंदच करतात
सर्वच उत्सव जयंत्या आणि सत्कार

आता काय असते या नव्या कपड्यांच्या आत तरी
चांगला काही अर्थ सापडेल असे सर्व आरसे

उलटेपालटे केले तरी त्यांच्यांतून काहीच नाही सांडत
ज्याला प्रतिबिंब म्हणावे असे पाण्या ऐवजी
शेव्हिंग क्रीमही चालेल असे म्हणणाऱ्यांची जणू
आपण अवलाद असल्याप्रमाणे

--- ००० ---

आई

मला तुझी चीड आली होती की माझी
तुझी कारण सतत आपण
कुणावर तरी अवलंबून आहोत
या भावनेत सतत तुझ्या जगण्याची
आणि ही तुझी भावना मी
कणभरही बदलू नव्हतो शकलो
यामुळे माझी
आता तर मीच होतो ना
माझ्यावरही तू अवलंबून
हे मला अत्यंत अपमानास्पद आणि
माझी मलाच कीव वाटायला लावणारे होते

तुलाच मदतीला बोलवायचे कुणीही
आणि तुझाच अपमान करायचा तुला
क्षुद्र लेखायचे याची मला चीड येई
मी तुलाच बोले दाखव जरा राग म्हणे
तू उलट मलाच समजावेस त्याचीही मला
चीड येई

आणि त्या दिवशी मध्यरात्री आई
तुझ्या खोलीत दिवाणाजवळ तू पडलीस
कड लागून रक्त येत होते वय
एकोणनव्वद तशीच बसून तू
आमच्या खोलीपर्यंत आलीस
दार वाजवलेस उघडून पाहतो तर
रक्ताने माखलेलीस – डोक्याला लागलेले –
मी पडले – एवढेच म्हणालीस चेहरा असा की
तुझ्यामुळे आता सगळ्यांची झोपमोड
मग लगेच इस्पितळ टाके वगैरे झाले – आता
तू नाहीस पण

इतके चांगले म्हणजे नमून वागणारे कुणी दिसले की
माझे डोकेच फिरते त्या व्यक्तीचा मर्डर केला
तरच मी थोडा तरी तुझ्यातून मुक्त होईन असे वाटते
--- ००० ---

दूधच सगळे

रसेलने दिले होते उदाहरण
की नाटक पाहताना
युद्धात मुलेबिलेही नष्ट
करणारे लोक पाहून प्रेक्षक हळहळत
तिरस्कारही करत त्या पात्रांचा
पण बाहेर मात्र स्वत:च्या देशाच्या
तशाच विध्वंसक धोरणाला पाठिंबा देत

आपल्या मालिकाप्रेमी सद्गुण समर्थक
प्रेक्षकांना तरी कुठे असते अक्कल की बाबा
दूध का दूध पानी का पानी असे काही नसते
लाखो प्रेक्षक रोज दाखवतात सहानुभूती
त्यांच्या त्यांच्या सज्जन पात्रांना न पाहता
ती सज्जन दाखवलीय ती व्यक्ती
मुळात तेवढीच असते का आणि दुर्जन
का कशामुळे असतो दुर्जन

आंतरविरोध तर असणारच ना
सर्वानुमते एकच
आणि सतत त्यालाच धरून
अशी कुणाच्या मेंदूत असतील रसायने
आणि सगळ्यांचे पूर्वज एकच कसे असतील

हे सर्व कळत नकळत समजूनही असतात
पुरोगामी प्रतिगामी आस्तिक नास्तिक
कोणत्याही ग्रंथाची उपासना करताना
इतरांबाबतच्या उपरोधिक हुशारीला
अधीर असणारे आणि चांगले माहीतच असल्यासारखे

सर्वांनाच हवे असते सर्वांनाच पटणे
एकच चांगले म्हणजे दूधच सगळे
पण मग ते जगणे कोण जगले असे होईल
हा प्रश्न त्यांना पडत नाही
--- ००० ---

## तरुण

हेच फूल हेच झाड
अशी दहा वर्षे
हे नाही घडले
आपल्या शरीरांत

गाणे सोडून
नग्न एकांत
ही नुसती
कल्पनाच राहिली
आपल्या गुप्त भेटींत

विशेष असे रस्ते
शोधलेच नाही गेले
आपल्याकडून
स्पर्शाच्या आठवणींत
जखमी होत राहिल्याने

अनुभवाची दुनिया
राहिली फक्त
आपल्या जिभांवर
एकाच चवीत

नेमके जे हवे होते
त्याच्या आधीच
जागा पकडल्या
वर्तमानपत्रांनी
आणि अस्ताला जात राहिले
आपले मीलनाचे विचार

तरीही अजूनही
तरुणच आहेत
माझ्या कविता
ज्यांना शब्द तू देतेस
--- ००० ---

आरोप

अहिंसकावर हिंसेचे आरोप
धार्मिकावर अधर्माचे आरोप
डाव्यावर श्रीमंतीचे आरोप
गरिबावर उद्धटपणाचे आरोप

प्रेमिकावर प्रतारणेचे
देशभक्तावर हेरगिरीचे
चालकावर बुडवण्याचे
पोशिंद्यावर शोषणाचे
त्यागावर भोगाचे

राजकारण्यावर
भूमिका नसण्याचे
प्रामाणिकावर
आत्मकेंद्रितपणाचे
कवीवर
संवेदनहीनतेचे
जातिअंतवाल्यावर
जातीयतेचे
समतावाद्यावर
अस्मितेचे

असे आरोपच आरोप
पण सगळेच
सत्य म्हणून निर्दोष

निर्दोषांवर दोषांचे आरोप
सज्जनावर दुर्जनपणाचे
शुचिर्भूतांवर भ्रष्टाचाराचे
ब्रम्हचाऱ्यावर लैंगिकतेचे

सत्यावर असत्याचे दुसरे काय
--- ००० ---

अमानुष

त्याच्या पत्नीकडे संपर्क कौशल्य नव्हते. काही सांगताना ती कुठूनही सुरुवात करे. संबंधित पात्रांची नावे कधी सांगे तर कधी राहून जात. त्या पात्रांचे एकमेकांशी काय नाते हे ऐकणाऱ्याला नीट कळावे, याची काळजीच नसे सांगण्यात. एक तर तिच्या लांबच्या नात्यातले वा माहितीतल्या कुटुंबांचे अद्ययावत रेकॉर्ड त्याच्या डोक्यात नसे. खरे तर त्याला त्यात खास इंटरेस्टही नसे. हे असले बोलत बसणे, हे त्याला वेळ घालवायचे गॉसिप वाटे. त्यामुळे, त्याचे ऐकणेही सदोष असे. पण एक सभ्यपणा म्हणून तो समजून घेत असल्यासारखे बघत राही. मध्येच, चुकून, कुणाचे कोण वा कधी घडला हा अपघात वा कुठे घडला, असे काही विचारे. ती एकदम भडके. सगळे तर सांगितले, असा चेहरा करून जरा चिडून देई उत्तर. तरी त्याला नीट कळतच नसे. पण तो विचारायचा बंद होई. काय होणार आहे नाही कळले तरी, या विचाराने तो गप्प राही. झाले ते वाईट झाले म्हणे. त्यांच्यावर हे एक मोठेच संकट आहे, म्हणे. ती अजून काही सांगत राही. नातेवाईक यायला कसा उशीर झाला, त्या अपघातात गेलेल्या मुलाचे वडील कसे बेशुद्ध पडले, वगैरे. तो फक्त चेहरा गंभीर ठेवे आणि मनात म्हणे, जाऊ दे, मरू दे तिकडे.

असे दोनतीनदा झाल्यावर त्याने न कळलेले विचारायचेच नाही, हेच तंत्र वापरात ठेवले. पण नंतर पुढे कधी त्याचा उल्लेख आला तर ते पुढचेही कळत नसे. तेव्हा मात्र तो कुणाचे कोण ते विचारी. ती जोरदार चिडे. एवढे सगळे सविस्तर सांगितले तर होते. आपला नवरा आपल्याला किंमतच देत नाही, असे तिला वाटे.

शेवटी एकदा तो वैतागला. तू कृपया मला काही सांगतच जाऊ नकोस, म्हणाला. माझा मेंदू जरा स्लो असून माझे आकलन कमकुवत आहे, म्हणाला. कुणा दुसऱ्यांमुळे आपल्यांत नकोत वाद, म्हणाला. यावरही ती चिडली. अर्थशास्त्रातले बरे कळते इतके अवघड आणि हे सोपे मात्र नाही कळत. याचे कारण एकच आहे, ते म्हणजे माझ्याकडे तुमचे लक्षच नसते, असे ती म्हणाली. काय समजायचे ते समज, मरू देत तुझे नातेवाईक आणि माहितीतले सगळे. मला त्यांच्यांत कवडीचे इंटरेस्ट नाही, तो म्हणाला.

हे त्याने एकदा सहज त्याच्या एका मित्राला सांगितले. फारसे महत्त्व नसलेले पण प्रॉब्लेम असलेले असे कसे काही असते, हे सांगताना. मित्र म्हणाला की ही तुझी भूमिका बरोबर नाही. दुसऱ्यांबद्दल अशी असंवेदनशीलता धारण करणे हे अमानुष आहे. मग, नाही बाबा नीट कळले, हे न पाहता माझ्यावर चिडणे, हे नाही का अमानुष – त्याने विचारले. अरे, पण, एखाद्या माणसाचा मृत्यू आणि तुझा होणारा अपमान यांत विवेकाने काही फरक करशील की नाही – मित्राने विचारले. विवेकाने फरक तसा नाही बघायचा, हा म्हणाला. ते जे काय घडले त्यामुळे आमच्या जगण्याला आहे का काही धोका वा त्रास, हे पाहायचे. चिडचिड केल्यामुळे आमचे संबंध बिघडतात, प्रेमाचा नाश होतो – याला महत्त्व द्यायला हवे. लांबचे महत्त्वाचे की जवळचे याचा विवेक हवा. यावर तो मित्र म्हणाला की भूमिका ही मानवतेचीच असायला हवी, मग भले आपले नुकसान झाले तरी चालेल.

हे नक्की ना ********** , मग ऐक – या तुझ्या मानवतावादी भूमिकेमुळे आपले संबंध बिघडले, असे समज – तो म्हणाला. यावर, खड्ड्यात जा मग, तू अमानुष माणसा, तो मित्र म्हणाला.

--- ००० ---

## यश

तो एक साधा सर्वसामान्य असा कॉलेजविद्यार्थी होता. अभ्यास, सिनेमा, क्रिकेट असा. खास विशेष उत्सुकता वाटावी असे फारसे काही नव्हते. पण, एका गोष्टीमुळे त्याच्यात जरा वेगळेपणा आलेला होता. एकदा, म्हणजे निदान असे झाले होते की, त्याला न्यूमोनिया झाला होता आणि त्यातच किंवा त्याच्या परिणामामुळेही असेल, त्याचे बीपी लो झाले होते. लघवी थांबली होती. डॉक्टर म्हणाले होते की मध्यरात्रीपर्यंत लघवी झाली तर ठीक, नाही तर अवघड आहे. तर ते सगळे एकदाचे निस्तरले गेल्यावर गूढ म्हटल्या जाणाऱ्या गोष्टींकडे त्याचे लक्ष जायचे. माणूस मुक्त होतो म्हणजे काय होते, असा एक प्रश्न, फार गांभीर्याने नव्हे, पण, असू दिला होता त्याने मनात.

त्याच दरम्यान वर्तमानपत्रांत बातम्या येऊ लागल्या एका हठयोग्याबद्दल. हठयोग म्हणजे काय, हे त्याला माहीत नव्हते. तसा तर त्याने राजयोग हाही एक शब्द ऐकलेला होता. त्याचाही त्याला अर्थ नव्हता माहीत. तर तो हठयोगी म्हणे पाण्यावरून चालून दाखवणार होता. हठयोग ही गोष्ट सत्य असून ती आहे जगात अस्तित्वात, हे त्याला दाखवायचे होते. त्याने कशी ही खास सिद्धी प्राप्त केलेली आहे, तेही त्याला दाखवायचे असेल. सिद्धी हा शब्द त्याला वर्तमानपत्रातूनच कळला होता. त्याचा अर्थ, एखादे विशेष कौशल्य वा शक्ती असा असावा, असे त्याने समजून घेतले होते. त्या हठयोग्याने वेळ, वार, तारीखही जाहीर केली होती. अनेक वार्ताहर, भारतातली सगळी चॅनेल्स आणि परदेशांतूनही काही प्रतिनिधी हजर राहणार होते. रोज काही ना काही येत होते. मनातून त्याचा याला पाठिंबा होता – असे घडावेच असे वाटत होते. काही गोष्टी या आपल्या इच्छेवर वा मनावर नाहीत अवलंबून, असे होण्यात त्याला बरे वाटेल, असे त्याला वाटत होते. पण, त्यामुळे का म्हणून बरे वाटेल, हे त्याला समजत नव्हते. हे काही घडण्या आधीच काही लोक या प्रकाराची चेष्टा करत होते, खिल्ली उडवत होते. ते त्याला आवडत नव्हते. खूप अभ्यास करून त्याने हे काही मत बनवले होते असे नव्हे, पण, आपोआपच अशा गूढाला पाठिंबा देणेच त्याला समाधानाचे वाटत होते. तरीही, एक प्रश्न होताच – गूढ म्हणजे जर मनाच्या कुवतीबाहेरचे काही असेल तर हा तारीख-वार सांगून जाहीर कसे काय करत होता ? म्हणजे त्याला आता हे गूढ राहिलेच नसेल का, असा प्रश्न त्याच्या मनात येई. इथे त्याला एका प्रख्यात क्रिकेटपटूचे बोलणे आठवे – समजा उंच उडालेला कॅच आहे आणि तो माझ्याकडेच येतो आहे, मलाच पकडायचा आहे – तेवढ्या क्षणांत समजा माझ्या मनात आला विचार की जमेल ना मला, हा सुटला तर माझी किती छी:थू होईल – तर सुटलाच समजा कॅच ! कोणताही विचारच न येता पूर्णच व्हायला हवे ते कॅच पकडणे. मग, हा हठयोगी, आता मी दाखवतोच हे करून, असे मानसिक सगळे मोठे करून कसे काय हे करतोय ? कॅच सुटण्याचीच नाही का यातून शक्यता ? त्याने आधी ट्रायल घेऊन पाहिली असेलच म्हणा ! या कारनाम्यासाठी एक मोठा हौद बांधला होता म्हणे !

प्रत्यक्षात घडले असे की तो हौदावर काठाशी उभा राहिला, त्याने काही मंत्र म्हटले आणि झटकन पाण्यावरून चालायला म्हणून तो सुरू झाला – आणि अरेरे – थेट बुडालाच तो ! दुसऱ्या दिवशी सगळीकडे तो हौदात उभा राहिलेला आणि त्याच्या डोक्या-तोंडा-जटांवरून पाणी निथळतेय, असे फोटो ! त्याला वाटले, बुडालाच होता ना, जाऊ दे – तसेच त्याने एक दहा मिनिटे तरी पाण्यातच राहायला हवे होते – नंतर तो बाहेर आला असता तर अशी नाचक्की तरी झाली नसती ! पाण्यात तो इतका वेळ राहू शकतो, हे तरी काही विशेष घडले असते ! ते काहीही असो, त्याला या अपयशाचे वाईटच वाटले, हे मात्र खरे !

तो अक्षरक्ष: तोंड लपवत होता, सगळीकडे हा विषय टाळत होता. हठयोगातसुद्धा, बघा आता, पकडतोच मी कॅच, असे नसावे बहुतेक, आणि तेच तो करायला गेला आणि फसला. आधी कधीतरी जमले असणार ते त्याला. इथे, मन, विचार, अहंकार यांमुळे तो फेल गेला असणार. त्याला याचे खूप वाईट वाटले. जगातली बरीच अपयशे ही, आता मी

होऊनच दाखवतो यशस्वी, अशा भावनेतूनच घडत असावीत, असे त्याला वाटले. त्यामुळे, खरे तर अपयशी लोकांबद्दल वाईट वाटायला हवे, सहानुभूती वाटायला हवी, असे त्याला वाटले.

पण मग, एक नवाच प्रश्न आला समोर – अहंकार असला तर अपयश येण्याचीच शक्यता जास्त आणि अहंकारच नसेल तर त्या यशाचा आनंद कुणाला होणार ? क्रिकेटपटू हे सगळे सराव करकरून यंत्रमानवाच होत असतील साले ! कॅच सुटायचा प्रश्नच नाही ! मग अगदी कॅचेस पकडण्याचा जागतिक विक्रम करून तरी उपयोग काय ? डेडच ना सगळे ! मयतच तर !

त्यानंतर त्याला अपयशी  लोक बिचारे आणि यशस्वी लोक वेडे वाटायला लागले !

--- ००० ---

युद्ध

रशियाची एक भूमिका आहे.
युक्रेनची एक भूमिका आहे.
अमेरिकेची एक आहे.
फ्रान्स, जर्मनी आपापले काही बोलत आहेत.
रशियातला कम्युनिस्ट पक्ष म्हणतोय की म्हणे हे पुतिनचे युद्ध आहे, आमची याला मान्यता नाही. कोणत्याही एखाद्या देशाने दुसऱ्या एखाद्या देशाचा कब्जा घ्यावा, हे आम्हाला मान्य नाही.
युक्रेनमधले बंडखोर म्हणताहेत की रशियाचे बरोबर आहे, आपण त्यांचे ऐकू या.
भारतानेही योग्य ती भूमिका घ्यावी अशी जगाची आणि विशेषत: युक्रेनची अपेक्षा आहे.
रशिया हा भारताचा, आजोबांच्या काळापासूनचा मित्र आणि संरक्षणाच्या क्षेत्रातला विश्वासू पाठिराखा.
कुणी म्हणताहेत की म्हणे अमेरिकेने इकडून जाणाऱ्या भारताच्या सॉफ्ट वेअर कामांवर नुसता दोन टक्के टॅक्स वाढवला तरी भारताचा बाजार बसेल.
-- ही सगळी समजा सांगोवांगीची उथळ माहिती आणि मुत्सद्देगिरी नसलेले ज्ञान आहे.
तर करावे काय ? युद्ध आणि विध्वंस तर चालू झालेला आहे. आणि त्याची व्याप्ती वाढली तर कशाचे काय होईल आणि मुख्य म्हणजे आपले काय होईल हे कुणालाच नाही सांगता येणार.

यावर, खरे तर, माझा कै. मित्र जयंत पवार एक त्रिकालाबाधित सत्य सांगून गेलेला आहे. ‘ वरनभात लोन्चा कोन नाय कोन्चा ‘ ! हे आमच्या मांजरेकरांना समजले पण या जागतिक वेड्यांना कसे समजणार ? त्यासाठी मराठी ही मातृभाषा असावी लागते आणि तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा याचीही निकड वाटावी लागते.

माझ्या मित्रांत सर्व प्रकारचे लोक आहेत, हे कृपया लक्षात घ्यावे. सकाळी फिरायला गेलो तेव्हा असाच रस्त्यात ओळख झालेला एक मालदार मराठा मित्र भेटला. तो म्हणाला, हल्ली तुमची गँग नाही दिसत. आम्ही ५-६ निवृत्त कर्मचारी रोज एकत्र फिरायला जायचो, त्यामुळे, मला एकट्यालाच पाहून त्याने हे विचारले. मी म्हणालो की एक तर कोव्हिडमुळे आमचे एकत्र येणे बंद झाले होतेच आणि आता तर एकजण अमेरिकेला गेले, एक राहायला लांब गेले, त्यामुळे, तरीही, चल अकेला म्हणत चालू ठेवलेय, मी म्हणालो. यावर तो म्हणाला रोज सकाळी देव आपल्या एक धडा सांगतो, कोणता सांगा – सकाळी उठल्यावर पहिले काम माणूस कोणते करतो ? पाणी पितो किंवा दात घासतो, मी माझे बामणी उत्तर दिले. तो म्हणाला, नाही, हे करतो – त्याने हातात तांब्या धरल्याचे दाखवले. हो, करेक्ट आहे, मी म्हणालो. याचा अर्थ काय, देव आपल्याला दिवस उजाडला कीच लगेच सांगून ठेवतो की बाबा तुझी तूच धुवायची आहेस ! यावर खळखळून हसून आम्ही निरोप घेतला.

पण, तरीही जगाला एक मोठी आशा अजून शिल्लक आहे. तीही मराठी येत नसल्याने कुणाला माहीत नाही. ती आशा म्हणजे मराठीतले बरेच लेखक आणि समीक्षक. करेक्ट भूमिका घेणे म्हणजे काय, हे त्यांना विचारले तर लगेच कळू शकते. प्रश्न वा समस्या काहीही असो, विवेकी भूमिका घ्यायला हवी, असे ते म्हणत असतात. मग, सध्या ज्या वेगवेगळ्या भूमिका दिसताहेत त्या विवेकी आहेत की नाहीत ? आणि ज्याच्यात्याच्या त्या त्या भूमिका विवेकीच असतील तर काय करावे, हे त्यांनाच विचारायला हवे. पण त्यांच्याकडे कुणी ढुंकूनही पाहायला तयार नाही. खरे तर स्वार्थावर आधारित नसलेली, जगाचे भले करणारी भूमिका कशी असायला हवी, ते ते सर्व जगाला शिकवू शकतील. पण, जगात ज्ञानाची कदरच राहिलेली नाही !

यावर, माराठीतलाच एखादा हटके लेखक म्हणतो की माणसाच्या समस्यांवर बौद्धिक निराकरणे नाही सापडू शकत, कशाला शिणवताय मेंदू ? हे ऐकले की ते खवळतात. म्हणजे तुम्ही मूर्षावादाचे – absurdity चे बोलताहात. तोच काय, अस्तित्ववादाचा, बुद्धाचा, सार्त्रचा, गीतेचा, बायबलचा, कुराणाचा, तुकारामाचा, जे. कृष्णमूर्तींचा काळ कधीच संपला. त्या त्या काळाला आलेल्या प्रतिक्रिया होत्या त्या फक्त – आता त्यांतले काहीच उपयोगी नाही – असे ते म्हणतात. त्यांचे म्हणणे असते की आजचा हा काळ वेगळा आहे, आता वेगळी पण योग्य म्हणजे विवेकी भूमिका लागेल ! – आणि ती भूमिका फक्त त्यांनाच माहीत असते, हे यात अध्याहृत असते.

मराठीतल्या भूमिकावाल्यांचे एकच साधे म्हणणे असते – उगीचच हिंसा वाढवू नका आणि सर्वहिताची विवेकी भूमिका घ्या. आमचे ऐकलेत तर नीट, छान जगू शकेल माणूस. – हा आवाज बायडेन आणि पुतिन यांच्यापर्यंत पोचेल तो सुदिन ! त्यासाठी प्रार्थना तरी करायला काय हरकत आहे ? अंधश्रद्धेने का असे ना ?

--- ००० ---

वाचन

कबूल केल्याप्रमाणे घडले नव्हते
मला वाटले मी बहुतेक
वाचनालयात असणार
एका मित्राने सांगितले
त्याने तासाभरापूर्वीच
मला स्टँडवर पाहिले होते

ना कुणाचे पैसे देणे होते
ना एखाद्या दु:खावर
रामबाण इलाज करायचा होता

तसे अवलंबून म्हणावे
असे कोणतेच नव्हते अंकगणित
मी सिगरेट नाही ओढत
पण दारू चालते ना

नगरपालिकेच्या एका जुनाट
बाकड्यावर बसलो
तेव्हा आठवले
सुटलेले धागे

सुसाट गेलो त्याच्या स्टेशनरी दुकानात
आणि माझ्या मनाचे कनेक्शन सांगितले
माझे उद्याचे रिझर्व्हेशन आहे तो म्हणाला
परवा भेटू आणि फेकून देऊ सगळे गैरसमज

तेव्हापासून मी वाचन बंदच केले
--- ००० ---

गुरू

खरे तर तो कुणाच्या शोधातही नव्हता. अध्यात्माचे विचार होते डोक्यात, असेही नाही. पण, आपण फारसे काही न समजता जगत असतो, असे मात्र त्याला वाटत असे. म्हणजे त्याचा अगदी पाठपुरावाच करावा, इतके काही नाही. तो सिनेमा पाहून परतत होता तेव्हा ते घडले. रात्रीचे साडेबारा वाजून गेले होते. इकडे तो फारसा कधी आला नव्हता. एखाद्या वेळेलाच आला असेल. वाहन मिळाले नाही म्हणून तो थोडा चालत निघाला होता. तेव्हा एका इमारतीत पहिल्या मजल्यावरच्या घरात त्याला उजेड दिसला. तो क्षणभर थांबला तर कुणितरी म्हणाले, बघा जाऊन, अद्भूत आहे. काय आहे, त्याने विचारले. एक सीधा सादा आदमी है, बस, मिल आओ. असे म्हणून तो माणूस निघून गेला. आता त्याला उत्सुकता का वाटली असेल, हे त्याला सांगता नसते आले. घडू शकते असे, असे म्हणून तो खरोखरच तिथे गेला. आतल्या माणसाने त्याचे हसून स्वागत केले. देवांचे फोटो, धूपदीप, फुले-हार असले काहीच नव्हते तिथे. बसा, तुम्ही खूप ठिकाणी जाऊन आलेले आहात पण प्रत्येक वेळी तुम्हाला माहीत असायचे की तुम्ही अमुक ठिकाणी चालला आहात किंवा ताजमहाल बघायला चालला आहात. पण आता वेगळे करून पहा – जायचे, पण, कुठे जायचे ते ठरलेले वा माहीत असता कामा नये. आणि हो, तुम्ही काहीच विचारण्यासाठी आलेला नाहीत, हे मला माहीत आहे. आणि आणखी एक, मी काही तुमचाच काय कुणाचाच गुरु नाही. अर्थात हे म्हणजे तुम्हाला काही खास वेगळे सापडलेय किंवा नशीबच काही देऊ करतेय असे स्वतःच्या कौतुकाचे काही न समजता जा. कोणत्याही परिस्थितीत, कधीही, आपण कुणाहीपेक्षा अधिक शहाणे आहोत, असे समजायचे नाही. याचा अर्थ, आता मी नम्र होतो, असे म्हणायचाही उपयोग नाही. मी कुठलाही देवधर्म नाही सांगत – या आता. एवढे ऐकल्यावर तो बाहेर पडला.

माहीत नसलेले ठिकाण म्हणजे काय, यावर विचार करतच तो घरी गेला. घराची दारे उघडीच होती. आणि त्याच्या कुटुंबातले कुणीच नव्हते घरात. तो त्याच विचारात झोपी जात राहिला, पण, त्याला समजत गेले की हे सोपे नाही.

मग तो एक जणू नादच लागला. तोच विचार. याला गुरु तरी कसा म्हणावा, पुन्हा बोलावलेही नाही. आणि मी तर पुन्हा तिकडे एवढ्यात जाण्याची शक्यताही नाही. आणि गेलोच तरीही, सांगितले ना एकदा, असे म्हणून तो चिडूही शकतो. जाऊ दे.

पूर्वी मुंबईत हिप्पी यायचे. कधी ते बसलेले असायचे स्टेशनवर. त्यांना कुणी विचारले की बाबा कुठे जायचेय तुम्हाला की ते म्हणत, असे काही नाही – आम्हाला इथून जावेसे वाटले की समोर दिसेल त्या गाडीत आम्ही बसणार, मग ती नेईल तिकडे जाऊ. पण, हेही त्याला पटे ना – गाडी कोणती आहे, कुठे चालली आहे, ते काळणारच ना ! पैसे खूप असतील साल्यांकडे, टीसीबीसी आला तर सहज दंडबिंड भरत असतील !

त्याला एक आले लक्षात की ते शक्य नाही. माहीत नसलेले म्हणजे ज्याला आपले मन टचसुद्धा नाही झालेले असे हवे. आपण या माहीत असलेल्या जगात गाडले जातोय असेच त्याला वाटू लागले. माहीत नसलेले असे अमुक एक ठिकाण कसे असेल ? अमुक एक म्हणजे माहीत असणेच ते. आणि असे पाहिले तर ते ठिकाण इथून लांब दुसरीकडे कुठे आहे, असे तरी कसे समजता येईल ? आपण आहोत त्या बिंदूवरच नष्टच झालो तर तेच असेल माहीत नसलेले ! म्हणजे आता आहे ते चालू ठेवायचे की कुठेही जाणेच राहणार नाही असे विसरूनच जायचे सगळे ? इथे तो थांबला.
--- ००० ---

म्हणजे झाले

वेळ आल्यास धरायला भिंत
बसायला दुकानाची पायरी
आणि सहृदय माणसे आजूबाजूला
असतील असे पाहा पाणी द्यायला

तुम्ही मोठे व्यापारी मोठे अधिकारी
संशोधक वा शास्त्रज्ञ असाल
तर फार नकोत ताण आणि कामामुळे
बाजूला टाकलेले फार नको
हिंसक व्हायला एवढे पाहा
त्यासाठी सकाळसंध्याकाळ योग
प्राणायाम करा भक्तिमार्गही
उपयोगी पडतो नामजपही

ताण नको झोप नीट हवी
व्यायाम आणि आहार नीट हवा
आणि आनंदी राहा की झाले

तुम्हाला वेळच नसल्याने
हे एवढे तरी लागेलच
तसे तर राजकारणात
कोणतीही एक बाजू घेऊन
क्रोध उपरोध वाद
करत राहणेही वेळ असल्यास
बऱ्याच वाईट गोष्टींकडे
दुर्लक्ष करायला बरे पडते

पण त्याने बीपी आणि मधुमेह
लागू शकतात कुठेही
गुंतून राहा आणि जे येईल
ते आनंदाने स्वीकारा म्हणजे झाले
निराशा वा उदासी नको
--- ००० ---

तडजोड

तू तुझ्या पायाजवळची
जमीन विसरायला हवीस
आमची मुळीच
भीती वाटू नये
अशी मैत्री
पाठ करायला हवीस
कुणाच्याही हातचे
बाहुले न बनता
स्वतंत्र आणि निर्भय
जगायला हवेस

हे ठीक
तुमचे दडपण
आमच्यावर येता कामा नये
आमचे स्वातंत्र्य
अबाधित राहून
आम्हाला कुणाशीही
खुली मैत्री
ठेवण्याचे स्वातंत्र्य
असायला हवे
न जाणो
कधी आपल्यांत आले वितुष्ट
तर त्या काळासाठी
आम्हाला सिद्ध
राहू द्यायला हवे

याचा अर्थ प्रेम संशयास्पद
छुपे डावपेच आणि प्रतारणा
नकोच ते आपल्यांतला
कमकुवत तूच आहेस
तू खलास होणे हाच उपाय
आणि हीच तडजोड
--- ००० ---

तत्त्वज्ञ

हे शहरच मला
जर्जर करत असले तरी
इथे असेपर्यंत मला
इथल्याच सोयी आणि मार्ग
वापरावे लागणार

पण मला तर गाजायचेय
एक अद्वितीय शहाणा म्हणून
म्हणून मी म्हणतो
विकास आणि उपाय यांतून
तयार होते एक गळू
जे कधी ना कधी
फुटणे भागच असते

खरे तर तुरंत
हे शहर सोडायला हवे
हे मला स्पष्ट कळत असते
पण इथलीच इथेच असू शकणारी
माझी प्रेयसी
मला करकचून
गुंतवून ठेवते

मग मी सुरू करतो प्रचार
सध्याची व्यवस्था
शहराला वा माणसांना
आरोग्याची नसल्याचा

प्रेयसीमुळे दिवस तर
ढकलणेच घडणार
हे स्वीकारून मी ठरवतो
राजकारणी तत्त्वज्ञ होण्याचे

माणुसकी म्हणजे काय
ते ऐका मी म्हणतो
--- ००० ---

कान

हुशारी पराक्रम धूर्तपणा डावपेच आणि शौर्य
यांचे धूर आणि जाळ यांच्यासह इमलेच इमले
पडलेल्या असंख्य इमारतींच्या मलब्यात
उत्तुंग मूल्यांच्या संस्कृतींचे दावेदार पडलेले

पकडलेले दोन पायलट
ठेवले जातात अंधारकोठडीत
त्यांच्या शिक्षेचा हुकूम येईल
तेव्हा होईल अंमलबजावणी
तोवर त्यांना मिळत राहते
ब्रेड आणि पाणी

आज हवाईबंदी झाली
युद्ध अधिक तीव्र झाले
आज झाली सुरुवात
परमाणूयुद्धाला
बेचिराख बेचिराख
होत गेले सर्व
चांगले-वाईट समजणारे
दोन्ही बाजूंचे छोटेबडे
अशा बातम्या फक्त ठळकपणे
सांगितल्या जात राहिल्या त्यांना

वाट लागलीय तुमची
तुमचा प्रमुख
खेचून काढलाय बिळातून
हा बघा त्याचा कान
मुद्दाम तुम्हाला दाखवायला आणलाय
उद्या त्याची फाशी आहे
एका दिवसात संपलीय सुनावणी

शेवटी मानवी मूल्ये आणि सत्य हेच विजयी झाले
--- ००० ---

## मते

मी मते बाळगत नाही
ती वापरतो
वेळोवेळी बदलतो
मला ती उपरी असतात
त्या त्या वेळी मी
त्यांच्या पाठीवरून
डोक्यावरून हातही फिरवतो

त्यांच्याशी एकनिष्ठ राहणे
म्हणजे पायच तोडून घेणे
ये जानके मी त्यांच्याशी म्हणजेच
माझ्याशीही नसतो एकनिष्ठ

मते म्हणजे असते एक भीती
नसण्याची जल जानेकी
रद्दच होण्याची
ती टाळण्यासाठी
माझी मते बनतात एक संरक्षक भिंत
आणि जगाशी भांडणे वाढत वाढत
माझे असणे धोक्यात येत राहते

हे माहीत असल्याने मी जरा
फटकूनच वागतो त्यांच्याशी
कारण मते लबाड असतात
ती ठेवतात मनाला जखडून
आणि बाहेर
हक्काने मागत राहतात
त्यांच्यासाठी स्वातंत्र्य

मन माझे असो की
मला दिसणारे कोणतेही
मते म्हणजे असतात
सतत चालू असणारे अंत्यसंस्कार
आम्ही सगळेच असतो
मृत्यूच्या अंधारातले
उत्सवप्रिय आशावादी

काहींना असते पूर्ण खात्री
आणणार आहेत त्यांची मते स्वर्ग
त्यांना भेटतो त्यांचा बाप
तो म्हणतो
तुझ्यासारख्या अधार्मिकाला मारले
की मला मिळणार आहे स्वर्ग
तुझ्याशी लढताना मेलो तरीही

मतांना सतत
धारण करावे लागतात मुखवटे
संवेदनशीलतेचे
दु:खितांच्या भल्याचे
म्हणजे झाकून ठेवता येते
त्यांना त्यांची युगानुयुगांची
निरर्थक थरथर

मते असतात विभिन्न
पण एकोप्यासाठी झटणारी
ती काहीशी साशंकही असतात
एक गठ्ठा स्वप्नपूर्तीबाबत

मतांना वाटते
इतर मते आहेत फूटपाडी
कोणतीच मते तयार नसतात
नि:शस्त्र वावरायला हेर न व्हायला

तरीही बिचारी खात्रीत असतात बेसावाध

माझ्या मतांचे इतिहासभूगोल
मी कधीच अबाधित नाही धरत
त्यांचा खोटा वापर करत मजेत जगतो
त्यांना मन मानेल तेव्हा फेकून देत
--- ००० ---

माझे मद्दड मित्र

माझे मद्दड मित्र कविता लिहितात
आजच नाही वर्षानुवर्षे
आजच्यांच्या मैफलीत
मीही असतोच ना अनेकदा

आता त्यांना मद्दड म्हटल्याने चिडत नाहीत ते
एकदा त्यांनी विचारूनच घेतला होता
त्या शब्दाचा अर्थ  सांगितल्यावर ते हसले होते
नॉर्मल च्या ऐवजी मी तो शब्द वापरतो
असे त्यांनी समजून घेतले होते
माझ्याकडेही मग ते आपुलकीने
बघू लागले होते मीही एक कवी होतोच ना

मद्दडपणा टाकूनही कविता लिहिता येते
हे मी त्यांच्यापासून लपवून ठेवले होते
सार्वत्रिक मद्दडपणाची खात्री असल्याने
माझ्याही कविता खपून जात म्हणजे
अजूनही आता मला ते फक्त एक वेगळा समजून
देतात सोडून मी त्यांच्या पुढे कुठे जाऊ नये
याची काळजी घेत आम्ही अनेकदा एकत्र असतो

माझे बहुतेक सगळेच मद्दड मित्र
त्यांच्या त्यांच्या वाचकांचे मद्दडपणाचे प्रकार
गोंजारण्याची अनेक आयुधे वापरतात
मला ते नाही आवडत तर ते मला माफ करतात
या पद्धतीने मी कधीच पुढे नाही जाऊ शकणार
या खात्रीने त्यांना बरे वाटत असते
आपापल्या गिराईकांबद्दल वेश्या जशा
करतील चर्चा तसे आम्ही बोलतो
वाचनसंस्कृतीबद्दल आणि मुखपृष्ठांबद्दल
माझे वाचक सामान्यत: अलंकार न आवडणारे
आणि सगळेच हरवेल की काय
या भीतीत असलेले असतात
त्यामुळे सुखासीन मद्दडपणा राहू शकतो निर्धास्त

मद्दड असले तरी विश्वकल्याणीच असतात माझे मित्र
फक्त त्यांच्यांत जरा मतभेद असतात इतकेच

माझे काही मित्र असतात न्यायाचे भोक्ते
तर काही देतात महत्त्व सुरक्षिततेला
तर काही देतात महत्त्व निव्वळ माणुसकीला
आणि वारंवार सांगत राहतात तेच तेच की म्हणे
सर्वांच्याच रक्ताचा रंग लालच असतो

या तिन्ही वेगवेगळ्या मद्दडांत असतात
एकापेक्षा एक हुशार आणि विद्वान
नुसते माहितीचे खंदकच नव्हेत
तर कठोर तर्कसम्राट तैलबुद्धी
महान विश्लेषक इतिहासातून काढून दाखवणारे
रगडून शहाणपणाचे तेल

यांतले वाचक समुदायांत कुणाला काय किती
महत्त्वाचे वाटावे याला नसतो तर्क
अपयश आले तर ते चवताळतात सात्त्विक
क्रोधाने बीपी वाढवून घेत म्हणतात
या मूर्खांना अक्कलच नाही मद्दड आहेत साले

अनुभवांचे वैविध्य संबंधांच्या
अनपेक्षित रचना आणि मानवी दुःखांचा अंत व्हावा
ही अप्रतिहत मूल्यात्मकता
यांवर माझे मित्र राहतात आत्मतुष्ट आत्ममग्न कार्यबहुल

मरण्यापूर्वी त्यांचे स्थान पक्के होणे सतत
त्यांच्याकडे लक्ष जात राहणे हेच असते मानवहिताचे
असू दे म्हणून मलाही देतात ते मोजकी
मद्दडपणाची बक्षिसे मीही हसत हसत
ती धूर्तपणाने स्वीकारतो जाऊ दे मरू दे म्हणत
--- ००० ---

बेडरिडन जिंदगी

इये मराठीचिये नगरी
स्वभावांचा सुकाळू करी
अशी सगळी बेडरिडन जिंदगी
चिखलात फतकल मारून बसलेली
आळशी म्हैस जगता जगता
तोंड सडत गेले वास फिक्स होत गेला
तर तेच सत्य समजून
आक्रमण करणारे सैन्य

मुंबई हवी तर
बांद्रा खाडी हीच जिंदगी
तो वास नसेल तर
काहीच नाही सापडणार आधाराला

आपापल्या जगण्याचा वास
ठरलेले लोक म्हणतात
जगूच नाही शकत कुणीही
राजकारणाशिवाय
आपापले तुटके हात दाखवत
भीक नाही मागत
असे असूच कसे शकेल कुणी

सांडपाणी आणि रसायने
यांचे अविरत सान्निध्य
असल्याशिवाय जगणे
म्हणजे नकारच देणे
या पृथ्वीला
तिच्या माणुसकीयुक्त
समृद्धीला आणि मुख्य म्हणजे
रागद्वेष मैत्रीसंशय
प्रेममर्डर यांच्या रेलचेलीला
राजकारणाशिवाय
जगूच कसे शकेल कुणी यही जानकर
सामील होणाऱ्यांनी तर एकमेकांना
लाथा घालायलाच हव्यात
पण मुख्य म्हणजे सर्वांनीच
त्या आपमतलबी

कुंपणावरच्या बांडगुळांना

माझे कपडे माझी संस्कृती
माझे अन्न माझे विचार
जगभर पोचायला हवेत
विरोध करतील ते संकुचित
आणि डबक्यातले बेडूक

राजकारणाला रोग न मानता
आभूषण म्हणून मिरवणारे
अगतिक हिंसक लोक
बरबाद करत राहतात
सगळ्या शाळा आणि मुलेबाळे
अनुभवाच्या समृद्ध चितेत

हे समजत नाही असे थोडेच आहे
कशाला कुणी बोध द्यायला हवाय पण
ना तत्त्व ना निष्ठा ना सत्य ना वैश्विक काही
आहे अशा या सत्योत्तर जिंदगीलाच तर
म्हणावे उत्तरआधुनिक आणि जे आहे ते आहे
नकोच ते रडणे-कण्हणे म्हणत
आहे त्याचाच गौरव करावा
ज्ञानपूर्ण हसत आणि बेभानपणे तेच साजरे करत

सारांश राजकारण नव्हे स्वप्नपूर्तीचा मार्ग
आपापले विचार म्हणजे आपापला बांद्रा
हिरीरीने फडकवायचा विदीर्ण झेंडा
आपल्या बुडाखाली पेटलेला जाळ
सदैव आपली करमणूक करणारा
आपला भास आपले सत्य आपला वास
--- ००० ---

अध्यात्म

कसली कोडी कसले उखाणे
कसल्या भेंड्या कसली गाणी
कसले जप कसले भूलभुलैयाचे राजवाडे
कसली कर्मकांडे कसला सराव
भावना विचार यांची कसली ही डिझाईन्स
हरवलेल्या क्षणांचे
कसले हे म्यूझियम्स
फुटलेले फोड वाहत्या जखमा
खपल्या उत्तेजक सजावटीच्या पताका

सामान सगळे हेच बाळगत
आस्तिक वा नास्तिक असणारे मासे
मांसाहारी असोत की शाकाहारी
सापडलेय आपल्याला
अंधारात जगण्याचे रहस्य
म्हणून आत्मविश्वासाने
व्यसनाधीन होत राहतात
निसर्गप्रेमाच्या

हीच माणसे
देतील ब्लू प्रिंट
निळ्या आभाळाखाली
सर्व व्यवस्था बदलून
त्यांच्या आजोबांच्या नावाने
उभारण्याची उद्यान
जिथे मुतारीची संकल्पना असेल
एका धर्मनिरपेक्ष नगरसेवकाची

हे सगळे एकमेकांचे शत्रू असले तरी
अंतरपाट धरतील कुणाच्याही लग्नात
फक्त काहींच्या डोक्यांत जाळ जाईल
ते संस्कृत मंत्र ऐकून
पण ते दाखवणार नाहीत
सर्वांना माफ करत
जसे सर्वच फूटपाडे सत्ताधारी
करत असतात दुर्लक्ष त्यांच्याकडे

एकाकी होणे उदास वाटणे
भीती वाटणे काळजी वाटणे
अजून सगळेच अर्धवट असल्याचे
असमाधान वाटणे
हे सगळ्यांचे सारखेच असते चालू
पण स्वाभिमानापोटी
हे काहीच नसल्याप्रमाणे
ते दाखवत राहतात परकेपणा
आपापल्या सिगरेटींची वलये
अधिक सुंदर समजत

पाठांतर असेल वेगवेगळे
पण म्हणून आपण
कायम दुरावलेलेच राहणार का
हा प्रश्नही एकत्र पाहायचा तर
उगीचच ते कमीपणा घेणे होईल
अवलंबून असणे होईल
गरज नसताना
म्हणून ते सुप्रभात म्हणून
निघून जातात बागेबाहेर

खरे तर हेही समजत असते
मनांचे वेगवेगळे तुकडे असलेले आपण
एकत्रितपणे काहीच नाही पाहू शकणार
आपापले किल्ले आपणच फोडावे लागतील

याच बिंदूवर लागणार असतो कस
सर्वच त्यात माहीर असतात
काही म्हणतात अध्यात्माची काही गरज नाही
काही म्हणतात अध्यात्माशिवाय जगणे
म्हणजे नुसत्याच उलट्या होत राहणे

तरीही सगळे पळतात मात्र एकाच दिशेने
--- ००० ---

प्रतिमा

माणसांचे जग हे प्रतिमांचे जग असते
वेड्यांनो इथे खरेबिरेसुद्धा
नुसते म्हणत प्रतिमा तयार करण्यासाठीच
वापरायचे असते आत एक बाहेर दुसरे
असे तुमचे नाहीय असे म्हणत
तेच करायचे असते  आतून
जातीयवादी असून बाहेरून
धर्मफूटविरोधी असल्यामुळे
आपण बाजारबुणगे पुरोगामी झालो
तरी चालेल सगळे तेच तर करतात

विद्वान म्हणजे काय वेड्यांनो
तर उपयुक्त माहिती जमवून
हवी ती प्रतिमा तयार करायचा
प्रयत्न करणारा माणूस
दुसऱ्या विद्वानाकडे वेगळी माहिती असते
त्याला उपयुक्त आणि बाळांनो
कुठलीही माहिती ही सुमारे खरी वा खोटी
वा अर्धवट वा मुलामा दिलेली
अशीच असते प्युवर माहिती असे काही
कुणाच्या बापाकडेही नाही असू शकत

त्यामुळे फारशा माहितीच्या फंदात न पडता
ज्याच्यात्याच्या प्रतिमा बनवणारा
सामान्य माणूस शहाणा ठरतो

तुमच्याकडे ना साधने ना संघटन
ना सर्वांना अपील होणारा
एखादा भावनिक सुरक्षिततेचा
प्रामाणिक मार्ग आणि तुम्ही वेड्यासारखे
सांगत बसताय या सर्व बाबी न वापरता
तुम्ही कसे प्युवर तत्त्वशील आहात

जे काही घडेल ते
प्रतिमांवर घडेल हे समजत असूनही
तुम्ही जातीय आणि बाकी पुरोगामी
प्रतिमा निवडलीत पण तुमच्या निवडीपेक्षा

अधिक खोटी आणि अधिक व्यापक
आणि अधिक समावेशक प्रतिमा
तुमच्या शत्रूने निवडली
आणि आता तो गेला चान्स
आता छोट्या छोट्या गटांना एकत्र करत
एखादी प्रतिमा तयार करण्यापेक्षा
तुमच्या शत्रूच्या प्रतिमेचा प्रभाव
घालवत आपण कसे बिचारे सज्जन
आणि जनहित पुरस्कर्ते आहोत
हेच बिंबवायचे डाव तुम्हाला टाकावे लागतील

हे सगळे करायला तुमची काहीच हरकत नाहीय
पण तुकड्यातुकड्यांची गोधडी जमवणे आणि टिकवणे
यापेक्षा तुम्ही सरळ सरळ एखादा
जहाल प्रतिगामी मार्ग का नाही निवडत

त्यासाठी भाषा बदलायची गरजच नाही
बोलणे तेच ठेवायचे कृती फक्त बदलत जायच्या

लोकशाही ही सहेतुक विद्वत्तेला नाही मानत
ती असते आकर्षक आणि सज्जन प्रतिमांची भोक्ती
जे मन समजून वागतील त्यांचे असेल राज्य
या शहाण्या परिपक्व जनतेवर
खरे वा खोटे हे शब्द जा विसरून
प्रतिमा ही फक्त खोटीच असू शकते
या तत्त्वाचा खूप वापर करूनही
अजून तुम्ही नुसतेच पुरोगामी राहिला आहात की काय

ते जिंकोत वा तुम्ही आम्हाला आमचे राज्यकर्ते
आम्हाला आवडणाऱ्या प्रतिमांचेच हवेत हे नक्की

--- ००० ---

## जुनी

मी नाही मी नाही म्हणत म्हणत
माळ निसटली हातातून
ती गेली नेमकी
त्याच्या जुन्या प्रेयसीकडे
पण असायची ताजीच ती
मला नाही कळत गाण्यातले काही
असे म्हणत म्हणत
असंख्य गाणी पाठ होती तिची
सगळीच होती मुळात
शिवानंद सागरच्या आवाजातली
त्याची गाणी आणि तिचे समन
असणे तल्लीन याने श्रोते होत
तृप्त पण तो होई जेलसीग्रस्त
एवढे काय त्यात खरे तर
वास्तवापासून पळण्यासाठीच
होते ते संगीतप्रेम
त्यासाठी ती
बेफिकीर होई निर्लज्ज होई
आणि तरीही गाताना
जणू काही झालेच नाही असे दाखवे
लोक म्हणत खरेच दैनंदिन
व्यापतापांतून सुटका होते
तुमचे ऐकून आणि त्याला
हेही ऐकू येई की तुम्हाला पाहून
पण ती तुटता तर कामा नये
म्हणून तो किंचित हसे म्हणे
खूप मेहनत घेते ती गाण्यासाठी
जुनी असली तरी माझी प्रिय परी
--- ००० ---

प्रत्येक शब्द

हे समजल्यामुळे
आता
खड्डेही स्मूथ वाटताहेत

नुसत्या स्पर्शानेही
येतेय रक्त
विसंबत भीतीवर

उठाठेव रूपात
उमलतेय थिएटर
सेक्स आणि हिंसा यांचे

कधीही हाक मार
मी हजर होईन
म्हणणारे

विलीन होताहेत
त्यांच्या त्यांच्या
नियोजित स्फोटांत

जाताना लागलेली
रेसकोर्सची खूण
येताना दिसत नाहीय

वारेमाप झालेय
जणू जगून
असे काळेकुट्ट आकाश

प्रत्येक शब्द हिंसकच असणार
हे समजल्याने आता
शांत स्मूथ वाटतेय
--- ००० ---

## शिक्षा

अरे सोड वेड्या
जगातल्या प्रत्येक गोष्टीवर
कुठे घासत बसतोस
तुझी अंकलिपी

जो तुकाराम बोलला
काहीच नसण्याबद्दल
त्याचे कुठले मूळ हवेय तुला

विभागवार वाचनालयाची
लागलीय तुला सवय
तुझ्या मेंदूचे
वेगवेगळे विभाग आहेत
इतिहास भूगोल
आणि शस्त्रागार
वाट पाहणारे
जिंकण्याच्या संधीची

तुकारामाचा विठ्ठल
तर होता अट्टल खोटा
तू भोग खऱ्याची शिक्षा

--- ००० ---

चळवळी

साठोत्तरी कवितेला
हात नव्हते
नव्वदोत्तरीत तिला
हात फुटले पण
मेंदू थोडा सडला

एकविसाव्या शतकात
तिला डोहाळे लागले
जागतिक होण्याचे
पण तिचे सांडपाणी
तुंबून राहिले
जानेवारीच्या
सातव्याच दिवसात

तोवर निम्मे वाचणारे
गेले वर
आणि निम्मे अडकले
सलूनच्या खुर्च्यांवर

मग हे सगळे
आले भाषेवर
ही भाषाच अशी घडली होती
की झोपडपट्ट्या वाढत होत्या
आणि निर्वासितांचे घोळके
साठत होते मनामनात

कवींचे कळप
शोधत राहिले मार्ग
एकटे राहून
चिंतन करण्याचे

आणि चळवळी थंडावत गेल्या
--- ००० ---

विज्ञान

त्याची मते अनेकांना
पटत नसली तरी तो होता प्रामाणिक
त्याला एकदा म्हटले
तू विज्ञानवादी आहेस हे मान्य
पण मते तयार होण्यामागचे विज्ञान
हेही आहे जगात

तो म्हणाला होय
मी एकदाच गेलो होतो त्या वाटेला
तेही साले सारखे बदलत असते
पण जे काय असते
ते चड्डीच घेते काढून साले
नंगेच झाल्यासारखे वाटते

मुख्य म्हणजे भीती वाटते
च्यायला माझी मते
तीही तशी माझी नाहीतच म्हणजे
या शंकेनेही दरदरून घाम फुटतो

आज माझी मते पक्की आहेत
ज्यांची तशी नाहीत त्यांना मी
कुंपणावरचे घाबरट ढोंगी आपमतलबी
बुळे नामर्द असंवेदनशील असे
काहीही म्हणू शकतो
ते आणि माझ्या विरोधी मतांचे लोक
वाव देतात माझ्या
रागउपरोधमानवहिताचाशहाणपणा ला
हे सगळे गेले तर
आधारच काय राहील माझ्या जगण्याला

जिंदगी लंबी नही बडी होनी चाहिये हे ठीक
पण त्यासाठी मते सुखरूप असायलाच हवीत ना
--- ००० ---

रक्षक

मला एकच भीती आहे इतकी वर्षे
मी त्यांना जो दिसत होतो
तो दिसेनासाच झालो आणि तो
मी नसून बदललेला मी हाच मुळातला
त्यांना जाळ वाटलो तर तर
त्याची अपेक्षित हानी तर माझीच होईल
त्यांची झाल्यामुळे मुळात आम्ही सगळेच
आमचे रक्षक आणि आमचे गुन्हेगार असल्यामुळे

--- ००० ---

खुबीदार

उद्विग्न या शब्दाचे
माणसाच्या जीवनातले स्थान
हा त्याचा प्रबंध प्रसिद्ध होताच
त्याला जीवनगौरवाचेच आले निमंत्रण
कोणत्याही रोपाच्या अगदी सुरुवातीच्या
वाढीपासूनही त्याला बसत जाणारे
फटके आणि चटके
यांचे फार खुबीदार वर्णन
त्याने चवीचवीने केलेले होते

उगीचच कोण कुणाला म्हणेल
खोटारडे वा दरोडेखोर

कायद्याच्या बाजूने असते
सशस्त्र पोलीसदल आणि लागल्यास सैन्यबळ
त्यामुळे गुंडगिरीवरची मास्टरी
कधी कधी निष्प्रभ होते
हा असतो खरा
लोकशाहीतला घटनात्मक पेच

तुम्हाला प्रतिष्ठा नसेल
तुमच्या बाजूने मोर्चे काढणारे कुणी नसतील
तर तुम्ही असून नसणे असे आहात

तुम्हाला खतम करणाऱ्याला फाशी
मिळणे म्हणजे तुम्हाला मिळालेला न्याय कसा

तुम्ही गेलात ते गेलातच ना
--- ००० ---

गोळ्या

मनोरुग्णांच्या गोळ्या
घेताहेत शहाणे नशेसाठी
हुशार म्हणताहेत
तेही मनोरुग्णच एक प्रकारचे
शिवाय ते हेही म्हणताहेत की
विकणारेही मनोरुग्णच बेफाम

स्वत:चीच प्रतिमा
असह्य झाल्याने
वा तिची मोडतोड होण्याच्या भीतीने
बेकायदेशीर नसलेल्याही
कित्येक मार्गांनी
मने टाळणे चालू असतेच ना
सर्वांचेच दिसतेच ना बेभान

ज्यामुळे गुन्हे घडू शकतात
ते वाईटच बेरहम
आणि प्रतिमाभंग करून
बदनामीच्या खाईत लोटू शकणारे

रशिया असो की इथला म्हादू बेबस
--- ००० ---

हत्यार

दु:खाची अवस्था समजा विकृत आहे
पण त्याचा त्रास होणे हे तर नॉर्मल आहे ना
तो त्रास घालवायचा अधीर प्रयत्न होणारच
त्या प्रयत्नासाठी वापरायच्या विचाराच्या
हत्यारातच तर प्रॉब्लेम नसेल जितके जास्त
वापरावे ते तितके वाढतच जातेय दु:ख
म्हणजे हत्यार टाकून दिले तर दु:खही जाईल की काय
--- ००० ---

## लाल मांजर

स्वप्नात का असे ना
लाल मांजर कुठून आले कोण जाणे
असणार माझ्याच भूतकाळातले
पण कशात तरी काही तरी
मिसळून तयार झालेले असणार

तसे माझ्या भोवती असतात
कडेकोट पहारे
जे दिसणे सोडाच जाणवतही नाहीत

त्यांना आव्हान येणे एकदा घडले मात्र
करू नये ते केले म्हणा
किंवा अनैतिकच म्हणा ना
तेही तसे लपून गुप्त सेफ
तेव्हा अचानक एक बातमी आली वाचनात
एका पोहण्याच्या तलावावर
कपडे बदलण्याच्या खोलीत
एक छुपा कॅमेरा होता म्हणे
नंगे दिसणे कुणाला परवडेल

खरे तर सर्वांचेच सगळेच
काही सर्वमान्य नसते
हे समजून मान्यच केले सर्वांनी
तर सतत आपण म्हणजे कोण काय कसे
हे अबाधित ठेवण्याचा ताणच जाईल
आणि मग त्यातून कदाचित
हरवूनच जाणे घडू शकेल स्वप्नात
रिलीफ देणारे

पण कुणाला हा रिलीफ
की या स्वप्नातही असणारच
आपले एखादे लाल मांजर
--- ००० ---

गाजरे

ओंजळीने पिता येतात
गाजरांची हृदये
म्हणून त्यांनी
आपापल्या भूतकाळांची तोंडे वासली

गाजरांचे रंग
बदलले कसे
म्हणून ते गेले
देवळातल्या शिल्पकाराकडे
तर त्याने जबाबदारी झटकली

आता एकच होता मार्ग
सरळ सुप्रीम थेटरात
दाखल करायची
आपापली दु:खमग्न कविता
आणि वाट पाहायची
फिर सुबह होण्याची

यात सामील व्हायला
फारसे कुणी तयार नव्हते
हे पाहून गाजरे
स्वत:च झाली कनवाळू
आणि म्हणाली
यात शिल्पकाराचा काहीच दोष नाही

आम्ही कित्येक वर्षे शोधतो आहे
या दोषाचे मूळ आणि आमच्या जन्माचे रहस्य
बहुमताचा मान राखेल असे नाही वाटत
काही सापडेलसे

असे म्हणत गाजरे पुन्हा रसरसली
म्हणाली प्या आता आमची हृदये
--- ००० ---

## नीट

कोणत्याही कारणाने
जर तुम्हाला वाटत असेल
तुमचे पाय दुखताहेत किंवा
तुमच्या घरातली सगळी फिटिंग्स
खिळखिळी झाली आहेत
किंवा तुमची आवडती गाणी तुम्ही
विसरू लागलेले आहात
किंवा तुमचे सगळे मित्र आता
फक्त व्यवहारापुरतेच राहिलेले आहेत

किंवा सरळ असेच घ्या ना
की तुमची जीभ जड झालेली आहे
तुम्हाला भाग घ्यायचाय लोकांच्या जगण्यात
पण तुमचे अस्तित्व धूसर वाटतेय त्यांना
खरे तर तुम्हाला एक कुत्रे पाळायचे होते
पण ते अजूनही राहूनच जात आलेय
तुम्ही स्त्री-प्रेमाला मुकलेले आहात
पण बाहेर तुम्ही ते दाखवू नाही शकत

तुमच्या अंगात ताप आहे
पण सध्या रजा घेणे शक्यच नाहीय
सारखे तुमचे खटके उडताहेत
तुम्हाला काहीच पटत नाहीय

तर मग मंत्र एकच आहे उपलब्ध
हे सगळे नीट झाल्यावर
मी कसे उत्तम जगून दाखवतो ते बघाच
असे म्हणत राहायचे
आशावादी आणि सकारात्मक राहायचे
बघा मग कशी बरकत येते ती

चेहरा हसरा राहणे फार महत्त्वाचे आहे
--- ००० ---

संस्था

तुम्ही स्वत: असता ना स्वत:
तसेच समरूप व्हा आपल्या संस्थेशी
इथली जाळीजळमटे निघणे
इथल्या होड्या वेगात पुढे जाणे
यावरच नाही का
तुमचे हॉटेलिंग
आणि तुम्हा सर्व कुटुंबियांचे कपडे

तीच तीव्रता हवी
तुम्ही असे नका समजू की
संस्था हे एक साधन आहे फक्त
हातोडी स्वत: तुम्हाला काही नाही देत
संस्था देत असते हे समजून घ्या
आणि वाद नको यावर
सुचेलही तुम्हाला
झांबियावरून आणलेल्या
फळांसारखा काही विचारव्यूह

पण वरिष्ठांना हरवणे
हे शोभून दिसणे जाऊच द्या
तुमची प्रगती तरी घडवेल का

ही संस्था हेच तुमचे शरीर समजा
हाच तुमचा मेंदूही
जो बधीर होतो मस्त
दारू एंजॉय करताना

हा नियतीचा लेख समजा
खूप काम करा
आपण कशाला जगतोय
याचा करतो का आपण विचार

तसेच हे अगदी आणि वाद नको यावर
भरपूर मन लावून राबू या
आणि यशस्वी होऊ या
--- ००० ---

बेसुमार

सगळेच बेसुमार वाटू लागते
तेव्हा एक करायचे
मेंदू चार्जिंगला लावायचा
म्हणजे झोपायचे अक्षरशः
झोप येण्यासाठी
हवे तर वाचू शकता काही

पण ते असे हवे की जाऊ दे
हेच वाचू या आता असे
पण रंगून जाऊन आख्खा
पिक्चर बघणे होईल असे नको

गोळी नकोच शक्य तो
माहीत असते ना
जास्त घेतल्या की विषयच संपतो

इतिहास माझा खरा नावडता विषय
त्यामुळे गोळी ऐवजी
जगाचा इतिहास ठेवतो मी जवळ
आणि एक आहे
वर्ल्ड हिस्टरी इतका
प्रगत आणि गुंत्याचा नाहीय
जगाचा इतिहास झेपायला हवा ना

पण ऐतिहासिक कादंबरी नाही चालत
इतिहास भंगार असला तरी
नाट्यमय सनसनाटी करतात साले
खोट्यात रंगतो माणूस हेच खरे

माझे असे काही एलाईट सर्कल नाहीय
की जिथे हुशारी दाखवावी लागेल
त्यामुळे मी काय वाचले हे कुणाला
सांगायचा प्रश्नच नाही
फ्री असतो मी
--- ००० ---

डोअरबेल

हे राहिलेय ते करायचेय
दुपारचे काम कसे होईल ही एक चिंता
आणि डोअरबेल वाजते
शेजारच्या इमारतीतले
सुगावकर वारलेत
म्हणजे बदलले अग्रक्रम

याने त्रस्त व्हावे की
त्या खरचटण्यातून झालेल्या
तात्पुरत्या मुक्तीमुळे खुश व्हावे
हे लगेच ठरवणे शक्य नाही

आत्ता अंघोळ करणार होतो
ती आता नंतरच करावी
चांगले होते सुगावकर
--- ००० ---

गटार

इतका गच्च
ट्रॅफिक जॅम की वाटते
आता हे असेच राहील
वर्षानुवर्षे
मोकळे आकाश चमचमते
खोटे वाटते

तेवढ्यात
आपली टीम येते
बालमित्रांची
आणि हातांनी साफ करते
वाहनांचे गटार

याचेही आश्चर्य वाटू नये
आणि अवलंबून असण्याचेही
नॉर्मल म्हणजे
कशाचेच काहीच न वाटता
घडून जावे काही
आणि त्याची स्मृतीही राहू नये

पण मग ट्रॅफिक जॅम चा
त्रास तरी कसा होईल
तो नाही झाला
तर आपल्याला
कोण म्हणेल नॉर्मल

कुणाचे तरी चुकलेय
असे समजून
एकमेकांना शिव्या देताहेत सगळे

कुणाचीच चूक नसेल
तर आपला वेळ वाया जातोय
असे तरी कसे म्हणता येईल
आणि शांत तरी किती राहता येईल
--- ००० ---

इजा

मी थांबलेलो असतो
तेव्हा झालेली इजा
मी प्रवाही होताच नष्ट होते

खरेच झालीय का ती नष्ट
हे पाहण्यासाठी थांबावे लागते
तर असतेच ती तिथेच तशीच
--- ००० ---

जिंदगी

ज्या क्षणी मला
मी खोटा असल्याचे दिसते
त्याच क्षणी
सगळ्यांचेच
उघडे पडते खोटेपण
आणि ताणच जातो

अन्यथा

माझी अत्यंत नावडती व्यक्ती
पछाडते मला
आणि पुनरावृत्त होत राहते माझ्यात
आणि आकार देत राहते मला
माझ्या जगण्याचा आधार बनत

त्या व्यक्तीच्या स्वभावाच्या
रागाबरोबरच पाझरतो तिचा स्वभाव
माझ्या सर्वांगात
आणि देत राहतो मला सत्यता

माझे आवडते सुखाचे
अनुभव टिकवण्यासाठीच तर
माझे मन तयार होते
असे माझ्या क्रोधाचे विषय असलेल्या
व्यक्तींना अर्पण व्हायला

पुन्हा पुन्हा आठवावे असे माझे सुख
तर असते खरे तर माझे नसणे

माझे आवडते जे असेल ते
आणि माझे नावडते नेते
कब्जा घेतात माझा
आणि बळ देत राहतात मला
त्यांचे असणे सतत स्वीकारत राहण्याचे
माझ्या जगण्याचा आधार म्हणून

माझे असणे असे व्यापले जाते

माझ्या खरेपणाने

जाऊ दे तो माझा खोटेपणा
असू दे तो
असे म्हणत शूरपणाने
आणि एक प्रकारच्या मुरब्बीपणे
हम सब जान चुके हैं म्हणत
यही तो है जिंदगी म्हणत
--- ००० ---

कारकीर्द

एखादी सुंदर स्त्री
काही बोलते आणि तिची रयाच जाते
केंद्र बदलून माणसे
दुसरीकडेच पाहू लागतात

एखाद्याचा देह फारच
थुलथुलीत असतो केवढे मोठे
कपडे आणि स्पेस लागतात त्याला
कुणाचे नाक वाकडे असते
कुणाचे दात तिकडे असतात
कॉमन कसे असतील प्रॉब्लेम्स
त्रास कॉमन असतात

खाण्याच्या खूप आवडीतून
निर्माण झालेली चरबी
साठण्याच्या जागा ठरलेल्या असतात
त्यातून येणारी एखाद्या चालीतली मादकता
म्हणजे असते शरीरसुखाच्या
आचेचा परिणाम

शिवाय आणखीही बरेच कमीजास्त
घेऊनच असणार ना मने

अशा या गोंधळलेल्या अन्यायग्रस्त ताबाहीन
निरुपायी नाइलाजात
घडवायची असते कारकीर्द

एवढे दिसण्यापर्यंत
येऊ शकते समज
याहून जास्त असणार तरी काय
या पूर्णविरामात थांबत
--- ००० ---

इथेच असे नाही, जगभर हेच चाललेय. दस्त नोंदणी कार्यालये तुडुंब भरलेली आहेत. पंचवीस-तीसजणांना बसायला खुर्च्या आहेत, पण, बाकीचे उभे तरी आहेत किंवा कुठेतरी जा-ये करत आहेत, वाट बघत. सगळ्यांचे वकील निरनिराळे कागद हातात घेऊन साहेबांच्या केबिनमध्ये आतबाहेर करत आहेत. साहेब सलग येतातच असे नाही. त्यांना अनेक ड्यूट्या लावलेल्या असतात. वेळ मिळेल तेव्हा ते येतात. त्यांच्या केबिनमध्ये जाण्यासाठी त्यांना पलीकडून एक वेगळा दरवाजा आहे. तिकडून येऊन ते कधी स्थानापन्न होतात ते कळत नाही. लक्षच ठेवावे लागते. वकील सगळे सतर्क असतात. हे त्यांचे होमपिच असते, त्यामुळे, ते आत्मविश्वासाने गंभीर असतात आणि मध्येच हसतातही.

ज्यांचे दस्त आहेत त्यांना तर काळजी असतेच की एकदा होऊन जावे काम. ज्यांचे बरेच शिल्लक आहे आयुष्य ते तर आधीरच असतात. ज्यांचा जवळ आलाय मृत्यू त्यांच्या चेहऱ्यांवर असे असतात भाव की कशाला आणलेय मला इकडे, मरू द्या सगळे. एरवी भोसडीचे मला जेवणाचेही नाही विचारत. सगळ्या मालमत्तेचे पिढ्यापिढ्यांतून तुकडे तुकडे होत जाणार आहेत, हे त्यांना माहीत असते. काळजी सर्वांनाच असली तरी बरेचजण सौजन्याने वयस्करांना बसायला जागा देतात. एखादा तरुण मात्र तरुण असूनही बेफिकीर असतो. कोट्यवधींचे व्यवहार करतात भोसडीचे, राहू देत उभे, माझ्यावर उपकार करायला नाही आलेले हे, असे त्याच्या मनात असते. जे श्रीमंत लोक दस्तासाठी इथे थांबून असतात त्यांचे ड्रायव्हर्स खाली कधी एकमेकांशी गप्पा मारतात, कधी हास्यविनोद करतात तर कधी पेंगत राहतात आपापल्या गाड्यांतून.

ही इमारत नवीच आहे, बहुतेक अजून कंप्लीशनही मिळालेले नसावे. पण सरकारी ऑफीसची अर्जन्सी आणि जनसेवेचे महत्त्व लक्षात घेऊन जरा काणाडोळा केला असावा. आणि करायचाच आहे असा निर्ढावलेपणा तर येऊ द्यात इतरांनाही म्हणून खाली काही दुकाने आणि एकदोन हॉटेलेही सुरू झालेली आहेत. काही तासांनी का होई ना पण टॉयलेट कुठे आहे ते विचारावेच लागते. तर ते या मजल्यावर नसल्याचे कळते. लिफ्ट नसल्याने काहींच्या पोटात गोळा येतो. खाली तळमजल्याला जायचे, तिथून पायऱ्या उतरायच्या, मग पूर्ण इमारतीला वळसा घालून मागे जायचे, तिथे वाळू, खडी, दगड, शेवाळे यांतून वाट काढत त्या दिव्य पत्र्याच्या टॉयलेटकडे जायचे, असा प्रकार. तिथे कायमच दोन माणसे नुसत्या चड्डीवर अंगाला साबण लावून फेसाळलेली अंघोळ करत उभी असतात. त्यातून तिकडे आत पोचल्यावर एक उंच पायरी चढून मग टॉयलेट असते. वयस्कर माणसे वा स्त्रिया इथे येऊच नाही शकत. ते सगळे शक्य तो दुप्पट वेळ ताणून नेतात. पण, शेवटी जावेच लागते तेव्हा वयस्करांना तिकडेच एका भिंतीकडेला नेले जाते आणि स्त्रियांना तर जरा लांब चालत जाऊन एखाद्या हॉटेलचे उपकार घ्यावे लागतात. त्यांना उगीचच उपकृत झाल्यासारखे वाटू नये म्हणून काही हॉटेलवाले प्रत्येक वेळी पाच रुपये चार्ज करतात. काही कारने जाऊन येतात.

हे जगण्याला सुरक्षिततेचे वेष्टन देणारे ठिकाण आहे. आपल्या नावावर हे आहे, ते आहे याने माणसाला एक तुपट समाधान मिळत असते. ज्यांच्या नावावर काहीच नाहीय अशांना कुणाच्या ना कुणाच्या उपकारांची ओझी घ्यावीच लागतात. शेतकरी, सरकारी अनुदानातून घरे मिळालेले, स्वकमाईचे वा वडिलोपार्जित घरे, बंगले असलेले, कारखानदार, दुकानदार असे सगळेचजण सतत कोणते ना कोणते दस्त संभाळत असतात. घरातली मुलेबाळे वा पाळीव प्राणी यांच्याइतकाच त्यांना या दस्तांचाही लळा असतो. एकेक दस्त म्हणजे अनेक वादविवाद, चर्चा, भांडणे किंवा त्याग यांची अमिट दास्तान असते. असे लाखो, कोट्यवधी दस्त म्हणजे माणसाचा खरा भूमिगत इतिहास असतो. ते दस्तच एक प्रकारे संस्कृतीचे वाहक असतात. व्यवस्था बदलावी असे वाटणाऱ्यांना खरे तर ही दस्तांची

दुनियाच बदलायची असते. काहीजणांच्या तर हेही येते लक्षात की मोक्ष ही तर खूप लांबची असेल गोष्ट, माणसाला नुसते दस्तमुक्त जागता आले तरीही खूप शांतता येईल जगण्यात.

इथली काही माणसे परदेशांत जाऊन तिथलेही मिळवतात दस्त. लोकांना वाटते, किती नशीबवान, किती सुखी. पण त्यासाठी सगळे आयुष्य गहाण टाकावे लागत असणार या विचाराने काहीजण मात्र, मरू दे म्हणत त्यांची कीवही करतात. दस्त या जनरल विषयावर असो की एकेका दस्तावर असो, आजूबाजूच्या अनेकांची अनेक मते असतात. काही दस्त तर बळकावून मिळवलेले असतात, असेही लोक बोलत असतात. पण न्याय या विषयावर एकमत होऊ शकेल का कधी ? दस्तहीन, अन्यायग्रस्त जगणे का यावे आपल्या वाट्याला या त्रस्त विचारात आणि आत्मकीवेत कोट्यवधींचे आयुष्य खर्ची पडून जाते.

तेवढ्यात, आलेत वाटते साहेब. लगबग वाढली आहे. दस्त नीट होऊन ताब्यात येण्यासाठी फोअरप्ले – पूर्वक्रीडा करावी लागते, ती त्या दस्तगीरांमार्फत त्यांचे त्यांचे वकील करत असतात. यातून येणाऱ्या क्लायमॅक्सचे समाधान किमान चौघांना मिळतेच.

बाहेर पडल्यावर अंगाला जी नैसर्गिक हवा लागते ती अक्षरक्ष: अनोळखी वाटू शकते !

--- ००० ---

सांस्कृतिक आनंदाची सुसाट दंगल

रामरक्षेला व्यंकटेश स्तोत्राचे आव्हान
हनुमान चालिसाला हनुमान स्तोत्राचे आव्हान
हनुमान स्तोत्राला हनुमान चालिसाचे आव्हान
ओंकाराला लघुरुद्राचे आव्हान
लघुरुद्राला महारुद्राचे आव्हान
अभिजन साहित्याला ग्रामीण साहित्याचे आव्हान
कवितेच्या अनियंत्रित प्रपाताला
नव्या कादंबऱ्यांचे आव्हान
आस्तिकांना नास्तिकांचे आव्हान
नास्तिकांना दैववाद्यांचे आव्हान
प्रचंड आवाजाला अनाहत नादाचे आव्हान
अनाहत नादाला जाहीरनाम्यांचे आव्हान
दलित साहित्याला व्यावसायिक नाटकांचे आव्हान
जाझ संगीताला नादब्रम्हाचे आव्हान
मागच्या भागाला पुढच्या भागाचे आव्हान
आपण वेगळे आहोत ला आपण एकच आहोत चे आव्हान
चित्रकलेला नृत्य कलेचे आव्हान
शिल्प कलेला बोला जय जय हनुमान चे आव्हान
त्या गाण्याला श्रीवल्ली चे आव्हान
तुमच्या पक्षाला आमच्या पक्षाचे आव्हान
तुमच्या हिंदुत्वाला आमच्या हिंदुत्वाचे आव्हान
आम्ही भीत नाही ला पुरावे द्या चे आव्हान
जेलमध्ये जाण्याला दिलाशांचे आव्हान
पत्रकारांना समाजमाध्यमांचे आव्हान
विद्वानांना अस्मितांचे आव्हान
आणि मुख्य म्हणजे
गधड्यांना गधड्यांचे आव्हान
--- ००० ---

वांग्याची भाजी

घटस्फोट ? छे हो. हॉल तिकीट विसरून आलेला माणूस अभ्यास कितीही झालेला असला तरी घाबरलेला असतो, तसेच आहे ते. भविष्याची आच नुसती असून काहीच उपयोग नाही. तुमच्या शब्दांना पडायला हवेत प्रश्न त्यांच्या आधीच्या अर्थांचे. पण तसे होत नाही. आपण खूपच मुरगाळले गेलेलो असतो कामधाम, पार्ट्या-पिकनिक आणि सडेतोडपणा आणि संवेदनशीलतेचे नाटक यांत. नाटकातला अभिनय नव्हे, त्याने तर साधे खरचटतही नाही. खरोखरचा, अंधाऱ्या खोलीत एकट्याने जगतानाचा अभिनय. तो असा अंगवळणी पडतो की अभिनय म्हणजे फक्त नाटकातला सोंगीपणा असेच वाटत राहते. ही भूमिका तुम्ही थांबवा आता, तुमच्या हृदयावर ताण येतोय – हे ऐकू शकतो एखादा नट पण सवयीचे झालेले प्राणी, रस्ते आणि म्युझियम्स यांचे काय करणार ? कुणी जवळचे जाणार आहे हे आधीच माहीत असल्याप्रमाणे कशी काय होत असेल मानसिक तयारी ? आणि पाहणारे म्हणतात, तो धीराचाच आहे. आणि एकदा कुठल्यातरी हॉटेलात आलेल्या एखाद्या संकटाचा किस्सा इथे येतो उदाहरणादाखल. तर भाषा. तीच सारखे गुंतवून ठेवते. भाषा हीच एक कृतीच असते जणू. विचार मानसिक असतील तर कृतीही मानसिकच असणार ना. पण तो नाही कुणी विचार करत. बहुमताने चालण्यातच सेफ वाटते, त्याला करणार काय ?

म्हणूनच एखाद्या आयुष्याच्या कहाणीला महत्त्वच नाही राहात. मानसिक ढोंग म्हणजे हॉल तिकीट विसरून आलेला परीक्षार्थी. यापुढच्या क्षणी काय घडेल ते वेगळे पण आत्ता, या क्षणी भीती वाटणे हे तरी असतेच ना खरे. पण कुणी गेल्यावर दु:ख व्हायलाच हवे याचाच तो एक भाग असतो. सुरचित आयुष्याच्या आराखड्याप्रमाणे गेले समजा अगदी आयुष्य तरी घडले काय तर जे माहीत होते तेच. किंवा कदाचित भाषा सवयीची झाल्यामुळे नवे काही घडू शकत नसेल.

मला तर वाटते की घटना घडतच नाहीत, भाषाच फक्त रिपीट होत राहते. आपल्या आजूबाजूच्या सावल्या फार तर मिसळत असतील त्यात, पण, मग त्यात आपले असे काय असू शकेल ? उगीचच भरकटत बसूच नये म्हणे माणसाने कारण एखाद्या वेळी दारू खूप झाल्याने उलट्याच उलट्या होऊ शकतात. म्हणजे इतके की हा म्हणजे आपला शेवटच आला की काय, असे वाटावे. पण काहीच चूक न घडता जगणे म्हणजे तर घटनांचा अभावच की ! कधी ना कधी धोक्यात यायलाच हवेत एक तर तुमचे हातपाय किंवा तुम्ही स्वत:ला जे जसे सादर करत जगत आहात ते. नाही तरी कधीही घडू शकेल अमुक अमुक अशा कल्पना असतातच की. पण तो काही आरोग्यासाठी व्यायाम नसतो. कोणतीही घटना ही निव्वळ आपलीच आणि नवीच ठरावी असे तर काही सापडेलसे नाही वाटत. म्हणूनच, मग, खरे जगणे आणि नाटकातला अभिनय यांतली कमी घातक घटना कुठली, हे कळत नाही.

तुम्ही अमुकाचे शौकीन आहात, तुम्हाला वांग्याची भाजी फार आवडते आणि घर अगदी आधुनिक क्लीन असावे असे वाटते पण ताजमहाल आणि बिर्ला मंदिर म्हणजे एकच नव्हे ना. कोण विचारतो तुमच्या प्रेमकहाणीला ? आपले आपले जगा आणि फुटा. हे जग घटनाहीनतेचे शौकीन आहे. तुम्हाला कीर्ती हवी असेल तर झालातच तुम्ही भाषेचे गुलाम ! हा पेच फक्त आपल्याच जगातला. इथे लागणारे हॉल तिकीट म्हणजे तर तुमचे बालपण असते. होय, म्हणजे माझेच. म्हणून मी कितीही मोठा झालो तरीही कधी ना कधी कुणी ना कुणी मला पोरकट म्हणेल, हा धोका मी गृहीतच धरलेला असतो. मी नाहीय फॅशनचा शौकीन, दुसरा एखादा कुणी असूही शकेल.

---ooo ---

होकार

मला वाटते ती आली आहे
माझ्या चित्तवृत्ती उल्हसित होतात
पण खरे तर नसावीच ती आलेली
पण सचेतन वाटून स्मित येतेच
का हसू का आले ती विचारते
मी म्हणतो मन दुसरे काय
ते जाऊ दे
तुझी बोटे खूप छान आहेत
जणू कधी न पाहिल्याप्रमाणे ती
तिची बोटे उघडून पाहते हं म्हणते
म्हणजे काय मी आणखी काही
छान म्हणालो तर ही काय करेल
मी म्हणतो की असे का होते की
बोलायचे एक असते
आणि आपण बोलतो दुसरेच काही
आता ती हसते किंचित
का हसू का आले मी विचारतो
खरेच नाही माहीत ती म्हणते
मग ती म्हणते माझ्या एका मैत्रिणीकडे
सेम अगदी असेच एक टेबल आहे
त्या टेबलाचा खरे तर मी आभारी आहे
मी म्हणतो का ती विचारते
निरर्थक बोलायला किती छान
झाला त्याचा उपयोग मी म्हणतो मला
तू असलीस समोर की निरर्थक खूप आवडते
निरर्थक असे नाही पण कधी कधी
कळतच नाही मला काही ती म्हणते
सांगूनच टाकू का संकोच न बाळगता
सांग ना मी आलेय कुठे अजून ती म्हणते
मी म्हणतो मला प्रेमकविता लिहायचीय
उदात्त वगैरे काही नाही सुखाची तहान सरळ
तर ती पुन्हा हसते मग म्हणते पुढल्या भेटीत
आणि मग ती आलेलीच नसूनही निघून जाते
होकार मागे ठेवून
--- ००० ---

कविता

कविता म्हणजे काहीतरी सुचलेला किंवा आरपार घुसलेला काही एखादा नवा विचार असतो, हे आधी डोक्यातून काढून टाका. तुमच्या घरातली रद्दी वा पसारा हा माझ्या गढूळ पाण्याचे काय वाकडे करू शकणार आहे ? तुम्ही जपून ठेवलीयत तुमची बालपणातली जरीची टोपी पण माझ्याकडे आहे श्री रामनवमीचा सुंठवडा आणि त्यानंतर तीन मित्रांनी मिळून बदडून दिलेला मार. दु:खांच्या याद्या करताना, तुम्हाला वाटते की तुम्ही घेतलेले सैनिकी शिक्षण आणि नंतर तुम्हाला जाणवलेले अहिंसेचे महत्त्व आणि तुमच्या डोळ्यांतून ओघळलेले मऊ मऊ रस्ते हेच आघाडीवर असायला हवेत. पण तसे नाही हो होऊ शकत, ज्याला जे टोचते ते त्याला दुखणारच ना. तुम्हाला वाटते की तुमचे काही वेगळे आणि अद्वितीय असल्यामुळे इतरांनी हे मान्यच करायला हवे की ते या जगात कायमचे दुय्यम तिय्यम म्हणूनच जन्माला आलेत. तसे तर सगळेच मग्रूर, हिंसक आणि आक्रमकच असतात आणि निकाल जो लागतो तो कोणत्याही मूल्यावर आधारित नसतो. मान्य आहे की तुम्ही दु:खितांचे अश्रू पुसणाऱ्या आणि न्यायासाठी क्रोधिष्ट झालेल्या महान सरड्यांचे अनुयायी आहात. पण इतरही कुणी कासवांचे, कुणी कुत्र्यांचे, कुणी अस्वलांचे अनुयायी असतातच ना. मग ते सगळे प्राणी निसर्गात उगीचच आहेत, असे कोण म्हणू शकेल ? आणि कोणत्या आधारावर मिळणार हा अधिकार कुणालाही ?

तुम्ही म्हणता की भाषेपेक्षा जगणे बघा. रोज मार खाणारी, सिगरेटचे चटके सोसणारी आणि मुलांसह अनेकदा उपाशी राहणारी माउली – तिला एकटीलाच लिहू द्यात मग कविता. आपण लुडबूड करण्यात अर्थच काय मग ? एक साधे घ्या ना लक्षात की प्रत्येक दु:ख अद्वितीयच असणार आहे – त्याचे रंगरूप, आकार आणि दाह वेगवेगळेच असणार आहेत. तर मग कवितेने काय करायला हवे ? नुसती बहुमताची माणुसकी दाखवत फिरायचे ? एकच सांगा – दु:ख असणे महत्त्वाचे आहे की नसणे ? सारखी तीच अर्धवट इमारतीची आणि विषारी पाण्याची जाणीव देत राहिले की झाले ? मुळात हा अद्वितीयपणाचा सोसच आपल्याला दु:खी करतोय का, हा प्रश्न का नाही विचारायचा ? आणि हा प्रश्न वैध आहे हे तुम्ही मान्य केलेत की मेलातच तुम्ही. तुम्हाला वाटेल की आजपर्यंतचे आपले जगणे फुकट गेले. आपण विभक्त माणसे एकत्र जगतो हेच तुमच्यावर बिंबवले गेलेले असल्याने तुम्हाला संवेदनशीलता आणि समता सोनेरी वाटत राहते. पण मुळात आपली दु:खे वेगवेगळी तरी का आहेत आणि हे कायम तसेच असणार असेल तर समता येणार कधी आणि कशी ? आपापले दु:ख हाच तर आपला भयग्रस्त अहंकार नसेल ?

जगरहाटीही टिकवा, सर्व शस्त्रे बाळगा, वाढवा आणि न्यायी राहा – हे तुमचे तत्त्वज्ञान तुमचीच सारखी फाडत राहते, हे तुम्हाला कळत नाही ? तुम्ही नुसते सुखासीन, कंटाळलेले, स्वत:च न्यायाधीश होणारे, समर्थने आणि हेटाळणी यांच्यांतच सुखाचे मार्ग शोधणारे महामूर्ख आहात हे कळणार तरी कधी तुम्हाला ? सगळ्या जगाला कळू द्या आधी मग मी सेफली समजून घ्यायला तयार आहे, हेच म्हणताय ना तुम्ही ? जणू निर्णय सगळे ठरवू शकता तुम्ही कारण तेच तुमचे व्यक्तिस्वातंत्र्य आहे ! तुम्ही नुसते शब्दप्रभू होण्यात सांस्कृतिक प्रगती मानता. बदलते अनुभव आणि बदलते विचार हाच तुम्हाला कवितेचा पाया आणि आशय वाटतो. म्हणजेच सगळ्यांनी सेफ राहात एकमेकांना धोक्याचे राहणे !

तुम्हाला डबक्यातल्या कविता हीच फक्त एकच शक्यता वाटते. त्यातच करत बसा हुशारी. शोधत बसा मार्ग गटारी नमून्यांचे तौलनिक मूल्यमापन करण्याचे. चालू द्या.

--- ००० ---

## २४ तास

समजा शेयर बाजारातले आपल्याला शून्य कळते – समजा कशाला, आहेतच तसे बहुसंख्य लोक. भारतातल्या दोन-अडीच टक्क्यांहून अधिक लोकांना त्यात इंटरेस्टच नाहीय. त्यापेक्षा इंटरेस्ट म्हणजे व्याज मिळवण्यात त्यांना इंटरेस्ट आहे. इथल्या लोकांचा कल गुंतवणुकीपेक्षा बचतीकडे खूप आहे, असे म्हटले जाते. आणि तरीही, बिझिनेस चॅनेल्स बघा – अखंड ज्ञानसत्र चालू असते – की ज्ञानयज्ञ म्हणावे ? नकोच ते – पैसे मिळवण्यात वा घालवण्यात नकोच तो धार्मिक शब्द. तर ते अखंड बोलत असतात. काय बोलतात, कोण जाणे. साताठ लोक असतात. त्यांना म्हटले तर २४ तास बोलता येईल यावर, असे वाटते. म्हणजे त्यांतल्या एकेकालाही. पण काल अखेरचे ज्ञान किती पुरणार ? रोज अभ्यास तर लागणारच. मग चार चार जणांच्या दोन टीम करायच्या. हे बोलताहेत तोवर दुसऱ्या टीमने अभ्यास करायचा. की लगेच टीम बदलायच्या. एक रिले रेसच म्हणा ना. म्हणजे ते लोक, मुले जन्माला घालायचे क्षण सोडले तर सतत त्याच विचारात असतात. आवडच ती. किंवा जीवितकार्यच म्हणा ना. हे पैशाशी संबंधित असल्याने कुणी याला मिशन नाही म्हणणार, इतकेच.

पण त्यांनाच अगदी खास समजायचे काही कारण नाही. काही लोक २४ तास शिक्षक असतात. माझे एक प्राध्यापक मित्र बार निवडताना म्हणत, या रस्त्यावरचा नको, इथे विद्यार्थी भेटतात ! आता समजा गेलाही असेल तो काळ – नीतीमूल्ये कायम तीच तशीच थोडीच राहतात ? काहीजण सततचे पुढारी असतात, काही सततचे दुकानदार आणि काही सततचे परिवर्तनवादीही असतील. तशी ही सगळी व्यावहारिक उपयोगाची क्षेत्रे आहेत, त्यामुळे, ज्याला यशस्वी व्हायचेय तो होणारच तसा २४ तासवाला, हे ठीक आहे. पण कवितेचा, कादंबरीचा व्यावहारिक उपयोग काय ? म्हटले तर काहीच नाही. पण, तरीही, तेही साले २४ तासांचे लेखक वा २४ तासांचे कवी असतात. चेहरा सतत ' दास डोंगरी राहातो । चिंता करितो विश्वाची ।। ' असा. त्यांचे चाहतेही सतत जगाचे सांस्कृतिक उन्नयन कसे होईल या विचारातच गढलेले. ही २४ तसांची काय असते भानगड, असा प्रश्न पडतोच बऱ्याच सामान्यांना. तेही गुंतलेलेच असतात पण निरनिराळ्या व्यवधानांत – त्याला एकच असे सूत्र नसते. सूत्र म्हटले तर स्वत:चा बचाव कसा करत राहावे, हेच फक्त. आता, बहुजनांचा गौरव करून मते मिळवण्याची पद्धत आहे, त्यामुळे इथे एक फारच मोक्याचा प्रश्न पडू शकतो. भरकटणाऱ्या बहुजनांचा गौरव करावा की निवडक २४ तस वाल्यांचा ?

आणि इथे येतो तो खरा मूलभूत प्रश्न – २४ तासवाले असणे आणि भरकटलेले असणे यांत फरक कसा, काय असतो आणि असतो का मुळात ? समाजाला हजारो वर्षांची सवय अशी लावलेली – आणि त्यानेही स्वेच्छेने लावून घेतलेली सवय अशी असते की हा प्रश्न विचारायचाच नाही. काही काय बरेच नट गोरेगोमटे, ऊंचेपुरे असतात आणि २४ तास केसांचे घोस उडवत असतात. काही म्हणा की बऱ्याच म्हणा नट्या तर स्तनदर्शनावरच खूप भर देताना दिसतात. काही ना काही २४ तास असावे या स्वस्वीकृत निवडीचेच असणार ना हे परिणाम. आणि सतत भरकटलेले असणे हे सर्वसामान्यांचे धोरणही २४ तासांचेच तर असते की !

२४ तासांचा हा मंत्र खाऊनच टाकतोय की काय एकूणच जगणे ? आणि तू २४ तास लेखक, मी २४ तास कारकून, मग आपला संबंधच काय ? का एवढा सोस त्या २४ तास ओळखीचा ? ती ओळखच तर आपल्याला एकमेकांपासून तोडत नसेल ? " आमचा सामान्य माणूस याला कधीच मान्यता देणार नाही ! " अरे च्युत्त्या, सामान्य माणूस म्हण किंवा तू धरून तू ज्याला ज्याला खास समजतोस तो म्हण, हा २४ तासांचा रोग आवडत नाही असा एकजण तरी आहे का ? ज्यालाज्याला हा रोग तीव्रतेने पकडतो तो तो अभिमानाने सांगत राहतो, मी २४ तास अमुक अमुक असतो !

--- ००० ---

प्रेरणा

आजच सकाळी फिरायला गेलो तेव्हा रस्त्याने चाललेली एक पालखी पाहिली. बारा-पंधराच माणसे होती. पुढे एकजण राजचिन्ह टाइप गोल झेंडा घेऊन चालला होता. बाकीचे पालखीमागून चालत होते. पालखी नक्कीच जड होती. ती वाहण्यासाठी पुढे एक आणि मागे एक असे जरा धट्टेकट्टे लोक होते. ती एखाद्या देवीची वा देवाची असावी पालखी. आत मूर्ती, हार, फुले, वगैरे होते. त्या दैवताचा मधून मधून जयजयकार चालू होता. पण त्या भक्तांची वाणी स्पष्ट नसल्याने म्हणा किंवा माझ्या कानांत दोष असल्याने म्हणा किंवा माझे आकलनच मंद असल्याने म्हणा, ते दैवत कोणते आहे ते मला कळले नाही. पण ज्या अर्थी गर्दी इतकी कमी होती त्या अर्थी त्या दैवताचा दबदबा जरा छोट्या समूहातच असावा, असे वाटले. " जोरात द्या रे आवाज ! " असे मध्येच एकजण जोरात सांगत होता. ते सगळे मिळून एक असण्याचा आत्मविश्वास आणि शौर्यासाठी आवश्यक असणारी मग्रूरी हे दोन्ही त्यांच्याकडे असल्याचे स्पष्ट दर्शन घडत होते.

तुम्ही दुचाकी चोर असा की माकड पालक असा तुम्हाला आशीर्वाद आणि प्रेरणा लागतातच. मराठी चित्रपटातले दरोडेखोरही देवीचा आशीर्वाद घेऊन मगच कामगिरीवर निघतात. हे खटकण्याचा प्रश्नच नसतो. प्रेम कुणीही करावे तसेच भक्ती कुणीही करावी, हे असतेच. कामावरून माणूस चांगला वा वाईट, पुण्यशील वा पापी ठरवणे हे अध्यात्मात नसते. दरोडेखोरच काय, वेश्या वा खाटिक हेही देवाचे प्रिय भक्त असू शकतात. हे जणू माणसाच्या बुद्धीची मर्यादा मान्य करणेच असते. बुद्धीने, व्यवहारात होणारे मूल्यमापन ओलांडायची सहज तयारी यात असते.

याच आध्यात्मिक ज्ञानातून कोणत्याही देवता वा विभूती कुणीही, ( वापरल्या नाही म्हणत ), घेतल्या प्रेरणेसाठी तरी चालू शकते. एखादे महाराज मग ते आध्यात्मिक क्षेत्रातले असोत की शौर्याच्या दालनातले असोत, ते परस्पर विरुद्ध समूहांचेही प्रेरणास्थान असू शकतात. इथे बुद्धी जरा मार खाते म्हणून ती उचलही खाते आणि आमचेच महाराज खरे आणि त्यांचे खोटे असा प्रचार करत राहावे लागते. कुठे ते महाराज आणि कुठे हे बाजारबुणगे बुद्दू लोक असे काही म्हणायला यात काही वावच नसतो. कारण, माणसे, कृती, घटना यांना त्यांचे असे स्वतंत्र मूल्यबिल्य काही नसते, हे विनम्रपणे मान्यच असते.

अनेक नोबेलविजेते लेखक-कवी, शास्त्रज्ञ एवढेच काय युंग हा मानसशास्त्रज्ञही म्हणतो की जगण्यात एकटेपणा महत्त्वाचा असतो. पण सामान्यत: लोक भित्रे असतात. त्यांना आधार लागतो, प्रेरणा लागते, मार्गदर्शन लागते. याचाच दुसरा अर्थ असाही होऊ शकतो की अनुयायी ही भूमिका सदोदित वागवणारे लोक हे भित्रे आणि ढोंगी दोन्ही असतात. त्यांच्या आदर्शाच्या गुणांचा त्यांच्यांत अभाव असतो आणि तरीही आपण त्या गुणांचे पूजक आहोत असे त्यांना दाखवायचे असते. एकाच महाराजांचे भित्रे अनुयायी आपापल्या टोळ्यांच्या जिवावर एकमेकांच्या उरांवर बसायला तयार होतात आणि एकमेकांना नष्ट करू इच्छितात. ते शक्तिमान नसून कमकुवत आणि त्यामुळेच हिंसकही असतात.

जो समाज एकूणात अशा कोट्यवधी कमकुवत लोकांनी युक्त असतो तो राजकारणाच्या क्षेत्रात सहज वापरला जातो. तो समाज स्वत:चे चिंतन वा समज यांना महत्त्व देणारा नसतो. सर्वच क्षेत्रांत तो परका ठरतो. द्वेष, वितुष्ट आणि लढाऊ वृत्ती यांच्याशिवाय एखादे श्रेयस्कर काम करणारे लोक कोणत्याही अनुयायांच्या टोळीत असू शकतात का, हा प्रश्न इथे जगण्याच्या बाबतीत प्रेरणादायी ठरू शकतो. आणि मी अमुक यांचा अनुयायी आहे म्हणून मी श्रेष्ठ आहे, असे काही नसते, हे ज्ञानही इथे होऊ शकते.

--- ००० ---

कवितेचा अर्थ

कसला अर्थ ? तसले काहीही नसते. नुसते एका एका सुखलोलुप माणसाचे चीत्कार असतात फक्त. माणसाला थोडे संगीत आवडते, भाषेच्या जुन्या लकबी आवडतात, दागिन्यांसारखी प्रतिमांची झुंबरे आवडतात तर द्यायचे ते एकत्र. मनमोहन देसाई म्हणत की बाबा प्रेक्षक काय अपेक्षा ठेवून येतो याचा तुमचा नीट अभ्यास असायला हवा. त्याच्याकडून तुम्हाला पैसे आणि वाहवा हवी आहे ना, मग त्याला फसवायचे नाही. त्याला हवेय ते हवे तसे द्यायचे. तुम्हाला काय महत्त्वाचे वाटते ते ठेवा उंदराच्या बिळात. कोट्यवधींचा खेळ तर आवडतोय पण अंगात भरलाय शहाणपणाचा ताप आणि तो तरी कसला तर भ्रामक – हे नाही चालणार. गरीब, सज्जन, न्यायी, खऱ्याचा भोक्ता आणि तरीही निर्भय अशा माणसाचा विजय दाखवावाच लागेल. कवितेतसुद्धा दु:खाचे कवी असोत की सुखकारक भावभावनांचे उत्पादक असोत, सगळे मनमोहन देसाईच असतात. आहे तेच जगणे, गिरवत, त्यातल्या त्यात सुशोभित करत, भाषिक स्तरावर सुखमय करत सांस्कृतिक उन्नयनाचा आभास तयार केला की बास. त्यासाठीसुद्धा किती वाचावे लागते, पॅशनच असते ती एक. जरा काळानुरूप बदल करत जा की झाले. आता काळानुरूप म्हणजे काय तर एक उदाहरण घेऊ. शहरे वाढायला लागली ना मग त्याचे अप्रूप वाटेल असे सारखे शहर शहर करत बसायचे. शहर काळोखात, शहर परके, वगैरे. त्यात मग, दंगली, जमावबंदी, नाक्यावरचे खून असे काही घेत जायचे. हॉटेले, मॉल्स, मल्टिप्लेक्स यांतून मानवी जगण्याचे सुखदु:खांचे आयाम व्यक्त करत राहायचे.

आता हे आयाम तरी कसे ? समजा मराठा जातीचा कवी आहे तर महाराष्ट्रात तो म्हणणार की इथे संख्या आहेच ना जास्त, लोकशाही आहे, त्यांना मिळणारच ना प्राधान्य ! पण तेच भारतीय स्तरावर, हिंदूंना मिळणारच ना प्राधान्य, असे तो म्हणत नाही कारण त्याची राजकीय गणिते वेगळी असतात. तो कविता लिहिणार त्या अखिल भारताच्या हिताच्याच असणार. भेदभाव नको म्हणणाऱ्या. माणसा माणसा माणूस हो किंवा मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना किंवा सगळ्यांच्या अंगातले रक्त लालच असते अशा मूल्यात्मकतेचा उद्घोष करणाऱ्या. त्याला असा प्रश्न कधीच नाही पडणार की बाबा का नाही होऊ शकत माणसाचा माणूस. पण, मी केंद्र आणि तरीही माणसाचे हित अशा शिवधनुष्यी मूल्यात्मकतेत तो खुश असतो. काही इतर कारणांनी दु:खी असला तरी खुश असतो. साधेच असते सगळे. विषमता जायला हवी की नको, सर्वांना समान संधी हव्यात की नकोत, न्यायाचे वातावरण हवे की नको – अशा प्रश्नांना कोण नको म्हणेल ? आपोआप सगळे पुरोगामीच की !

इतके सगळे सगळ्यांना कळत असून, रोज एकमेकांचे मर्डर करताना लालच रक्तदर्शन होत असून आणि सगळ्यांचाच जन्म सेक्समधूनच झालेला असूनही का बाबा ही विषमता, ही बेफिकिरी, ही हिंसा, असे प्रश्न त्याला पडत नाहीत. त्याला भाषिक अर्थांचे गोडवे गिरवण्यातच इंटरेस्ट असते. काढा बरे तुमच्या कवितांचे वस्त्रालंकार बाजूला – काय आहे आत – तर साधे एक सुखयाचक शरीर ! आणि तुम्ही महाकवी ?

काहीही कळायच्या आधी कवींनी वेडे व्हायला हवे. सुखाचे वाटणारे किंवा सवयीच्या खोट्या मूल्यात्मकतेचे अर्थ येताच कामा नयेत कवितेत – या मार्गाने जायला हवे. मनांचे गोंडे घोळवणे आणि वाचकांचे तुष्टीकरण हे मार्ग सोडायला हवेत. स्वत:लाच न समजणारे असे दुर्बोध आणि निरर्थक लिहिता यायला हवे. माहीत असलेला आपलाच दुटप्पीपणा गिरवत किती काळ एकमेकांना फसवत राहायचे, हा प्रश्न हवा समोर. ‘ मला समजलेय ‘ हा भाव समूळ नष्ट व्हायला हवा. मूल्य नाहीय माहीत, इथून सुरुवात व्हायला हवी.

--- ००० ---

## पसायदान

काहीही झाले तरी कुणीही
माकडछाप नाही म्हणता कामा
एक वेळ कुणी सम्राट म्हटले तर
बरेच असे धोरण ठरवून
सिनेसंगीत चालू ठेवले
विरह दु:ख हर्ष जिद्द
यांच्या रोषणाईने
दणाणून टाकले सर्व
संबंधांचे आकाश

माझ्या नादी नका लागू
ना माझ्याशी पंगा घ्या
कधीही काहीही घडू शकेल
याची भीतीच नसल्यासारखे
वेडे ठेवले डोळे

दारे आपटली
दगडफेक केली
फावल्या वेळात
निरांजने ठेवली तेवत
दारू हेच परब्रम्ह समजून

त्याचबरोबर
वाचनही खूप ठेवले चालू
आणि पाहणे मोबाईलवरचे
प्रक्षुब्ध मतप्रदर्शन

बीपी हा काही रोग नव्हे
तीच आहे जगण्याची सार्थकता
हे समजून प्रसंगी
शांतही राहून दाखवले

आपल्या पायांचे तीर्थ
सर्वांना मिळावे या सहृदयतेने
पसायदान म्हणत राहिलो
--- ००० ---

शब्द

अनेक कवी मित्र-मैत्रिणींच्या
जंगलांतून बागांतून मी येतो फिरून
असंख्य वेळा ठेचकाळत
त्यांचे शब्द वस्तू हवा आणि मूडस यांवर

आणि होते मला ज्ञान
नसतातच त्या भिंती
माझे डोके जखमी करणाऱ्या
उलट ते असतात

सहज वाहण्याचे मार्ग
जगणे जणू लांब
तिकडे कुठेतरी असल्याने
इथे काही अडथळाच नसलेले

शब्द असतात फक्त
मला जाणीव करून देण्यासाठी
की त्यांच्याकडे दुर्लक्ष करत
चालण्यातच असते कविता
--- ००० ---

## पांढरा

असे एक फूल आहे
जे झाडापासून खुडताच
अधिकाधिक बहरत राहते

त्यामुळेच तुम्ही मला विचारता
मी ठेचकाळलो तरी रक्त कसे नाही येत
आणि मी रक्ताऐवजी
दुसरेच कुठले इंधन वापरतो का
तुम्ही हेही विचारता की
मला आठवणी असतात की नाही
माझा अपमान ज्यांनी केला
ती माणसे मी विसरूनच जातो
की अपमानच विसरून जातो

खरे तर हे नाहीयत तुमचे प्रश्न
योग्य प्रश्न सुचण्याची शक्यताच
तुम्ही चिरडून टाकलेली आहे

धडपड करणे आयुष्य
पणाला लावणे
यांवरच आहे तुमचा विश्वास
तुमचा आशावाद दांडगा आहे
पण तो निराशावादातून आलाय का
हा प्रश्नही नाही सुचणार तुम्हाला
सतत व्यग्र राहण्यासाठी
असल्यास कामधंदा संपवून
सतत सतत राजकारणात डुंबत राहणे
रक्ताळलेल्या हीच वाटते तुम्हाला
स्वर्ग अवतरण्याची शक्यता

खरे तर आता तुम्ही क्रांतीबिंतीची शक्यता
दृष्टीआड केलेली आहे पण तरीही
तुम्ही जिंकण्याचा बिंदू सापडेलच
या बाबतीत तुम्ही निश्चिंततातुष्ट आहात
तुमची सात्त्विक संख्या आणि फोर्स
वाढला की झाले

इतर रंग दुष्ट आहेत साले
तुम्ही पांढऱ्या रंगाचा वापर
वाढवत न्या सतत
सगळ्यांचे गणवेश पांढरेच करा
तसे सैन्य युद्धे अधिक
मूल्यवर्धक करू शकेल

२१ सप्टेंबर लक्षात ठेवा
जागतिक शांतता दिन
त्या दिवशी युद्ध आणि हिंसा बंद

पूर्वी नेहरू आकाशात
पांढरी कबुतरे सोडायचे बघा
फोटोही आहे ना तसा
नंतरच्या नेतृत्वाने ती पद्धत बंद पाडली
त्यामुळेच लोचा झालाय

आणि याच्याच जोडीला
सगळे प्रश्न चर्चेने सुटतील
या सुभाषिताला धरून
तुम्ही जाऊ इच्छिता कुलूमनालीला
आत्मज्ञानासाठी कारण
तिथेच ते उपलब्ध आहे

तिथेही पांढरेच लागतात पोषाख
या जाऊन
--- ००० ---

## विचार

विचार प्राणच घेतो
कवितेचा मोहात
फ्यूज उडावा
आणि वाटाणे सरकावे
डावीकडे
याशिवाय वेगळे
कसले असणार मैदान

म्हणून विचारात
मिसळायला हवे देमार चित्रपट
आणि उडती फुलपाखरे
वाटल्यास विमाने

फरकच पडू नये
तुम्ही सुशिक्षित आहात
की तुम्हाला नुसतेच गळू झालेय
यांत आणि शास्त्रीय संगीत
तुमच्या जेवणात असते की तुम्ही
नुसतेच गप्पा मारता
माणसाचे भले होण्याच्या यांत

आपले बरोबर
ही खात्री असल्याने
जग वाटते तुम्हाला एक अंडे
असे चिडू नका
तुम्ही म्हणजे आपण हो

म्हणजे शस्त्रांनीच
सोडवावे लागणार ना
प्रेमाचे त्रिकोण आणि
कोण बरोबर आणि पावरबाज ते
विचार चाटायचे थांबवून

भोले मत बनो दुनियाका मजा लेलो
दुनिया तुम्हारी है – म्हणजे आपली हो
--- ००० ---

फुलपाखरू

तसे तर आपल्या सबोध-अबोध मनात लाखो गोष्टी पडून असतात. उपयोगाच्या वेळी पुढे येण्यासाठी. किंवा काही अस्पष्टही होत असतील. आता लाखो जास्त वाटत असेल तर हजारो म्हणू. तर ते सगळे न्यूरॉन्समध्ये साठवलेले असते म्हणे. आपण काही त्या शास्त्राचे अभ्यासक नाही, त्यामुळे एवढे खूप झाले. थोडी माहिती आणि थोडी कल्पना असे मिळून आपले सत्य. आणि चालते. काही बिघडत नाही. मुख्य काय तर काही अनुभव, रागलोभ, वस्तू हे सगळे घेऊनच जगत असतो आपण. ते सगळे आपला स्वभाव, विचार, वागणे यांवर प्रभाव टाकत असणारच. एखादी व्यक्ती ओळख नसतानाही आपल्याला आवडत नाही किंवा दुसरी एखादी फारच आकर्षक वाटते, तेही त्यातूनच घडत असेल. सारांश काय की आपल्याला पाहाता क्षणी कळते की ही वही आहे, ही नदी आहे, ही कंपासपेटी आहे, हा वाघ आहे, वगैरे. काही वेळी ओळखता येत असेल पण नाव नसेल आठवत, वगैरे.

तर फुलपाखरू ही काही नेहमी लागणारी गोष्ट नव्हे. विचारही नव्हता डोक्यात. स्वप्नातही नव्हते की असे एखादे येईल आणि इतके आपल्याला झपाटून टाकेल. म्हणूनच मी लाईफ हे अकल्पनीय असते, असे म्हणत असतो. तर ते आले, मस्त रंगीबेरंगी आणि सरळ माझ्या खांद्यावरच बसले. आता त्याच्या मेंदूत कितपत काय काय सोयी असतील, कोण जाणे. मी नुसतीच एक भिंतीसारखी वस्तू आहे की एक जिवंत प्राणी आहे, हे तरी त्याला कळले असेल का, ते माहीत नाही. पण त्याने विश्वास तर टाकला माझ्यावर, हे नक्की. मी एखादा ‘ हानिकारक बापू ‘ ( चित्रपट, ‘ मेरी कोम ‘ ) नाहीय हे त्याला कसे कळले असेल ? की निरुपद्रवीपणाचे किरणच बाहेर पडत असतील माझ्या असण्यातून ? मी त्याला प्रतिसाद द्यायला सुरुवात केली, म्हणजे केले काहीच नाही, आतल्या आत आनंदी झालो. ते कळलेच असेल ना त्याला माझ्या किरणांतून. मग ते माझ्या कानावर जाऊन बसले, मग डोक्यावर. मी आनंदित होणे हे त्यालाही आवडले असणार. त्याची आधीची मनस्थिती मला कशी माहीत असणार, पण, त्याच्या सहवासाने मी सुखावलो हे त्याला खूपच आवडले असणार. मी त्याला ना मध देणार होतो ना कसले ज्ञान, तरीही ते माझ्याजवळ राहू इच्छित होते. दोघेही खुश असल्याने जणू तो एक समारंभच घडत होता.

मला ते उत्तेजक वाटू लागले तसे आले माझ्या लक्षात की आता माझे मन त्याच्यावर हक्क मागणार – त्याला माझ्यात बंदी करू पाहणार. ते खूप नाजुक होते. माझ्या अशा कोणत्याही कृतीने वा प्रयत्नाने ते दुखावले गेले असते. कायमचे निघूनही गेले असते. त्याचे निघून जाणे एक वेळ ठीक पण ते माझ्याकडून दुखावले गेले तर मी स्वत:च आपोआप दुखावलो गेलो असतो. म्हणून मग मी फक्त मनातल्या मनात त्याचे लाड करावे, गोंजारावे आणि त्याचे सुख घ्यावे, असे ठरवले. मला सुख मिळते हे त्याला कळत असेल का ? कळतच नसेल तर आपल्याला आपल्याच कल्पनेचे सुख आणि कळत असेल समजा तर मला सुख देणे त्याला आवडते, असाच होतो ना त्याचा अर्थ ? किंवा त्याच्याही पुढचे म्हणजे मला सुख मिळण्याचे त्यालाही होत असेल सुख ? !

काय असेल ते असो. किती वेळ राहील ते असे सहवासात ? त्यालाही या सहवासाचे व्यसन लागेल का ? मग तर वर्षानुवर्षे चालेल हे ! हे नुसतेच एखादे फुलपाखरू थोडेच आहे ? अनपेक्षितपणे आयुष्यात आलेली ही एक वाऱ्याची टिकाऊ, सुखद झुळुकही असू शकते !

मी तिला डिस्टर्ब न करता असू द्यायचे ठरवतो, जे आहे ते. कृती करून काहीच कब्जात नाही घ्यायचे पण हे आपले स्वत:चे जगणे आहे हे मात्र समजत राहायचे ! मजेत ! असे !

--- ००० ---

हक्क

तो नसतो हक्क
ते असते हळूहळू उमलत जाणारे अधीन होणे
ती नसते मागणी
ते असते अर्पण होण्याची ऑफर देणे

त्या व्यक्ती खूपच रिच असतात
असंख्य कथांच्या निर्मात्या
मग त्या रस्त्यावर झाडू मारत असोत
की केबिनमधल्या सुगंधी बॉस असोत

जगात वावरताना त्यांना समजत असतात
निसर्गाच्या खट्याळपणातून निर्माण होणाऱ्या
अदृश्य लपवल्या जाणाऱ्या असंख्य मानसिक हालचाली
त्याही अदृश्यपणे मनात हसत वाहू देतात ते प्रवाह

प्रॉब्लेम एकच असतो
बरोबर-चूक आधी ठरलेले असते
आणि मनांचे स्वातंत्र्य प्रवाही असते

मनांना असते सवय
उत्तेजक आंतरद्वंद्वाची
सवयच नव्हे तर असते आकर्षणही

यातूनच प्रवाहातला एखादा बिंदू होतो यशस्वी
आणि करतो तयार हक्काचे वर्तुळ
त्यातून एखादी वा अनेक
जखमाही शक्य असतात
पण त्या स्वत:ची ओळख
पक्की करणाऱ्या असल्याने मोहकही असतात

गाजवणारी वा गाजवून घेणारी
कोणतीच व्यक्ती नसते अनभिज्ञ
ओळख पक्की करता करता
ओळख विसरूनच जाण्याची असते ती घटना

कुणी नसतेच तिथे तर घटना तरी कसे म्हणणार
--- ००० ---

ईश्वरी शक्ती

जणू एखादा विक्रेता सादर करत होता
वस्तू जाणीवपूर्वक त्यांची थोरवी ओळखून
पण जणू रुक्षपणे जणू वस्तुस्थिती फक्त
जणू चालले होते बातम्यांचे निवेदन
कशाचाच काहीच परिणाम व्हायची
गरज नसलेले अलिप्त

पण तो तर वर्षाव होता
असंख्य धारा सुखद गार आणि उत्तेजक उष्ण
सगळी ईश्वरी शक्ती हो
आकार प्रमाण एक टक सुरी
जणू परस्पर
ही पूर्ण नकारात्मकता होती की कृतक भोळेपणा
की कर्तृत्व टाळून टाकलेली भूल

अशी हवीय ईश्वरी शक्ती जी मुद्दाम जाणूनबुजून
करेल नासधूस आणि घेईल कृतीचा आनंद
आणि म्हणेल समजुतदार भोळेपणाने
सॉरी हं माझे लक्षच नव्हते –
---- ००० ---

शक्यता

विश्वास आपुलकी हवेसे असणे
हे सर्व आहे
सौंदर्याच्या सर्व जागा
सादर आहेत
लगट अमान्य नाही
सर्व सूचकतेला वाव आहे

तरीही भाषा म्हणजे
नुसते व्याकरण आहे
आणि शब्द म्हणजे नुसती
अक्षर रचना

ओळखीचे संदर्भ खूप असूनही
अत्यंत तीव्र जवळिकीची भीती नाही
अमुक अवयव तमुक आकार
यांचेही संवाद मान्य आहेत

तरीही हे सर्व म्हणजे
ना प्रतिसाद ना सामील असणे

मनाचे सर्व कप्पे
पूर्ण विश्वासाने खुले
दु:ख राग विश्वासघाताची जखम
आणि लढ्याची कहाणी
आणि एक नाजुक कोपरा

सर्व दिले जात असूनही काहीच न मिळणे
नकोच आहे काही अशी एक भिंत
पण तीही सौम्य अनाक्रमक

आसक्ती सुखेच्छा हेही स्वीकारलेले
फक्त एक वास्तव म्हणून
समंजस अलिप्ततेत
सगळ्या शक्यता शून्यावत
पण सर्वच अबाधित राहू देत
--- ००० ---

## एक गूढ फूल

वादळ वारा ऊन पाऊस हे दृश्य
सहज हाताशी
ज्वालामुखी जणू एक पाळीव जनावर
मनात नेहमीच चाटणारे
हाकेची वाट पाहात

वर्षानुवर्षे ही अशी
सादप्रतिसादांची खाण
आपोआप घडवणारी
कवितांची नक्षी
तिच्या कह्यातल्या प्रदेशात

संघर्ष विसरून अपमान विसरून
प्राणघातक हल्ले विसरून
अबाधित देऊ करणारी
तिचे रत्नखचित वैभव
एका स्पर्शात जिवंत होणारे
मुसमुसत

या संबंधातून जन्माला येणाऱ्या
अनेक स्फोटांची जननी
समाजहीन भूतकाळहीन
जगाची स्वामिनी

कुठे काय काय घडले होते
आज खरचटत राहणारे क्षण
उकाडा उद्वेग कंटाळा तिरस्कार
यांना एका कटाक्षात बाजूला सारून
समजुतीच्या मिठीत सामावणारे
अगाध अमर तारुण्य

या उत्तेजक काळोख्या
अनिर्बंध वाटांच्या संभारात
कुणालाच माहीत नसलेले
एक गूढ फूल
--- ००० ---

प्रतीक्षा

खळाळते निर्झर
तिकडे मग्न
हे विसरून
आणि इथे
एक टेबलखुर्ची
कविता
घडण्याच्या प्रतीक्षेत
--- ००० ---

रे हिंद बांधवा

सकाळी जागे होताना हे शब्द आले डोक्यात. आत्ता काय संबंध ? हा काही विषयच नव्हता समोर गेली कित्येक वर्षे. कदाचित असे काही घडले असेल की झोपेत काही आठवण्याचे प्रयत्न चालू असताना धक्का लागून मेंदूतला एखादा न्यूरॉन खाली पडला असेल आणि तो उचलून पुन्हा जागेवर ठेवताना माझे त्याच्याकडे लक्ष गेले असेल आणि तोच नेमका हा असावा ! ज्यात साठवून ठेवलीय ती शाळेत शिकलेली भा. रा. तांब्यांची कविता –
रे हिंदबांधवा, थांब या स्थळी अश्रु दोन ढाळी,
ती पराक्रमाची ज्योत मावळे इथे झांशिवाली ll ध्रृ ll
जरा वेळ ती ज्योत की ही ज्योत असा एक संभ्रम झाला निर्माण पण तीच बरोबर हे आले लक्षात. आणि कदाचित ज्योत हा शब्द असलेला मजकूर साठवायचे न्यूरॉन जवळ जवळच असतील, त्यामुळे लगेच हेही आठवले शाळेतलेच – मनमोहन नातूंची कविता –
ती पहा, ती पहा, बापुजींची प्राणज्योती
तारकांच्या सुमनमाला देव त्यांना वाहती
त्या वेळी आम्ही हीही चर्चा केल्याचे आठवले की खरोखरच अशी प्राणाची काही ज्योत वगैरे असते का. पुढे हिंदी सिनेमांतून कुणी मेल्यावर तशी एक ज्योत जाताना दाखवत असत. नंतर तर, कुणी हा प्रयोग पसरवला कोण जाणे, पण, मरू घातलेला एक माणूस काचेच्या बंद खोलीत ठेवला होता म्हणे तर तो मेल्यावर त्या क्षणी त्या काचेला तडा गेला ! म्हणजे प्राण असतोच – त्याची ज्योत प्रत्येक वेळी दिसेल, न दिसेल. तो प्रयोग म्हणजे, आम्हाला माहीत असलेले सिद्ध करणारा नुसता आमच्या शहाणपणाचा पुरावाच नव्हे तर जगापेक्षा आम्ही खूप पुढे असल्याचा गर्वही असायचा त्यात !
खरे तर मला असे वाटते ना की हे असे खूप न्यूरॉन निष्कारण वाया जातात किंवा अनावश्यक बोझ असतात आपल्या डोक्यात. माणूस समजा पहिल्यापासून शहाणाच असता, त्याने कुणावर आक्रमण वा अन्याय केलेच नसते तर या मोठ्या माणसांची काय गरज होती ? किती ते ? एवढे सगळे अनावश्यक मोठे आपल्या मेंदूत जागा अडवून बसलेले ! परत त्यांच्यासाठी कृतज्ञ राहा, त्यांच्यापुढे न्यूनगंड बाळगा त्यांच्या विटंबनेने पेटून उठा, मर्डर करा – घाण सगळी जगण्यातली ! आणि हे झाले मोठ्यांचे, बाकी आणखी किती खूप आहे असे साठवलेले मेंदूत जे अभिमान, गर्व, अस्मिता या विभागात मोडते. त्यातही हिरवा रंग बघितला की कुणाचे पित्त खवळते तर कुणाचे भगवा बघितल्यावर. कुणाला संस्कृत काही दिसले की क्रोध आवरत नाही तर कुणी निरांजनाला हसतो. पण हे साले सगळेच कोणत्या ना कोणत्या चिन्हांत अडकलेलेच असतात – म्हणजे त्यांचे न्यूरॉन. सगळे साले अमुक दिवशी तमुक ठिकाणी गर्दी करणार, हे ठरलेले आहे. वर्षानुवर्षे ! याचा अर्थ काय होतो – आपल्या असंख्य न्यूरॉन्समध्ये काय काय भरायचे ते काम आधीच होऊन गेलेले आहे. आणि आपण फक्त त्या न्यूरॉन्सच्या गुलामगिरीत जगतो आहोत. ब्रेन वॉशिंगला नावे ठेवणारे, त्याची हेटाळणी करणारे आपण आधीच ब्रेन वॉश झालेले आहोत. वॉश म्हणजे स्वच्छ करणे नव्हे तर कायम बांधून ठेवेल अशी घाण न्यूरॉन्समध्ये भरणे. कशानेच दुखावला जात नाही, अपमानित होत नाही असा कोण आहे ? असा कुणीच नसेल तर सगळेच प्रतिगामी म्हणजे भूतकाळगामीच म्हणायला हवेत – पुरोगामी माणूस असूच नाही शकत ! ती फक्त ‘ स्वर्ग ‘ या कल्पनेसारखी आपल्या न्यूरॉनमध्ये कुणीतरी भरून ठेवलेली कल्पना आहे. सगळीच माणसे गाढव असतात ( गाढव म्हणजे बेअकली हेही असेच एका न्यूरॉनमध्ये भरलेले ! ) त्यामुळे ती

आपले आणि आपल्या टोळीचे राज्य आणू पाहतात आणि असे समजतात की त्या टोळीचे राज्य अन्यायी होते, आम्ही न्यायाचे राज्य आणणार आहोत ! खरे असेल हे ? इथे येतो प्रश्न की, तरीही, तुलनेने का असे ना, राज्य चांगले वा वाईट असू शकतेच ना ? असेल ना, पण ते आम्ही आणू, एवढेच तर म्हणायचेय. आणि चिंता करायची नाही – भाषा आणि न्यूरॉन्समध्ये साठवलेली, आपण निवडलेली माहिती, यांत अशी सोयच असते की कशाच्याही विरोधात बोलता येते आणि कशाचेही समर्थन करता येते ! सारांश, माणसाने आत्मकीव करत रोज स्वत:वरच ढाळावेत दोन अश्रू ! आणि बघा, आत्मकीव मध्ये आत्मा आलाच ना, म्हणजे ज्योतच ना !

--- ००० ---

लिंगडे sss बेले sss …

एक फिरता विक्रेता हातगाडीवरून कलिंगडे आणि आंबे घेऊन चालला होता. त्याची आरोळी होती, “ लिंगडे sss बेले sss “ ! म्हणजे, बहुतेक, कलिंगडे आहेत आणि आंबे आलेत, असे असावे. पण मग तो पूर्ण, नीट का नाही म्हणत ? एम बी ए वाले म्हणतील की त्याची कम्युनिकेशन स्किल्स ( संपर्क कौशल्ये ) कमी पडतात. किंवा भाषेची एवढी काळजीच नसावी त्याला. पण करायचे काय ते ? या वेळी तो इथून जाणार हा विश्वास नुसता तयार करायचा आहे त्याला की बास, उद्यापासून लोक लक्षच ठेवतील. आणि आत्ताही ज्याला काही घ्यायचे असेल तो बघेलच ना, की बाबा काय विकतोय हा, ते. पण त्याची आणखी एक चूक होत होती. तो गाडी फार फास्ट घेऊन चालला होता. म्हणजे, त्याची आरोळी ऐकून कुणी टेरेसमध्ये येईस्तोवर तो खूप पुढे गेलेला असणार, मग लोक नाद सोडूनच देणार तो. किंवा मग त्याचा खरा, उभे राहून विक्री करायचा एरियाच वेगळा असेल आणि जाता जाता उगीच आपले काही जमले तर बघू, असाही असेल त्याचा विचार. आणि थोड्या वेळाने जे कुणी बाहेर पडून तिथून जातील आणि त्याची गाडी पाहतील तेव्हा येईलच ना त्यांच्या डोक्यात की, अच्छा, कालिंगडे आणि आंबे, म्हणजे हाच तो, सकाळचा !

कुणी म्हणेल, तुम्ही काय बहुजनांची भाषा आणि अभिजनांची भाषा अशी तुलना करून त्या बिचाऱ्याची चेष्टा करताय का ? त्याला उत्तर असे देता येऊ शकते की असे काही कुठे हवेतही नसताना असे का येतेय बाबा तुझ्या मनात ? आणि, बहुसंख्य आणि अल्पसंख्य अशी फूट पडू नये हे उदात्त तत्त्वज्ञान सांगत तूच गावभर फिरत असतोस ना ? मग तसाच एकोपा बहुजन आणि अभिजन यांच्यांतही राहावा, अशी इच्छा बाळग ना ! अहो, तसे नसते, अबोध मनात काय काय घडत असते – आणि कुणाचेही श्रेष्ठत्व हे चेचलेच पाहिजे ! सकाळी उठून एवढे ओझे घेऊन जायचे कष्ट करून बघा म्हणजे समजेल. अरे हो, शारीरिक कष्ट महत्त्वाचेच आहेत पण मनाचे कष्ट तू वेगळे का समजतोस ? शरीर आणि मन एकच असते. शरीराशिवाय मन असूच नाही शकत. मन हा शरीराचाच एक भाग असतो. त्यामुळे, शरीराचा गौरव आणि मनाची नालस्ती, असेही नको ना करूस.

खरे तर प्रत्येकच माणूस कोणत्या ना कोणत्या कारणाने आपले असणे ठामपणे अधोरेखित करत असतो. आपल्याकडे गट, समूह, टोळ्या खूप आहेत. त्यामुळे, श्रेष्ठत्व, अहंगंड, न्यूनगंड वगैरे असले प्रॉब्लेम्स फार आहेत इथे. त्यामुळे झालेय काय ते बघा ना. आजच बातमी आहे की सुखाच्या – आनंदाच्या बाबतीत भारत हा जगात शेवटून अकराव्या नंबरवर आहे ! आधी आपण म्हणणार की हे संशोधन विश्वासार्ह आहे का मुळात ? असेच आणखी एक संशोधन केले तर भारत जगातला सर्वात जास्त आनंदी देशही ठरू शकेल. उगीच ते फार मनावर घेण्यात अर्थ नाही.

म्हणजे, आले ना लक्षात, काहीही विका, कालिंगडे-आंबे असोत की मन-बुद्धी, तुम्ही देशात आनंद कितपत निर्माण करताय, हेच शेवटी महत्त्वाचे ठरते ! आणि इथे येतो प्रश्न की देशात म्हणजे कुठे तयार करायचा आनंद ? अहो, प्रत्येकाच्या जगण्यात – हेच असणार ना त्याचे सोपे आणि खरे उत्तर ! म्हणजे काय, माझ्या मनात आनंद निर्माण व्हायला मी तुमच्यावर अवलंबून राहायचे ? तुम्ही असणार तुमच्या न्यूनगंडात वा अहंगंडात व्यग्र, तुम्ही कसे होणार असे आनंदनिर्माते ?

आपले आपल्यालाच काही सापडते का ते पाहावे लागेल !

ऐ दिल अब कहीं न जा

ना किसी का मैं, ना कोई मेरा

--- हे ठेवायचे लक्षात – आले ना लक्षात ?

--- ००० ---

उडाणटप्पू

उडाणटप्पू हा शब्द एकूणच आजच्या मराठी संस्कृतीला लावला तरी चालेल. पण इथे बोलताना आपण साहित्य या क्षेत्रापुरती मर्यादा आखून घेऊ. आणि तेही इतके कोण घुसळत बसणार ( नुसतीच कचऱ्यावर प्रक्रिया करत बसणे ! ) म्हणून कविता घेऊ. इथले कवी मुळातच कविता लिहितात ते कवी म्हणून ओळखले जाण्यासाठी, तशी मान्यता मिळवण्यासाठी, मोठे कवी म्हणून टिकून राहण्यासाठी आणि जनमानसाचा आदर मिळवून आत्मतुष्ट होण्यासाठी. याचाच अर्थ कविता लिहिण्याचा मूळ हेतूच कविताबाह्य असतो. यामुळे साहजिकच मग रूटीन, सामान्य अनुभव, विचार, नीतीकल्पना, न्याय, समता वगैरे अभिलाषित मूल्ये, भावभावनांचे पुन:प्रत्यय आणि थोडेफार चकित करणारी तंत्रकौशल्ये या मर्यादेत ही कविता खेळत-बागडत राहते. अगदी तथाकथित दु:खाची कविताही. एकदा उद्दिष्ट कविताबाह्य मान्यतेचे असले की पुनरावृत्ती हे एकच कवितेचे कार्यक्षेत्र बनते. मग भाषेवर आणि तंत्रावर हुकमत असलेले काही कवी इथे निव्वळ विविधगुणदर्शन दाखवत अमर होतात. त्यांच्या कवितेत सलग गांभीर्य कसलेच नसते. पार अनिलबिनिलांपासून उदात्त अशा कुसुमाग्रजांपर्यंत. यांना जगण्याबाबत एकही समस्या सखोलपणे दिसत नाही कारण पाहायचीच नसते. कमी कुवतीचे रटाळ, सेफ जगणे हीच एक आस असल्यावर जनमान्य मार्गाने आयुष्य रेखाटत जाणे हे बंधनकारक ठरते. जनमान्य दु:खाचा माफक डोस आणि जनमान्य अस्मितांचे उदात्तीकरण यात हे कवी रमतात. यांना स्वत:ला एखादे दु:ख महत्त्वाचे वाटले, मूळापासून त्याकडे पाहावेसे वाटले, असे घडत नाही. कुसुमाग्रज इथले प्रातिनिधिक भाषा पुढारी होतात – त्यांच्या नावे भाषादिन साजरा होतो, हा याचा पुरावा आहे. हे असले कवी धर्म, भक्ती, प्रेम, आस्तिक, नास्तिक, वारकरी, शूर, देशभक्त, बांधिलकी, युद्धसमर्थक असे सगळे असतात. या प्रत्येक विभागातल्या कविता लिहून ते लोकप्रिय होत राहतात. थोडक्यात म्हणजे यांना कशाचेच फारसे गांभीर्य नसते आणि कोणत्याही समस्येला सामोरे जायची आचही नसते.

दुसरा प्रकार विद्रोहीवाल्यांचा आणि त्यातच घुसलेल्या समतावाद्यांचा. यांना उत्तरे आधीच माहीत असतात, दु:खांना जबाबदार कोण हे यांचे ठरलेले असते, आता फक्त सुधारणा करत गेले की झाले – हा एकूण यांचा ढाचा असतो. यातले जे रुळलेले मार्ग असतात त्या त्या मार्गावरच्या टोळ्या असतात. बाहेर राजकारणात जी वैचारिक ‘ तयारी ‘ लागते तीच इथेही लागते. इथे जरा भाषा थोडीफार यावी लागते, इतकेच. हे नुसतेच एक वैचारिक आक्रमण असल्याने हेही पुनरावृत्तीच्या रोगाने ग्रस्त असते. याचीही उद्दिष्टे कविताबाह्य – व्यवस्था बदलणे आणि कवी म्हणून गाजणे, हीच असल्याने इथेही प्रत्यक्ष जगणे आणि त्यातली गुंतागुंत ‘ पाहणे ‘ हे घडू शकत नाही. या विभागातले लेखक-कवी म्हणतात की आम्हाला कवितेचे महत्त्वच नाहीय -- ती फक्त साधन आहे एक. आम्ही म्हणतोय त्या समस्या सत्वर मिटून आमची कविता कालबाह्य व्हावी हीच आमची इच्छा आहे.

मान्यताप्राप्त प्रतिक्रिया देत आयुष्य कंठणारे लोक सर्जक म्हणजे काय असणार ? यांचे सगळे लेखन हे ‘ माहीत असणे ‘ या क्षेत्रातले असते. आपला स्वभाव, मते, आग्रह यांचा किनारा सोडून ‘ जे आहे ते ‘ पाहण्याची – त्याच्या लौकिक यशापयशाबद्दल बेफिकीर राहण्याची यांची हिंमत नसते. मराठी समाजालाही असले काही नकोच असते. त्यामुळे, उंदराला मांजर साक्षी अशा पद्धतीने दोघेही एकमेकांचा उपयोग करत राहतात. नुसतीच मतमतांतरे सोडून जे तत्त्वज्ञानातले किंवा अध्यात्मातले प्रश्न असतात त्यांना इथे हेटाळले जाते कारण ते प्रश्न असतात किनारा सोडायला लावणारे. इथे तर भित्रट सुरक्षिततेत खेळायचे आहे. आणि मग हेच लोक एकत्र जमून रडत विचारतात की मराठी कविता जागतिक का होत नाही ? !

--- ००० ---

सारांश

सारांश रूपाने आयुष्य पाहायला सुरुवात करायची असे माझे मीच ठरवले आणि त्याची एक माफक सुरुवात म्हणून टोलवाटोलवी सुरू केली. म्हणजे लाईटलीच घ्यायचे सगळे, अशी. त्यातून समोर आला टोलेजंग हा शब्द. याचा अर्थ मोठा असल्याने पंचाईत झाली. मग एक आयडिया करायचे ठरवले. आपल्या मनाचे जसे तुकडे असतात तसे त्या शब्दाचे बरोब्बर दोन तुकडे केले. मनाचे खरे तर असे काहीच मापात नसते. तरीही एक सोय म्हणून आणि विचारात तरी एक तोल साधला जावा म्हणून तसे केले. टोले आणि जंग असे झाले ते. टोले बरोबर खरे तर घड्याळही येऊ शकले असते पण तसे झाले नाही. लगावायचे टोले आले. त्यामुळे मग जंग हा लढाईशी संबंधित शब्द योग्य ठरला.

माणूस म्हणून जगायचे तर तुम्ही युद्धविरोधी असायला हवे, हे सर्वमान्य होते. पण बहुसंख्य लोक शौर्याचा गौरव करणारे होते. मग उरलेले लोक युद्धविरोधी चळवळी करत. त्यांना खूप छान वाटे. आपण काहीतरी पूर्ण मानवजातीच्या हिताचे करतो आहोत हे जाणवून ते एकमेकांना दुधाचे अभिषेक करत. या सगळ्याचा सारांश असा निघे की अनेकांत मतभेद आहेत आणि सहिष्णुतेने कोण बरोबर हे ठरू शकणार नाही.

खूप सविस्तरपणाचा कंटाळा आल्यामुळेच खरे तर ही सारांशाची आयडिया सुचली होती. शंभर वर्षे समजा जगणे झाले तरीही घटनाच असणार ना त्या. म्हणजे सारांश काढता येणारच. आणि शेवटी तरी या त्या तीन लाख घटना असे कोण कुठे पाहणार आहे. ही आयडिया सुचल्यापासून साले परिवर्तनच सुरू झाले होते मनात. अनावश्यक असलेले वगळत जाता आले तर पूर्ण आयुष्यालाच सारांशाचे महत्त्व येऊ शकेल, हे जाणवले. मग काय काय वगळावे ? तर उदाहरणार्थ ग्लॅमर आले. आपले मन दुसऱ्या कुणालाही टाळ्या वाजवायला वापरायची गरजच काय, हा तो प्रश्न होता. त्यात नट, नट्या, होऊन गेलेले मोठे नेते, विचारवंत आणि कवीही आले. त्यांचाही शेवटी सारांश निघणारच ना. त्यांना आवडत होते समजा मोठे होणे, ठीक आहे ना, आम्ही वा-छानही म्हणू पण आमचे मन किती देणार तुम्हाला ? या विचाराने जरा सैलच वाटले – आराम – रि लॅ क्स ! आता आपणही काही फार मोठे डोंगर पार करत बसायची गरज नाही. बरे वाटले.

एकाचे असे तत्त्व होते की जगात फुकट काहीच नाही मिळत. प्रत्येक गोष्टीची किंमत तुम्ही चुकती करत असताच. महिना चार लाख कमावता तर गमावता काय काय तेही बघा ना. सारांश, कुणाच्याही मागे पळण्यात तुम्हाला ग्रेट वा कृतज्ञ वा सेफ वा आदर्श वाटत असेल तर त्याच्या बदल्यात तुम्हाला मनाचे काही तुकडे मोजावे लागतातच.

काहीच खर्च न करता तर जगता नाही येणार. आणि तसे पाहिले तर खर्चायचे असते मनच. आता भांडणावर खर्च होणारे तुकडे वाचवणार कसे ? या प्रश्नावरून गाडी उलटी फिरली. मरू दे, काही नको सारांश-बिरांश. मरू च्यायला सविस्तरच ! यानेही साले जरा रि लॅ क्स वाटले. आणि झोपच आली !

--- ००० ---

मुझे तुमसे कुछ भी न चाहिये

मग प्रश्नच मिटतो ना. ना मतभेद ना सहिष्णुता. पण असे नाही ना चालत. तुझ्यासारख्या मनाचे कुणी ना कुणी असतीलच ना. त्यांचा पाठिंबा घेणार की नाही ? तुम्ही क्रांतिकारी म्हणजे सत्तेच्या विरोधात वा बऱ्याच लोकांच्या विरोधात असू शकता. पण सगळयांच्या विरोधात कसे असू शकाल ? तुम्ही खोटे बोलत आहात. मुकेश म्हणजे अनुनासिक. त्यामुळेच किंवा ते असूनही काहींना तो आवडला तर काहींना त्याचे ते अनुनासिकच खटकत राहिले आणि ते त्याच्या शत्रुपक्षात गेले. राज्यकपूरने सतत त्यालाच वापरल्याने या मतभेदाची झळ त्यालाही बसली. तो काहींना आवडेनासा झाला. मोठा शोमन असूनही. मुकेश चांगला की वाईट यावरून काही ठिकाणी मारामाऱ्या झालेल्या आहेत. पण मग काय, मतभेद अटळच समजावेत का ? इथे समजा तुकारामाचे, ' मानियले नाही बहुमत ' हे घेतले आणि सार्त्रचे, ' इतर माणसे म्हणजे नरक ' हे घेतले तर सगळा मिळून काय होईल बोध ? आणि मग आद्यता म्हणजे ओरिजिनॅलिटी म्हणजे काय ? आणि समजा अगदी नवीनच एखादे मत आले म्हणून त्याला ओरिजिनल म्हटले, पण पुढे त्या मताला काहींचा पाठिंबा मिळाला तर त्याची ओरिजिनॅलिटी संपणार का ?

मते आणि सहिष्णुता या रचनेचा कंटाळा यायला जर बंदी असेल तर हुकूमशाहीच झाली ही आणि मानवी हक्कांचा भंगच. पण लोक निवांत असतात कारण त्यांना माहीत असते की मतच नाही असे असूच नाही शकत. मन आहे म्हणजे मनस्थिती आहे म्हणजेच एक दृष्टिकोण आहे म्हणजेच मत आहे. त्यामुळे मतच नाही ही नुसतीच एक हास्यास्पद कल्पना ठरते.

मतच नाही असे काही असण्याचा कुणालाच धोका नाही वाटत. निवांत राहू शकतात सगळे. मतांचे अस्तित्व, गोंधळ, मारामाऱ्या, संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारी सर्व घाण अबाधित राहणारच या श्रद्धेने, निष्ठेने आणि खात्रीने सगळे निर्भय राहतात. एकमेकांचे भय आणि त्यामुळे होणारी हिंसा ठीक आहे पण मतवाले असणेच धोक्यात येणे हे किती भयावह होईल !

साधे अनुनासिक असो की पक्षोपपक्ष असोत सगळे एकच ते !

--- ००० ---

26-05-22

पूर्व दिव्य ज्यांचे

तिकडे जाती असल्या तर कशा असतील कोण जाणे पण भेदभावाशिवाय मानवी मन कुठे असू शकेल का याबाबत मला शंका आहे. तरीही, इकडचा ब्राह्मण तिकडच्या जातींतही श्रेष्ठ, असे तर होऊ नाही शकणार. किंवा तिकडची जात बघून इथे त्याला श्रेष्ठ ठरवणे जमेलसे मला वाटत नाही. तर जात माहीतच नसतानाही मला पिरांदेल्लो, आयनेस्को, बेकेट हे आवडतात. विचारसरणीवाल्यांचेही असतातच की वेगळे भेदभाव. तेही काहींना हीन लेखणे, काहींची कुचेष्टा करणे हे करतच असतात ना. म्हणजेच या ना त्या प्रकारचा भेदभाव असलेली अशीच सगळी मने असणारच आणि तरीही त्याकडे दुर्लक्ष करून कविता वाचता यायला हवी. ज्ञानदेव-तुकाराम-रामदास का नाही म्हणायचे ? तर रामदास ब्राह्मण होते हे एक आणि त्यांचा ब्राम्हणांनी छळ केला किंवा निदान त्यांना त्रास दिला असेही काही फारसे वजनदार त्यांच्या खाती जमा नाही. अन्यथा, एक आठवण सांगायची झाली तर एक बंगाली माणूस एकदा म्हणाल्याचे मी स्वत: ऐकले होते की मानवी शहाणपणाचा साठा सगळा एका ठिकाणी एकवटलेला ग्रंथ हवा असेल तर तो म्हणजे ‘ दासबोध ‘. हे सर्वांनी मान्य करायची गरज नाही पण ते चातुर्वर्ण्यवादी होते हा भेदभावाचा मुद्दा दुर्लक्षून ते वाचता येतात का, हे पाहायला हवे.

हे निर्बुद्ध विचार डोक्यात यायचे कारण म्हणजे ही दोन सुभाषिते –

पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ

आणि

सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख.

पहिले कवी विनायकांचे आहे आणि दुसरे रामदासांचे. दोघेही ब्राह्मणच ! मग बरोबर कुणाचे असेल ? आता ‘ पूर्व दिव्य ‘ म्हणजे काय ? समजा, शाहू-फुले-आंबेडकर आणि छ. शिवाजी महाराज. आणखी कुणाला टिळक, सावरकर हे आवडत असू शकतील. किंवा गांधी-नेहरू-गोळवळकर-डांगे-चारू मुजुमदार. तर हे असे पूर्वदिव्यही भेदभावयुक्तच असणार – म्हणजे वेगवेगळेच ना ! मग प्रश्न असा येतो की नाही तरी भूतकाळ हा कुणीतरी सांगितलेलाच मिळत असतो, हे पाहता सर्वांना सामावून घेईल असा एक भूतकाळ तयारच करायला काय हरकत आहे ? पुरावेही करायचे तयार. कोर्टात कसे आपली बाजू जिंकावी म्हणजेच आपल्याला न्याय मिळावा यासाठी आपण साक्षीदार ‘ उभे ‘ नाही का करत ? तसेच ! पण इथेही येणारच एक अडचण ! करणार कोण हे तयार, तर मानवी मनच ! म्हणजेच सर्वमान्य असे काही असूच नाही शकणार ! मन म्हटले की भेदभाव आणि फूट असायलाच हवी !

नुसता इतिहास तरी कसा म्हणावा ? जनुकीय उत्क्रांतीचाही असणारच ना मोठा वाटा ! पण त्यात आपले दिव्य काय होते हे सांगणे जवळ जवळ अशक्यच आहे. माणसाचे जगणे जर असे भूतकाळ आणि जनुकीय पूर्वपुण्य यांवर आधारित असेल तर एक प्रकारचा नियतिवादच झाला हा ! आणि कितीही बडबड करा, माणसाच्या मनाला हा आवडतो. कारण माणसाचे मन हेच अपरिहार्यपणे सातत्याचे भोक्ते असते. एखादा आनंदाचा क्षण सोडला तर ते सतत चालू असते – सतत कार्यरत – बिझी असते – थकून मरायची वेळ आली तरी ते थांबत नाही ! या सातत्याच्या तत्त्वावरच जर जग चालणार असेल तर मग रम्य भावी काळाची काही आशाच नाही दिसत. कारण एक व्यक्ती असो की समाज की पूर्ण मानवजात – हे सातत्य तर दु:ख, संघर्ष आणि हिंसा यांचीच निर्मिती करताना दिसत आहे. म्हणजे भूतकाळाची सांगावी अशी कीर्ती उपलबद्धच नाही आहे तर रम्य भावी काळ कुठला असणार ?

--- ००० ---

मी सकाळी ---

मी सकाळी फिरायला  जातो तेव्हा एक वयस्कर पतिपत्नी मला हमखास क्रॉस होतात. ते बरेच माझ्या आधी फिरून येत असतात. पती सुमारे ६५-६७ असावा. पत्नी सुमारे ६२-६३. पती जरा बुटकाच म्हणावा असा आहे. पण मजबूत आहे. त्याचे तळहात लाल आहेत. चालण्यात असा रुबाब आणि जरब आहे की हा एखाद्या फार मोठ्या पदावर होता हे सांगायची गरजच नाही. त्याची पत्नी ज्या आदराने आणि प्रेमाने त्याच्याबरोबर चालते त्यावरूनही ते दिसून येतेच. तो जेव्हा आजूबाजूला वा पुढे लांब पाहतो तेव्हा त्याचे कपाळ आणि डोळे अत्यंत विचारमग्न दिसतात. खूप गहन विचार करणे ही त्याच्या लेखी काही विशेष बाब नसावी. घरात स्वयंपाक आणि इतर कामांना नोकरचाकर असणार. त्यांच्या अडीअडचणींना हा उपयोगी पडत असणार. मोठमोठी पदे संभाळत हा अनेक शहरे फिरलेला असावा त्यामुळे त्याला मानवी संबंधांचे महत्त्व कळत असणार. कधी स्नेह, कधी धाक, कधी डावपेच, कधी एखाद्याचे नुकसानही करावे लागणे, हे असे सगळे हँडल करत हा शेवटी निवृत्त झाला असणार. अनेक आव्हाने, संकटे यांना पार करत आता तो या निवांत स्थितीला पोचला असणार. याची पूर्ण कल्पना आणि ते सर्व पाहून आलेला समंजसपणा त्याच्या पत्नीत दिसतो. त्याला दोन मुलगे असावेत. दोघेही परदेशात. थोरल्याला एक मुलगा, एक मुलगी पण धाकट्याचा बिचाऱ्याचा घटस्फोट झालेला असावा. तेही त्याने निस्तरले असणार, त्याला धीर दिला असणार, आता दुसरे कर, असा शहाणा सल्लाही दिला असणार.

रशियाचा पुतिन हा एक डुप्लिकेट म्हणजे प्रतिकृती आहे, ही बातमी त्याला चकित करून गेलेली असणार. उत्तर कोरियाच्या किम जोंगच्या तर सेम टु सेम चार आहेत म्हणे प्रतिकृती. ते असे तयारच ठेवत असणार. तसेच चंगीभंगी जीवन, तशीच कामे, तसेच घाबरणारे लोक भोवती, यांचा त्यांना सराव दिला जात असणार. म्हणजे हे कुणी सेम कुणासारखे तरी दिसत असल्याने आता देशासाठी हे असे प्रतिबिंब जिणे त्यांच्या वाट्याला आले असणार. या विचाराने हा आपला बुटका आतून जरा हलला असणार. आपणही एक प्रकारे या कामांसाठी ट्रेनच तर केले गेलो की ! तेच आपण करत आलो. ते कुणाऐवजी नव्हते इतकेच, पण असूही शकले असते ! आणि तसे तर या या जागेवर असा असा माणूस हवाच होता की ! इथे त्याचा कॉलेजमित्र प्रकाश बुद्धिसागर हा त्याला आठवला असणार. हा बुटका आधीपासून महाहुशार असणार आणि शिवाय त्याला नाटकाची आवड असणार. कॉलेजात प्रकाश नाट्य या प्रकारात फार आघाडीवर असायचा, म्हणूनच त्यांची ओळख आणि पुढे मैत्री झाली असणार. हा मोठा अधिकारी झाला आणि प्रकाश झाला एक मोठा दिग्दर्शक. प्रकाशने बसवलेले, ‘ मीच एक शहाणा ‘ हे नाटक त्याने पाहिले असणार. त्यात एक नट घोड्यावरून पडतो आणि त्या धक्क्याने तो करत असलेल्या भूमिकेतच फिक्स होतो. मराठीतले बरेच लेखक, कवी होतात तसे. मग त्याला मानसोपचार देण्यासाठी तोच दरबारी माहोल त्याच्या भोवती ठेवला जातो. त्या कामासाठी त्या तेव्हाच्या पोषाखांत वावरणारे स्त्री-पुरुष कामावर ठेवले जातात. म्हणजे हा मनोरुग्ण म्हणून प्रतिकृती आणि ते एक नोकरी म्हणून ! मुळातले हे पिरांदेल्लोचे ‘ किंग हेन्री द फोर्थ ‘ हे नाटक. तेच पुढे ‘ जहांगीर जहांगीर ‘ म्हणून हिंदीत आलेलेही याने प्रकाशमुळे पाहिले असणार. मध्येच ते नट इसम बरे होते आणि एका नोकराला म्हणते की हे असे वेड्या माणसाचे अॅक्टिंग करायचा मला आता कंटाळा आला आहे !

परिणाम काय होईल – एक दिवशी हा बुटका त्याच्या पत्नीला म्हणेल की तू खरी नाहीस, सगळे मुखवटे आहेत. मग त्याची पत्नी परदेशातल्या त्यांच्या मुलांना कळवेल की बाबांनो, तुमचे बाबा भ्रमात जाऊन त्यांची स्मृती जाण्याचा धोका दिसतो आहे, तसे होण्यापूर्वी त्यांना भेटून जा. म्हणजे मृत्यूपूर्वी भेटून जा, असाच ना त्याचा अर्थ ! तेवढ्यात तिला आठवेल की प्रकाशला बोलवावे. ती त्याला फोन करेल. प्रकाश फोनवर म्हणेल, “ कोण प्रकाश ? मी त्याचा डुप्लिकेट बोलतोय ! “

--- ००० ---

खानदान

१९६५ साली सुनील दत्त आणि नूतन यांचा एक सिनेमा आला होता ‘ खानदान ‘ नावाचा. त्यात सुरुवातीला सुनील दत्तला एक विजेचा शॉक बसतो आणि परिणामत: त्याचा उजवा हात निकामी होतो – निर्जीव होतो. आणि सिनेमाच्या शेवटच्या भागात जेव्हा अटीतटीचा, जीवनमरणाचा वा सत्याच्या विजयाचा प्रसंग येतो तेव्हा सुनीलला आणखी एक तसाच विजेचा शॉक बसतो आणि परिणामत: त्याचा तो हात नीट होतो ! इतका नीट होतो की तो दोन्ही हातांनी धुवांधार मारामारीही करू शकतो. आता हे पाहून फार तर कुणी न्यूरॉलॉजिस्ट कपाळावर हात मारून घेतील पण भारतीय प्रेक्षकांना त्या वेळी तरी काहीही प्रॉब्लेम आला नाही. नंतर पुढे काळानुरूप सुधारणा एकच झाली की हात नसला तरी ‘ शोले ‘ मधल्या ठाकूरने पायांनी गब्बरशी मारामारी केली ! चलता है ! ‘ संशयाला ऐच्छिक स्थगिती ‘ असा एक प्रकार असतो कलेत – त्या बाबतीत इथला प्रेक्षक खूपच उदार असतो. याचे कारण इथल्या तत्त्वज्ञानात असते. जगण्यातली अनिश्चितता आणि ‘ कुछ भी हो सकता है ‘ ही अलिप्त, निर्भय वृत्ती यांत त्याची मुळे असतात. रामाने रावणाला हरवले पाहिजे, कृष्णाने कंसाला संपवले पाहिजे, हे ठरलेले असते, मग त्यासाठी मध्ये काहीही चालेल ! मग देवांनी काही जादू केली तरी चालेल.

याच्या मुळाशी असते अद्वैत तत्त्वज्ञान. सगळे एकच आहे, याचा अर्थ बघा ना काय होतो – काहीच नसणे हा आहे त्याचा अर्थ. सगळे एकच असल्यावर ते एकच आहे हे सांगणार तरी कोण ? आत्मसंवेद्यच ना सगळे ! अनादी-अनंत म्हणजे तरी काय – काहीच नसणेच ! काही असणे म्हटले की मर्यादा आली ! त्यामुळे घटना हा प्रकार इथे फार महत्त्वाचा ठरूच नाही शकत. ‘ दिल एक मंदिर ‘ आठवतोय का ? राजकुमार हा मीनाकुमारीचा पती आहे आणि त्याला अडमिट केलेय ते तिच्या पूर्वाश्रमीच्या प्रियकराच्या म्हणजे राजेंद्रकुमारच्या इस्पितळात ! आणि कहर म्हणजे आता त्याचे प्राणावर बेतू शकेल असे ऑपरेशन करायचे असून ते सर्जन असलेल्या राजेंद्रकुमारलाच करायचे आहे ! म्हणजे समजा ते ऑपरेशन फेल झाले तर मीनाकुमारी मिळावी म्हणून त्याने मुद्दामच तसे केले असे होणार ! हा नैतिक प्रश्न ओळखून तो तहानभूक विसरून रात्रंदिवस त्या ओपरेशनचा अभ्यास करतो आणि त्या कामात यशस्वी होतो ! उद्या ऑपरेशन आणि आज रात्री अभ्यास कसला करतोस च्युत्तड, असे कुणी म्हणत नाही.  पण तरी, पुढे काय करायचे हा प्रश्न राहिलाच असता ना – तर त्या अभ्यासाच्या अपार कष्टांमुळे तो कोसळतो आणि मरतो ! मग हे दोघे पती-पत्नी त्याचा पुतळा उभारतात ! सुटले ना प्रश्न ! कुछ भी हो सकता है !

असंख्य हिंदी सिनेमे हे मूर्षा नाट्याचे बाप होते – इथे वेगळे काही करायची गरजच नाही. आता बघा –
हॅरॉल्ड पिंटरने ‘ द लव्हर ‘ हे नाटक आत्ता, अलीकडे लिहिले – तो प्रकार इथे हजारो वर्षांपूर्वी होऊन गेलेला आहे ! नवराच नवऱ्याच्याच रूपात प्रियकर म्हणून येणे ! इथे इंद्रदेवांनी तेच केले होते. गौतम ऋषींची पत्नी त्यांना आवडली तर ते गौतम ऋषींचेच रूप घेऊन तिच्याकडे गेले आणि कार्यभाग साधून घेतला ! पण हे वाईटच ना ! मग तिला शिळा होऊन पडायचा शाप मिळतो आणि रामाच्या पदस्पर्शाने तिला पुन्हा मूळ जीवन प्राप्त होते ! शिळा होणे म्हणजे पापाच्या, पश्चात्तापाच्या मनस्थितीत गोठून जाणे. आणि रामाचा पदस्पर्श म्हणजे ‘ काहीच नसण्याचा ‘ स्पर्श ! काही नाहीच आहे तर पाप कसले आणि पश्चात्ताप तरी कसला ?

तर हमे मत सिखाओ अब्सर्डिटी – हम सब जानते हैं ! अब्सर्डिटीचा उगम अस्तित्ववादातून म्हणजेच नार्थिंगनेसमधून म्हणजेच काहीच नसण्यातूनच तर होतो ! सारांश, हमें येडे मत समझो – शाने समझो ! अब्सर्डिटीका पूरा ज्ञानसागर हमारे पास है – याने कुछ भी नही ! समझे ?

--- ००० ---

ग्रेट

मला नुसते माहीतच आहे असे नव्हे, मी कबूलही करतो की मला अनेकदा चुकीचे प्रश्न पडतात. चुकीचे की बरोबर हे नक्की कळतच नसल्याने त्यांच्यावर वा त्यांचा विचार करण्यात बराच वेळही जातो माझा. आता ‘ अश्रूंची झाली फुले ‘ हे नाटकच घ्या ना. जेव्हा भ्रष्टाचार सध्यापेक्षा खूपच कमी होता तेव्हा ते ठीक होते. की बाबा वैतागून प्राचार्यच शिरतो गुन्हेगारीत आणि तिथे बॉस होतो. आणि मग ‘ खरे काय आणि खोटे काय ‘ असा एक मोठा संवाद त्यात येतो. आता कुणीही भ्रष्टाचारी असणे वा गुन्हेगार असणे हे इतके आश्चर्य वाटावे असे राहिलेलेच नाही. मग आता कोण बघत बसणार ते इतका वेळ ? बरे लाल्याचे ‘ कडक ‘ का ‘ करेक्ट ‘ काय असेल ते, किती वेळा बघणार कौतुकाने ? पण बघा ना, अमेरिकेतल्या मराठी लोकांनी तुडुंब उचलून धरले ते नाटक ! म्हणजे त्यांना इथल्या भ्रष्टाचाराची नीट माहितीच नसेल की ते अजूनही त्या जुन्या काळाशी समरस होऊ शकत असतील ? तोच प्रश्न आता बेणारे बाईंबद्दलही येऊ शकतो. आता कुठली बेणारे हे असले गॉसिपी लोक सहन करत बसेल ? भल्या भल्या ट्रोलर्सना घाबरत नाहीत आता बायका ! एकदा चढणे, झवणे या शब्दांतली धक्के देण्याची शक्तीच संपल्यावर राहील काय ? म्हणजे परिस्थिती बदलल्यावर ज्या प्रश्नांची धारच जाते ती नाटके मुळातच जरा कमी उंचीची आणि जगण्याला उथळपणेच सामोरी जाणारी होती की काय ?
शेक्सपियर म्हणा की पिरांदेल्लो की सार्त्र यांच्या नाटकांतली परिस्थिती आता कुठे आहे ? म्हणजे ते साले मुळातच प्रश्नच असे घेत होते की कोणत्याही परिस्थितीत ते माणसाचा गळा पकडणारच ! आता एक गंमत बघा. ‘ हॅम्लेट ‘ ची जी गोष्ट आहे तीच सार्त्रच्या ‘ फ्लाईज ‘ या नाटकाचीही आहे. आईने बापाचा खून करून काकाबरोबर लग्न करणे. तिथे हॅम्लेट एकटाच लढत राहतो या प्रश्नाशी आणि फ्लाईजमध्ये ओरिस्टिस आणि इलेक्ट्रा हे बहीणभाऊ. मला सांगायचे आहे ते बघा कसे वाटते ते. हॅम्लेट हा विचार विचार विचार यांत अडकून एकूणात नाश करून घेतो. आणि तिकडे, इलेक्ट्राही विचारांत, पश्चात्तापात घेरली जाते पण ओरिस्टिस मात्र मोकळा राहतो. तो सूड, आनंद, पश्चात्ताप वगैरे विचारांना थाराच नाही देत ! म्हणजे हे दोन मास्टर लेखक काय सांगताहेत तर विचार करतो नाश, विचार घेरून वेडे करतो, दु:खी करतो ! वेगवेगळ्या काळातले हे दोन महान लेखक किती वेगवेगळ्या प्रकारे एका मूलभूत प्रश्नावरचे त्यांचे चिंतन मांडत आहेत आणि तेही एकच सत्य सुचवणारे !
आपल्याच आईला आपणच मारायचे, हा जसा एक गहन प्रश्न होता तसाच प्रश्न अर्जुनालाही पडला होता. आपलेच आप्तस्वकीय आपणच मारायचे ? कृष्णाने त्याला जे सांगितले ते ओरिस्टिस सारखे असल्या विचारांतून बाहेर राहणेच तर होते ! हे पाहता, काही लोक कृष्णाला जगातला पहिला कम्युनिस्ट म्हणतात त्याचप्रमाणे त्याला जगातला पहिला अस्तित्ववादी म्हणायला काय हरकत आहे ?
इथे मराठीत नायक हा नुसता त्याच्या वडिलांशी भांडला तरी अस्तित्ववादी ठरतो – आपण तसे तर काही म्हणत नाही आहोत. मुळापासून उपटले जाणे घडल्याशिवाय कसला अस्तित्ववाद ? नाही तर नुसता एक उपरोधी सूर लावून ठेवला की इथे अब्सर्ड होता येते ! कळत काहीच नसते पण अस्तित्ववादी किंवा अब्सर्ड म्हणजे काहीतरी ग्रेट एवढेच असते मनात ! मग इथे मराठीतही ढिगाने सापडतात अस्तित्ववादी आणि अब्सर्ड लेखक !
ग्रेट होण्याचे विचारच अस्तित्ववादाच्या आड येत असावेत !
कशाला व्हायचेय ग्रेट ?
--- ००० ---

याच्यामुळे हे त्याच्यामुळे ते

एकदा एक विद्वान म्हणाले की सत्ता गेल्याने ब्राह्मण सैरभैर झाले होते, कुठेतरी त्यांना स्वत:ची जागा निर्माण करायची होती म्हणून १८४३ साली विष्णुदास भाव्यांनी ‘ सीतास्वयंवर ‘ हे नाटक लिहिले. आता कारण-परिणामांची साखळी मांडून दाखवणे हे तर विद्वानांचे एक प्रमुख कामच असते. तर त्यावर माझ्यासारखा एक किरकोळ विद्वान म्हणाला की मग आता हेही घ्या विचारात – गेल्या काही वर्षांत, ब्राम्हणांसारख्याच हुशार असलेल्या काही लोकांना इथल्या जनतेने लाथ घालून राजकारणातून हाकलून दिले, त्यामुळे ते सैरभैर झाले आणि त्यांनी इथल्या सांस्कृतिक क्षेत्रावर कब्जा घेतला. पुरावा म्हणजे दर साहित्य संमेलनात राजकीय भाषणे करून ते आपली कंड शमवून घेत असतात. कुणी कुणावर चिडायचे कारण नाही. आपले दादा रोज एकदा तरी टीव्हीवर हे वाक्य म्हणतातच की तो त्यांचा अधिकार आहे. म्हणजे एक प्रकारे पहाटे उठून शपथविधी उरकणे हा आमचा अधिकार होता, त्याचप्रमाणे नंतर परिस्थिती पाहून माघार घेणे हाही आमचा अधिकार होता. सारांश, हे असले, डोक्यात येईल तसे लेख लिहिण्याचा माझाही अधिकार मान्य असावा.

एकजण म्हणाले की महायुद्धानंतर सगळे जग, आख्खी मानवजात हादरली होती. त्यामुळे, मर्ढेकरांनी मराठी कवितेला स्वप्नरंजनातून वास्तवात आणले. दुसरे म्हणजे स्वातंत्र्यानंतर स्वप्नभंग झाल्यामुळे मराठी कविता वैफल्यग्रस्त झाली. अरे नुसते प्रतिक्रिया देत बसणे हेच आणि एवढेच असते का कलावंताचे काम ? पण विद्वानांना त्यांची हुशारी दाखवण्याचा हाच एक राजमार्ग असतो – कारण-परिणामांची साखळी दाखवणे. म्हणजे बुद्धाने आजारी माणूस, वृद्ध आणि प्रेत पाहिल्यामुळे त्याने बुद्ध धर्म निर्माण केला, असे म्हणणार का ? या प्रश्नाला होकार-नकार कसा द्यावा आणि त्याचे आपल्या विद्वत्तेच्या कारकीर्दीवर काय परिणाम होतील हे नीट न समजल्याने सगळे विद्वान पळून गेले !

हल्ली घटस्फोटांचे प्रमाण जरा वाढतच चालले आहे. मुली म्हणतात, तुझी पोटगीही नको मला, तू फुट आधी माझ्या आयुष्यातून. आर्थिक स्वावलंबन आल्याचे परिणाम आहेत हे ! एकदा तर घटस्फोटाचा एक खटला असा आला समोर की तो पाहून स्वत: न्यायाधीशच हादरले ! नवरा रात्री झोपेत घोरतो त्यामुळे माझी झोपमोड होते – हे होते कारण ! न्यायाधीश दिङ्मूढ झाले कारण त्यांना स्वत:लाही तशीच घोरायची सवय होती !

अहो, त्याचा स्वभावच तसा आहे – ते ठीक पण तो तसा का झाला बाबा, हे नाही पाहणार ? अमिताभ गुंड झाला कारण लहानपणी गरिबीमुळे त्याचे अपमान झाले होते ! अरे वा ! मग तसेच अमजदचेही झाले असतील ना, ते का नाही बघत ?असे करता करता एक लक्षात यायला लागते की पत्ताच नाही लागणार ! यातून हे त्यातून ते असे करत करत कारण-परिणामांचे एक अतिभव्य जंजाळ तयार होईल नुसते आणि निष्कर्ष काहीच नाही काढता येणार ! एखाद्याला गुन्हेगार ठरवणे हाच गुन्हा ठरेल, हे होईल विश्वदर्शन ! परंपरा, जनुकांची उत्क्रांती, परिस्थिती, महत्त्वाकांक्षा हे सगळे असे पाहात गेले तर आपण सगळेच आपल्या सगळ्यांच्या असे असे असायला कारणीभूत आहोत असे लक्षात येईल ! आणि एकदा आपण आणि निसर्ग हे सगळे एकत्रच जगते आहे असे दिसले तर कसले कारण-परिणाम ?

कलानिर्मिती म्हणजे फक्त प्रीतिक्रिया निर्मिती हे भंगार तत्त्व सोडून कलेबद्दल बोलून दाखवा असे आव्हान प्रत्येक विद्वान समीक्षकापुढे असायला हवे. मला समीक्षक व्हायचे नसले तरी असे म्हणायचा मला अधिकार आहे !

--- ००० ---

नजर

१.

आमचे मुलगी-जावई-नातवंडे लंडनमध्ये होते तेव्हा त्यांच्याकडे जाण्याच्या निमित्ताने परदेश प्रवास घडला. माझी आई, पत्नी आणि मी. तर निघण्यापूर्वी दोनच दिवस आधी आईचा चष्मा फुटला. आता लगेच कुठला चष्मा करून मिळणार, असा प्रश्न आला. आईला तर रोज काही पोथीवाचन करायचेच असे. आणि अर्थात ते आमच्याच सगळ्यांच्या भल्यासाठीच असे. म्हणजेच तिच्याही भल्यासाठीच ना ! तर महिनाभर चष्मा नाही या शक्यतेने ती खूपच नाराज झाली. मग एक करून तर बघू म्हणून तिला एका चष्म्याच्या दुकानात घेऊन गेलो. तिथे काही तयार चष्मे असतात उभ्या डबीतले, त्यांतला बघू कुठला जमातोय का, हा विचार होता. तर एक चष्मा खरेच ओके झाला ! आई आनंदली ! यात माझा चांगुलपणा म्हणजे " जाऊ दे, काही बिघडत नाही महिनाभर नाही वाचली पोथी तर – " असला बेफिकीरपणा मी केला नाही. ( हे माझे तर फारच किरकोळ. माझ्या आईच्या चांगुलपणावर बोलायचे म्हटले तर एक मोठा निबंधच होईल. उदाहरणार्थ, आम्ही एकदा हिशोब केला होता तर नात्यातल्या आणि ओळखीतल्या लोकांसाठी इस्पितळात थांबण्याचे काम तिने २७ वेळा केले होते ! )

२.

कॉलेजात असताना आमच्या वर्गात एक अंध विद्यार्थी होता. आमचा मित्रच. तो पूर्ण अंधळा नव्हता, त्याला पुसट-फिकट दिसत असे. ती लाल-पांढरी काठी घेऊन तो मुंबईत लोकलने वा बसने कुठेही फिरत असे. आम्ही त्याला म्हणायचो, " साल्या, तू अंधळाबिंधळा काही नाहीस – सगळे दिसते तुला – त्याशिवाय का तू नेमका मुलींवर धडकतोस ! " यावर तो हसत असे. त्याचा अभ्यास आम्हा काही मित्रांच्या मदतीने चाले. म्हणजे, समजा दुपारी २ ते ४ मी वर्ल्ड हिस्टरी वाचणार आहे तर त्या वेळी तो माझ्या घरी मालाडला येई. मग कुणी ५ ते ७ इकॉनॉमिक्स वाचणार असेल तर त्यासाठी तो माझ्याकडून सांताक्रुझला जाई ! आता आम्हाला असे चांगले वागायला मिळावे म्हणून त्याच्या बालपणी त्याला एक अपघात झाला होता आणि त्यात त्याची नजर गेली होती.

३.

माझ्या आईच्या मृत्यूनंतर एखाद्या वर्षातच मला स्वत:ला खूप अस्पष्ट दिसू लागले. लिहिता-वाचता येईनासे झाले. म्हटले नंबर बदलला असेल. म्हणून तपासायला गेलो. खास प्रसिद्ध डॉक्टरीणबाई. आधी त्यांच्या मदतनिसेने तपासले आणि मग त्यांनी तपासले. निष्कर्ष असा निघाला की आता काही नाही करता येणार. नंबर बदलणे आणि चांगले दिसू लागणे आता शक्य नाही ! अरे बाप रे ! म्हणजे नजरसुधार प्रकल्प रद्दच ? माझे लेखन-वाचन थांबायचीच वेळ आली. आणि मला हवे तेव्हा हवे ते वाचून दाखवणे वा लिहावेसे वाटेल तेव्हा लिहून घेणे हे कोण करणार ? जणू माझ्या लेखनाअभावी मराठी सारस्वताचे काही नुकसानच होणार होते !

४.

एकदा बसल्या बसल्या आठवले – तो आईसाठी घेतलेला कामचलावू चष्मा असेल घरात, तो पाहू लावून. म्हणून तसे केले तर आश्चर्यच ! त्यातून व्यवस्थित दिसत होते ! विना रुकावट माझे काम सुरू झाले. मग मी तो चष्मा एका चष्म्याच्या दुकानात घेऊन गेलो. त्याला घडलेली हकीगत सांगितली. तो म्हणाला, आता माझ्यावर सोडा. मी नेलेला चष्मा आणि माझी डोळेतपासणी करून त्याने चष्मा दिला करून ! तेव्हापासून काही वर्षे झाली – उत्तम चालू आहे माझे काम ! म्हणजे बघा, तो स्वस्तातला चष्मा नसताच घरात आणि तो बघावा वापरून असा विचार आलाच नसता माझ्या डोक्यात तर काय झाले असते ?

५.

म्हणजे माझ्या आईचे पोथीवाचन चालू राहावे म्हणून ऐन वेळी मी केलेली खटपट आणि माझ्या त्या अंध मित्राला दिलेले छोटेसे सहकार्य – या दोन सद्वर्तनांमुळेच तर माझी समस्या हल झाली नसेल ? पण मग प्रश्न असा येतो की मला चांगले वागता यावे म्हणून माझ्या आईचा चष्मा फुटला होता ? आणि माझ्या त्या मित्राला बालपणी अपघातही

माझ्यासाठीच झाला होता ? हे असे एकास एक या पद्धतीने अशी नसतीलच कारणे. काहीही घडण्याची रचना वेगळीच काही असू शकेल. आणि तो माझा मित्र अपघातात जखमी होऊन अंधळा कशामुळे झाला ? आणि माझ्या आईचा चष्मा फुटायची काय होती कारणसाखळी ? आणि ही सगळी साखळी निर्माण व्हावी म्हणून आम्ही लंडन प्रवास करावा असे घडत होते ? विज्ञानवादी दृष्टिकोण झक मारेल असे हे प्रकार आहेत. बरे, या विश्वात बेशिस्त काहीही घडत असते असेही म्हणायची सोय नाही. सगळे शिस्तबद्ध तर दिसते. नाही तर कॅलेंडर आणि घड्याळ हे अस्तित्वातच नसते आले !

६.

तर याला नियती म्हणावे की नुसतेच अज्ञात म्हणावे ? की आपण घटना बघून विचार करतो ते चुकीचेच आहे ? अशा काही घटना एखाद्या, असंख्य कारणांच्या का असे ना, शिस्तीतून घडत असतील ?

७.

विशेष म्हणजे काहीही समजत नसूनही आपण, भक्तिमार्गी, बुद्धिप्रामाण्यवादी, वगैरे काय काय काय काय असतो !

--- ००० ---

आडवा डोंगर

आडवा डोंगर तयाला माझा नमस्कार
हे खूप आवडते मला म्हणजे काय
मी गुणगुणतोही ते अनेकदा
तरीही तुम्ही कसे काय म्हणता
मी परंपरेशी जोडलेला नाही

तसे तर मला कामूच्या आऊटसायडर मधला
मेरसाल्ट म्हणा आपल्या परंपरेने
तोही मला खूप आवडतो
तुटूनच राहणारा घटनांपासून
खोटेपणाला थाराच न देता

तुमचे खिसे तपासा
सगळा संग्रह काढा बाहेर
अगदी सरडेही काढा
तुमच्या भावना जर असल्या
तुमच्या बालपणातले पतंग
तर तुम्ही शाबूत तर आहात
पण तुम्हाला मृत्यूची भीती असेल

मी ते गाणे म्हणतो तर खरे
पण त्याच वेळी
मी बाहेरही पडत असतो
आलीशान थिएटरमधून

तुम्ही तरी आहात का जोडलेले
घसरत वेगात
पुढे जाणाऱ्या प्रणाल्यांशी
तुमचे उत्तर

तुम्ही म्हणणार खरे आहे
मेरसाल्ट म्हणणार खोटे आहे
आणि मी म्हणणार संशयास्पद आहे

यावर करेल जनता मतदान
जो येईल तो येईल निवडून
--- ००० ---

क्रेझ म्हणजे उन्मादी आकर्षण हो

मुलींना क्रेझ आहे म्हणे गुन्हेगारी विश्वातल्या मुलांची.
चोऱ्या, मारामाऱ्या, सुपाऱ्या, खून, गँगवॉर, वगैरे.
त्यांच्या फॉलोवर्समध्ये मुलींचा भरणा वाढतोय.
हा संशोधन रिपोर्ट थेट साम टीव्हीवर.

यात चकित होण्यासारखे काहीच नाहीय.
जमाना आहे यशाचा, महत्त्वाकांक्षेचा, वर्चस्वाचा,
तुलनेचा, दबदब्याचा, दराऱ्याचा, श्रीमंतीचा,
दहशतीचा, आदराने घाबरण्याचा वा घाबरण्याने आदराचा.
सगळ्याच मुलींना कुठले मिळणार उद्योजक, कलेक्टर,
अभिनेते, पुढारी, दादा, साहेब, अण्णा, भाई ?
मग सहजसाध्य काय राहते ? जिवावर उदार होऊन
आजचा दिवस शेवटचा समजून
निर्भय जगणेच ना ?

सुबत्ता असावी, घरदार, गाड्या, नोकर असावेत.
मुले असावीत आक्रमक कोणत्या ना कोणत्या
परिसरात पराक्रमी.
मालक मारला गेला तरी
मागे टोळी असावी काळजी घेणारी
सिनेमात असते तश्शीच !

नाही तरी काय आहे कोणतेही क्षेत्र
अत्युच्च स्थान हवे असेल तर पूर्ण आयुष्य मागतेच.
तिथे मरून जिवंत राहता येते
आणि इकडे कदाचित पूर्ण मरावेच लागते !

डावपेच, द्वेष, सूड, हे लागतच नाहीत असे कुठे आहे जगणे ?
कायदासंमत कामे करतानाही बीपी, मधुमेह, हार्टरोग
हे स्वीकारावेच लागतात ना ?
आणि आहात तोवर चमका, झळका, गाजा –
जगा धूमकेतूसारखे !

भय आणि आदर निर्माण करत. आपल्याला का नकोत
ग्लॅमर, प्रसिद्धी, आपल्या चर्चा, आपल्या दंतकथा ?
--- ००० ---

मी आणि तू

मी पोटफाड्या तू फूटपाड्या
माझा द्वेष सर्जक तुझा घातक
माझी हिंसा मानुष तुझी अमानुष
माझे पुतळे स्फूर्तिदायक
तुझ्या मूर्ती भेदमूलक
मी विचारी तू अविचारी

माझी गर्दी अल्पसंख्य शहाणी
तुझी बहुसंख्य उन्मादी
माझा अजेंडा विश्वाला मार्गदर्शक
तुझा अंधारमार्ग
मुख्य म्हणजे
मला जे समजते ते तुला समजत नाही

मी म्हणतो लोक मूर्ख आहेत
त्यांनाच तू शहाणे म्हणतोस
मी उपकृत केलेलेही
तुझ्या अस्मितांत वाहून नेतोस

वेडे सगळे जर माझ्याकडे आले
तर त्यांना मी शहाणे म्हणेन माझे म्हणेन
तुम्ही जे करताहात ते
माझा शेतकरी
माझा सामान्य माणूस
सहन करणार नाही
माझ्या माणसांना खोटे बोलून
तुम्ही फसवत आहात
गांधी श्रेष्ठ की हिटलर
याचे उत्तर जगात कुणालाही विचारा

तुमच्याआमच्यांतली फूट वाढत चाललीय
याचा सूड घेऊ कारण तुम्हीच आहात जबाबदार
सध्या आमचे सत्य मागे पडलेय
तुम्हाला हे महागात पडणार आहे
उद्याचा सूर्य आमचा असेल
--- ००० ---

दार

दार असेच उघडे राहिलेय
कुणी येणार आहे असे नाही
पण येईलही कुणी
असे वाटताच धडाधड
बारा खुर्च्या उघडून उभ्या राहिल्या
रिकाम्याच
पण वाटले काही ना काही
परिणाम तर होतच असणार
आपल्या विचाराचा
कारण डोके तर दुखत नाहीय
असा विचार येताच
खरेच दुखू लागते साले

पण कुणी येणार तर नाहीय
अशी एक यंत्रणा हवी
की भीतीतून वाईट विचार
हा प्रकारच नको

गेले बरेच दिवस
आपल्या सावल्या नीट पडताहेत
असे आले रे आले मनात
की भीतीच वाटते
कुणी येणार तर नाही
असे वाटल्याने
खरोखरच सावल्या
वाकड्यातिकड्या होण्याची

समोर तर कुणीच नाहीय
सगळे गेलेत निघून वारीला

आता पाऊस येईल
हा बरा आहे विचार
दार घ्यावे लावून
आणि सतत केन्द्रितच राहावे
याच विचारावर
पण जमेल का –
--- ००० ---

साचा

एकच काहीतरी असावा दोष
तो गेल्यावर सगळेच बारा
गेलेले दिसताहेत
म्हणजे वाटाण्याच्या अक्षता
आपोआप फळाला आल्या की काय
कुठे चुरगळले होते
मेंदूचे अवडंबर
हे स्वप्नात तरी कुठे होते माहीत

पण जो आहे हा क्षण
ती क्रांतीच आहे
तरीही स्पर्शातली वासनाही
न त्यागता

ना सतत तिचा विचार
ना सतत खिशात ठेवण्याची काळजी

विश्वासघाताच्या इमारती
अस्तित्वातच नाहीत
त्यामुळे
चुंबनाचा क्षण परिपूर्ण

कोण कोण कसे कसे
भ्रष्ट आहेत
कुणाची वाट लागावी
यांच्या टेकड्याही गायब

आता या आकाशातून मी चालतो आहे
की माझ्या भूतकाळाची वाफ

मी ना संवेदनशील ना कुंपणावर
चांगले जगण्याचा साचा
हाच तर नसेल
तो युगानुयुगांचा दोष
--- ००० ---

## स्थिरचित्र

वस्तू असू देत पण त्या नकोत
त्यांचा नुसता आभास हवा
रंगही खास नकोत
निवडलेले बिनचूक होण्यासाठी
पॉलिश नको खरखरीतपणाच असावा
नेमका नको माहोल
नुसतेच जाणवावे
मिसळभेळ वातावरण

निसर्गदत्त म्हणाले
टक लावून नका पाहू जगाकडे
एकएक प्रश्न सोडवत बसाल
तर विसरून जाल
आपण कुठे उभे आहोत
आणि हा रस्ता खरा आहे का
हे प्रश्न

मनावर काय की अंगावर काय
पुरळ उठणे ही अलर्जीच असते
सतत अस्वस्थ करणारी
नेमका विचार हा
शरीरबाह्य समजून

हे कळलेला चित्रकार
काढतो नेमके
काहीच माहीत नसलेले
स्थिरचित्र

जे काही होते समोर अस्पष्टसे
ते सगळे आता कुठे गेले
हेही तो विचारतही नाही

नेमकेपणा
नकोच असतो त्याला
--- ००० ---

प्रतिध्वनी

दोन्ही माझेच प्रतिध्वनी
एक तर खूप जुना असूनही सतत नवा
आणि एक खूप नवा असूनही
माझ्या असण्याइतकाच सनातन

जणू संगीताचा रियाझ
जणू नृत्याची अविरत आवर्तने
ओघवते शब्द
जणू फक्त मनांची अस्तित्वे
जागतिक

मनांतून थेट अवकाशात
गेलेले शब्द
नेमके हवे तिथेच
आणि हवे तसेच
आणि हवे तेच

हे ना गाणे ना नृत्य
व्यापताप टाकून
एकेक नग्न मन
गमावून बसलेले
समाजमान्य व्याकरण

फक्त द्यायचे तर आहे
मिळवायचे कुठे काय आहे
हक्काचाही नाही प्रश्न
क्षण न क्षण आहे पूर्ण

हे कधीच कुठेच ज्ञात नाही होणार
नसणाऱ्या मनांचे परिपक्व असणे

रूटीन नसलेल्या या जगात
जग राहील रूटीन गाफील
--- ००० ---

आट्यापाट्या

ही रेघ ओलांडून पलीकडे
जाण्याच्या आपण प्रयत्नात आहोत
असा आभास नुसता ठेवला
आणि अलीकडेच चालू ठेवले खेळणे
अस्थैर्य तर राहावे सतत
पण यश देत राहावे
असे मस्त चालू दिले

हळूहळू याचीच सवय होत गेली
जिंकण्याहरण्यातला
सनसनाटीपणा जाऊन
सलगी येत गेली
थकवा आणि स्मित यांसह

त्यातून अडवण्याची महत्त्वाकांक्षा
मागे पडत गेली
आणि एका क्षणी
सहज ओलांडली गेली ती रेघ

हे जिंकणे म्हणजे तो पराभव
असे राहिलेच नाही

आता दुतर्फी समजूत आली
की यापुढचा खेळ
आता सहज
मैदानाबाहेरच होत राहील

बरसता पाऊस स्वीकारला गेला
नजरेतून ओसंडत
मृदगंधाचा आनंद

स्पर्श स्पर्श म्हणजे
काय असते याहून अधिक
--- ००० ---

मऊपणा

सगळेच खोटे असले
तरी कुणाचा उद्धार करण्यासाठी
नाही खात कुणी माती
पाचकळपणाचे दशावतार
म्हणून कुणी जगायचे
कसे सोडून देईल
उरले ते देवाला म्हणून

भाषा म्हणजे
निव्वळ वाह्यात बडबड
निदान मग
फुटले तर फुटले गुपित
अशी समज तरी हवी
मृत्यूची

संघर्षाची गोडी लागणे
म्हणजे प्रेमच ते
क्षणभंगुर का असे ना
आकाशातले रंग
फिसकटू शकतात
म्हणून काही कुणी
वाऱ्याशी नाही भांडत

निरोपाच्या वेळी
तात्पुरते गाव सोडताना
रात्रीच्या अंधारात
कसा आपोआप येतो
मऊपणा

जगरहाटी
चालू राहण्याची काळजी
जगाला असेलच ना
नाही तर नसेलही

तसेही चालेलच ना
--- ००० ---

तात्त्विक

मला माहीत असते
खूप काही झालेले असले
तरी काहीच झालेले नसते
तात्त्विक तर होते सगळे
मानवी थोडेच होते

मानवी आचरणात मिसळ असतेच
पण मग दुसरे कुठले आणणार जगणे

पाऊस यायच्या आधीच
निवडणुकांचे निकाल लागल्याने
दुबार पेरणीचे संकट टळलेला
शेतकरी मानतो आभार
निवडणूक आयोगाचे
आणि जाता पंढरीसी म्हणत
वळतो एका निरागस हास्याकडे

मग सकाळ होते तेव्हा
ती सुस्नात सुरू करते दिवस
कालचे सगळे विसरून जणू
खरोखर तात्त्विकच तर होते ते

त्याला म्हणजे मला चिंताच नसल्याने
तो भिजून आलेला असतो पावसात
फार ताणू नये
एवढे समजून असले की झाले

ती म्हणते
तिला यायला जरा उशीर होईल
तेव्हा दोघेही ठरवतात मनोमन
मिसळ भेसळ मान्य करावी हेच बरे
नकोच ती उगीच जगाची काळजी

यावर दोघांचाही दिवस
मस्त सुरू होतो सेक्सी
--- ००० ---

विठ्ठल

मी आपला एक गंमत म्हणून माझ्या आजूबाजूला किंवा माझ्याच आयुष्यात घडलेल्या काही घटनांवर इथे लिहीत असतो. ते कृपया फार गांभीर्याने घेऊ नये. गांभीर्य म्हणजे वैचारिक, नैतिक, सामाजिक, राजकीय वा आर्थिक गांभीर्य असे ज्यांना वाटते त्यांनी तर याकडे दुर्लक्षच करावे. कारण या सर्वांना काहीही पटवून देण्याचा फारसा गंभीर प्रयत्न मी कधी करत नाही.

तर सध्या अनेक वारकरी पुण्यात ठिकठिकाणी मुक्कामाला आहेत. त्या त्या भागातले लोक प्रेमाने त्यांच्यासाठी चहा, बिस्किटे, नाश्ता, जेवण अशा सोयी करत असतात. आमच्या इमारतीसमोरच्या शाळेतही असा एक वारकऱ्यांचा समूह दर वर्षी उतरत असतो. त्यांच्यासाठी आमच्या सोसायटीतल्या अनेक स्त्रिया सकाळचे चहापाणी आयोजित करत असतात. याही वर्षी तो कार्यक्रम चालू होता. मी फिरून आलो आणि ती गर्दी ओलांडून घराकडे जाऊ लागलो तर काही स्त्रियांनी, काका, चहा घ्या म्हणून माझ्यापुढे कप केला. मी धन्यवाद, नमस्कार असे म्हणून जाऊ लागलो तर, नाही, घ्याच, असा त्यांनी आग्रह केला. मग मी उभ्यानेच तो पिऊ लागलो. तिथे माझी पत्नीही बसलेली होती. तिच्या शेजारी बसलेल्या एक बाई उठल्या आणि मला म्हणाल्या की इथे बसून प्या. तसे पत्नीशेजारी बसताना माझा अंगठा चहाने भाजला. पण मी ते अजिबात दाखवून दिले नाही वा कपही हातातून सुटू दिला नाही. त्यांच्यामुळे माझा अंगठा भाजला असे त्यांना अजिबात वाईट वाटू नये याची काळजी घेतली. आता सोसायटीतले पतिपत्नी असे तिथे आम्हीच होतो. काहींनी विठ्ठल-रखुमाई म्हणून आमचे फोटो काढले. काहींनी नमस्कारही केले. आपण या योग्यतेचे नाही याची जाणीव असल्याने मला अर्थातच अपराधी वाटले. पण, असे ना का, प्रत्येकात काही चांगल्या-वाईट शक्यता असतातच, तसे आपल्यातही काही असेल थोडे चांगले, असे समजून मीही सर्वांना नमस्कार करत राहिलो. त्याच वेळी मला आठवत काय होते तर, त्याचा प्रामाणिकपणा सिद्ध करण्यासाठी वहिदासमोर देव आनंदने मेणबत्तीवर स्वत:चा हात धरून भाजून घेणे !

चांगले असे काही असते आणि ते घडावे, भले व्हावे म्हणूनच वारकरी वारीला जात असतात. आपणही, एकमेकांच्या चांगुलपणाला आवाहन करत अनेकदा जग सुंदर करायच्या प्रयत्नात असतो.

पण चांगुलपणा म्हणजे काय, हे मतांच्या स्तरावर, तशा रूपांत, अनेक रचना घेऊन अस्तित्वात येते तेव्हा समस्या निर्माण होतात. या चांगल्यांनी त्या चांगल्यांच्या उरांवर बसणे सुरू होते ! मग, इथे प्रश्न येतो की मताच्या रूपात नसलेले असे काही चांगले असू शकते का ? यावर अनेकजण पटकन असा निष्कर्षच सांगतात की असे काही असूच नाही शकत. म्हणजे, त्यांच्या मते चांगल्या असलेल्या काही गुणांचे अंश माझ्यात असू शकतात, एवढेच. तसे अंश फारच थोडे असावेत आपल्यात असे वाटल्याने तर मी अस्वस्थ झालो होतो ! म्हणजे मीही, एक प्रकारे, एकूणात, मतांचा गच्चागोळ, जांगडगुत्ता वा चोंबाळे म्हणजेच जगणे असे मानूनच तर जगत असणार.

पण हे पाहता, प्रश्न पडतो की माणसांचे मूल्यमापन वा त्यांची चांगले-वाईट ही विभागणी यांत कितपत तथ्य असेल ? विठ्ठलाने याबाबतचे ज्ञान सर्वांना द्यावे, हीच प्रार्थना ! ( की विठ्ठल हीही नुसतीच आपली एक मत रूपातली कल्पनाच असेल ? )

--- ००० ---

आणखी एक अर्धवट विश्लेषण

सर्वच विश्लेषणे अर्धवटच असतात. बुद्धी आणि तर्क यांनी जर सत्य सापडत असते तर विश्लेषक मंडळी एकदा काँग्रेस, एकदा बीजेपी यांच्या बाजूंची मांडणी करणारी विवेचने देणारी झाली असती. तसे होत नाही. अ बाजूचे ते अ बाजूचेच विश्लेषक असतात आणि ब चे ब. त्यासाठी अर्थातच तपशीलांची निवड, त्यांचे रूप, त्यांचे अर्थ हवे तसे वळवावे-वाकवावे लागणे हे घडतच राहते. त्यामुळे, कोणतेही विश्लेषण हे भावनिक वाहोटीला लागून ऐकावे अशा योग्यतेचे असू शकत नाही. हा अबाधित आणि सत्य पाया लक्षात घेऊन इथे मी माझे एक विश्लेषण सादर करत आहे.

शिवसेना ही प्रामुख्याने मराठी माणसाच्या हितासाठी निघाली. पण नंतर, मुंबईत काहींना असे वाटत होते की हिंदूंचा एक चांगला फोर्स उभा केला पाहिजे. मराठी काय की हिंदू काय, कोणत्या तरी समूहाच्या हितरक्षणासाठी आलेली ती प्रतिक्रिया असते. म्हणजे तशा प्रतिक्रिया याव्यात अशी भूमी आधी तयार झालेली असते. तर यामुळे जरा थोडे जहाल वळण घेऊन शिवसेना हिंदुत्ववादी झाली. ती तिची घट्ट ओळख झाली. पुढे भारतीय स्तरावर अशीच ओळख बीजेपीची तयार होत गेली. कोणतीही गोष्ट हवेतून निर्माण होत नसते, ती कशाला तरी आलेली प्रतिक्रिया असते. कालांतराने बीजेपी हा एक ताकदवर पक्ष बनला. या दोघांनाही हिंदुत्ववाद प्रिय असल्याने ते एकत्र आले. पुढे बीजेपी म्हणजे मोठा भाऊ आणि शिवसेना म्हणजे लहान भाऊ असे होत गेले. आणि कदाचित, मग, दोन हवेतच कशाला बीजेपीच सर्व झाली तरी चालेल, असे होऊ लागले.

एक माणूस असो की पक्ष की देश, त्याला ओळख लागते. ओळख हाच जगण्याचा आधार असतो. बीजेपी  कायम मोठी होत जाणार आणि आपण कायम दुय्यम असे चित्र दिसू लागल्यावर, शिवसेना ही आपली ओळख लोप पावू द्यायची नाही, या विचाराने त्या पक्षाने काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्याबरोबर जायचे ठरवले. कॉमन मिनिमम कार्यक्रम म्हणजे अर्थातच त्यात हिंदुत्ववाद येणारच नव्हता. त्या दोन काँग्रेसवाल्यांचा त्यांच्यांतला कॉमन कार्यक्रम होता, एक म्हणजे हिंदुत्ववादी बीजेपीला सत्तेपासून दूर ठेवणे आणि दुसरे म्हणजे शिवसेनेचे हिंदुत्व पातळ करत नेऊन इथली हिंदुत्वाची ताकदच कमी करत नेणे. हे शिवसेनेतल्या बऱ्याच लोकांना सहन झाले नाही. या पद्धतीने आपली ओळख लोप पावणार आहे हे पाहून ते बिथरले आणि सध्याचा प्रॉब्लेम तयार झाला.

आपली ओळखच हरवत असेल तर माणूस भरकटू लागतो, हवालदिल होऊ लागतो. सैरभैर होतो. माणसाचे जगणेच अशा बनावट ओळखींवरच चालत असते. माणसे वेगवेगळी असणे म्हणजे त्यांच्या ओळखी वेगवेगळ्या असणे. यात कुणी कुणाला बरोबर-चूक म्हणणे हे निव्वळ निर्बुद्धपणाचे असते. कारण हा वेडा, हिंसक असा जगण्याचा नमूना सगळ्यांनीच, पूर्ण मानवजातीनेच स्वीकारलेला असतो.

म्हणजे आता, एक म्हणजे, शिवसेना शिंदे गट, नव्याने हिंदुत्वाचा झेंडा घेतलेली मनसे, कमकुवत झालेली शिवसेना आणि बीजेपी असे चार हिंदुत्ववादी इथे असणार. बीजेपी आता शहाणी होईल – ती शिंदे गट आणि जमल्यास मनसे यांना मानाने वागवत राहील. त्यांनी शिंदे गटाला दिलेल्या ऑफरवरून ते दिसतेच आहे.

माणूस हा प्राणी ओळख आणि प्रतिक्रिया यांच्या जंजाळात जगणेच फक्त सेफ आणि शक्य मानणारा असा आहे. त्यामुळे, अशी ना तशी त्याची परवड होत राहणे भाग आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र !

--- ००० ---

ना नाव

ना नाव महत्त्वाचे ना तपशील
ना कपडे ना पदव्या
ना वय ना आवाज
ना भाजी ना पिझ्झा
ना पाय सोडून पाण्यात बसणे
ना सिनेमाच्या अंधारात
स्वप्न चाळवणे

इथे फक्त भाषा
मेंदूतले भाषाकेंद्र
एवढेच शरीर
खरे तर मनच फक्त

इंद्रिये असतात
कार्यकर्ते
पण मन नसेल सचेतन
तर सर्व बागा ओस

जे जे विशिष्ट
ते ते सवयीतले
ते ते घडत आलेले मनात

एकाच धारेवर एकाच क्षणी
भेटतील जेव्हा दोन भूतकाळ
तेव्हाच उडू शकेल
आनंदकारंजे दीर्घप्रतीक्षित

भूतकाळी जग
भूतकाळी पिझ्झा
भूतकाळात या क्षणी
अत्युच्च सनसनाटी

खरा आभास
--- ००० ---

पाप

आंतरविरोध खूप आहेत
मजा नाही येत
या गाण्यात
ती म्हणाली

आणि मला त्याशिवाय
नाही येत मजा
नुसती शांतता काय कामाची
मी म्हणालो

मी पुण्यवान नाहीय
नसू दे ना ती म्हणाली
आता शांतता आली
पापयुक्त
--- ००० ---

टावेल

प्रदक्षिणा घालून
येतोय न येतोय
तोवर समोर
पक्षांतरबंदीचा बोर्ड दिसला
म्हणून त्याने आधी
दात घासून घेतले
अंघोळीचा टावेल सापडेना
म्हणून त्याने
मुख्यमंत्र्यांना फोन केला
तर त्यांना सर्दी झाल्याचे समजले

तो लेचापेचा नव्हता
जिद्दी होता
शेवटपर्यंत
काशिस जावे नित्य वदावे
असे न केल्यास
भित्यापाठी ब्रम्हराक्षस
असे होईल हे ओळखून त्याने
आधी ट्रॅफिक पोलिसांचा पगार वाढवायचे आश्वासन दिले
--- ००० ---

उपटसुंभ

काहीही झाले तरी
उपटसुंभासारखे जगत राहायचे
हे बाळकडू कित्येक वर्षे फिस्कारत आलेले होते
याला भूजलप्रदूषणतज्ञांचा पाठिंबा नसला
तरी सामान्य ज्ञान विभागाचे लोक
यात तथ्य असल्याचे गौरवगान फडकावत होते
जनता कधीच कशाचीच तज्ञ
होऊ इच्छित नसल्याने
गरज पडल्यास ही लढाई
रस्त्यावर जाऊ शकते
हे ओळखून तिने
योग्य तो अभिसार तयार ठेवला होताच

ही अर्थात योग्य-अयोग्यतेपेक्षा
हक्कांची आणि न्यायाची
कलमे स्थापित करण्याची बाब होती
नदीत डुबक्या मारून
सभेला आलेल्या सदस्यांना
काही वेगळे अधिकार असावेत का
यावर देशात चिरफळ्या उडत होत्या
घटनातज्ञ म्हणत होते की शेवटी
जनक्षोभ आणि जनभावना
यांनाच महत्त्व देऊन
वधुवरसूचक मंडळे चालवली जावीत

कुणी तोफ असते तर कुणी ताईत
कोणत्याही ताई यावर लट्टू असतातच
ताई म्हणजे गुंडगिरी
हे समीकरण एका उदात्त नात्याची
रया घालवणारे आहे
स्त्रियांचा सन्मान
ही राष्ट्रीय संपत्तीच मानायला हवी

भरकटलेले जहाज वठणीवर आणण्यासाठी
लागतो धीर आत्मविश्वास सहकाऱ्यांवर विश्वास
निर्भयता शौर्य तहानभूक विसरून
एकएक प्रश्न सोडवत नेण्याची हिकमत

विरोधकांना चुचकारत वा धमकावत
त्यांची घोंगडी जप्त करण्याची कुवत
आणि मुख्य म्हणजे
सर्व प्रेयसींना स्थगित ठेवून
निसर्गाशी दोन हात करण्याचे
ईश्वरदत्त कौशल्य

कुणी डगमगू नये या माणुसकीने
डायबेटीसवाल्यांच्या जशा संघटना असतात
तशाच युरीन इन्फेक्शनवाल्यांच्याही असाव्यात
असे यु इ न झालेल्या
काही सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रयत्न होते
एकदा याला रूप येत गेले की
हृदयरोगी आणि गुडघेदुखीवालेही
यात सामील होतील यात शंका नव्हती

प्रश्न जसे अर्जन्सीचे होते
तसेच अग्रक्रमांचेही होते
अग्रक्रम चुकले असते तर
विमानतळावरून
परत यावे लागण्याचा धोका होता
तत्त्वे पाळणे कमाईची सुरक्षा
आणि जमल्यास एकदोन लग्ने आधिक
जमवून घेणे हे सगळेच
सारखेच महत्त्वाचे होते
पंडित भोसडीचे कधीच
अशा प्रश्नांच्या अग्निपरीक्षेत सापडत नाहीत

पुढचा क्षण या क्षणानंतरच येणार
वेळ लागणारच हाही होता एक प्रॉब्लेम
सद्दी संपणारच पण खूप मोह टाळून
अधिक मोहक गोष्टी मिळवल्या
असा सारांश तर निघायला हवाच

बाळकडू काय फक्त घरात मिळते
असे थोडेच आहे हे विश्वचि माझे घर
एवढे तर सर्वांनाच समजते
--- ००० ---

कावळा आणि मुंगूस

आज सकाळी एक अघटित घडले. मी जिथपर्यंत फिरायला जातो तिथून एक पाचपन्नास पावले अलीकडे असताना मागून एक कावळा आला आणि अगदी माझ्या डोक्याजवळून वेगात गेला. त्याचा किंचित स्पर्श झाला असावा असे मला वाटले. असे आयुष्यात कधीच घडले नव्हते. चुकून गेला असेल तो जवळून असे समजून मी पुढे जाऊ लागलो तर गोल फिरून येऊन आता मात्र नक्कीच ठरवून तो माझ्या डोक्याला स्पर्श करून गेला. त्याला स्पर्श म्हणावे की फटका हे कळले नाही. त्याचा पंख वा पाय लागला असावा. ही काय भानगड ? त्याला माझा काही कारणाने राग आलेला असता तर त्याने चोच मारली असती. तसे झाले नव्हते. पण हे नुसते माझे विचार झाले. मी असाच पुढे जात राहिलो तर तो पुन्हा तेच करण्याची शक्यता वाटली. तिकडे इतरही खूप कावळे होते, मग हा एकच कावळा असे का करत होता ? मला हिचकॉकचा ‘ बर्डस ‘ हा सिनेमा आठवला. नशीब, सगळ्या कावळ्यांना असा माझ्याबद्दल राग वा लोभ नाही आहे ! नकोच ती कटकट म्हणून मी तिथूनच मागे फिरलो. मग मात्र तो पुन्हा आला नाही. म्हणजे मी पुढे जाऊ नये, हे सुचवण्यासाठीच तर त्याने असे केले नसेल ? आणि पुढे गेल्यास असा कोणता धोका असणार होता ?

आणि पारंपरिक विचार करायचा म्हटले तर हे एखादे दुश्चिन्ह तर नसेल ? घरासमोर कावळा ओरडला तर पाहुणे येतात, ही एक बरी समजूत सोडली तर कावळा काही कोणत्या सुचिन्हा बद्दल प्रसिद्ध असल्याचे ऐकिवात नाही. पण, अशी कुठली यंत्रणा असणार आहे जगात की जी सुचिन्हे वा दुश्चिन्हे दाखवायचे काम करत राहील ? आणि तसाही विचार करावा तर कालच संध्याकाळी मला एक मुंगूस आडवे गेले होते ! ते तर निर्विवाद सुचिन्हच समजले जाते ! एक सुचिन्ह आणि एक दुश्चिन्ह ? मग माझ्या आले लक्षात, आपण स्वत:च्या आयुष्याला, सुखदु:खाला, यशापयशाला फार महत्त्व देतो, म्हणूनच ही चिन्हमीमांसा अस्तित्वात आलेली आहे. तसे नसते आणि संत लोक म्हणतात तसे, जे येतेय वाट्याला ते जगायचे, असे असते तर कुठे प्रश्न येईल चिन्हांचा ? तरीही, रूटीन नीट चालू राहावे म्हणून चिन्हे ही बहुतेक ‘ अघटित ‘ म्हणजे नेहमी न घडणारे काही, अशा स्वरूपातच ठरवलेली आहेत, असे दिसते.

एकूण जगण्यात आपले वागणे हे प्रामुख्याने आत्मकेंद्रितच असते. बऱ्याचदा, उपकाराचे वागणेही, जरा खोलात गेल्यास, आत्मकेंद्रित हेतूंनी युक्तच असल्याचे दिसते. आपले यशापयश, सुखलालसा आणि अनेक संबंधांतल्या क्रिया-प्रतिक्रिया आपल्याला अनुकूलच असायला हव्यात – या तत्त्वांवरच एकूण जगणे चालू असल्याचे जाणवते. याच हेतूंनी मन सतत बाह्य परिस्थिती, घटना आणि माणसे कंट्रोल करायच्या प्रयत्नात असते. काय घडावे यात हजारो प्रभाव कार्यरत असतात, त्यामुळे, आपला कंट्रोल राहू शकेलच याची कदापि खात्री नसते. म्हणजेच प्रतिकूल काही घडण्याची भीती असते. त्यातूनच ही चिन्हमीमांसा, कल्पनेने का असे ना, जन्माला येत असावी.

म्हणूनच काहीजण ‘ लेट गो ‘ म्हणजे ‘ जाऊ द्या, होऊ द्या काहीही ‘ असे जगण्याचे महत्त्व सांगतात. म्हणजे, खरे तर, असे जगणे जमू शकेल का, हा अत्यंत महत्त्वाचा, मूलभूत प्रश्न आहे. तो प्रश्न बहुधा टाळण्याकडेच आपला कल असतो.

दोन विरोधी चिन्हे तर घडली आहेत – काय होते ते पाहू.

--- ००० ---

विश्वासाचे धागे

इथे मिळतील
विश्वासाचे धागे
म्हणून कुणी समाधी घेतली

तिच्या श्वासातून उगवले
दोन गुलाब
ज्यांचे अर्थ
होते स्वातंत्र्याच्या शोधात

विमनस्क म्हणजे काय
हे हळूहळू
दिसू लागले
न आठवता

कुणालाच
नव्हते माहीत
काय केल्याने
कमी होतील शंका

असेच होत राहिले
तर ना फुले
ना अध्यात्म
या त्रांगड्यात
अडकल्या स्त्रिया

त्यांना विचार नको होता
हवा होता समाधिस्त पुरुष
ज्याच्या आलिंगनात
मिळणार होते त्यांना
वांच्छित दागिने

संभोगात हवी होती
त्यांना उत्तेजक शांतता
मोहरून टाकणारी
--- ००० ---

व्हिजिटिंग कार्ड

कुणाच्या तरी मांडीवर
पडलेले अस्ताव्यस्त
कुणाचे तरी व्हिजिटिंग कार्ड
ज्याचे डोळे विस्फारलेले
आणि ज्याचे बालपण आता
रक्तासारखे सुकून गेलेले

कोणत्याही कारणाने आता इथे
पुन्हा नाही अवतरणार निसर्ग
--- ००० ---

## कल्चर

उद्विग्न सकाळी
सतारवाला जागलेला
कित्येक रात्री
डोळे सुजलेले विचारमग्न
बोटे रक्तरेषांची

किती दु:खी किती सहनशील
जगाच्या कल्याणा
शहीद न्योछावर अपरंपार
नव्या वाटेचा नव्या भाषेचा
एककल्ली उद्गाता

बाहेर लागतात दिवे
पण हा अंधारात बसून
मुद्दाम ठरवून चिंतनशील
अकादेमीधारक रिच
करणारा चाहत्यांचे कल्चर
--- ००० ---

ड्रामा

ज्यांना वाईट वाटायला हवे होते
त्यांना वाईट वाटून झाले
त्यांनी तशा पोस्ट दिल्या
ज्यांना आनंद व्हायला हवा होता
त्यांना तो तसा झाला
त्यांनी तशा पोस्ट दिल्या

आता एवढ्यात तर नाही
फणे काढण्याची
मजा देणारा ड्रामा
आता लागू या रूटीनला

नेहमीप्रमाणे कंटाळत
--- ००० ---

शंभो SSSSS

शंभो SSSSS
येते ऐकू मोठ्या आवाजात
जाणारे येणारे बघतात कुणी
स्मित करत तर कुणी दुर्लक्ष करत तर कुणी
मनात त्या वयस्कराला शिवी देत
जातात पुढे आपापल्या गतीने
आपापल्या दिशेने

त्याच्या डोक्यात असंख्य विचार
अमाप गर्दी आणि घर्षण त्यातून
बाहेर पडण्यासाठी
ओरडणे अत्यावश्यक

मुंकचे चित्र स्क्रीम सतत त्याच्या डोक्यात
काहींच्या येते मनात च्यायला
आपणही नामजप करतोच की
आरत्या करणारे शंख घंटा वाजवणारे
मनात सामील होतात त्या किंचाळीत
आनंदाच्या तुताऱ्या वाजतात
पराभवांच्या शक्यता निवारत

आपल्यांत एकदा एकमत झाले होते
की प्रेम वगैरे असे उदात्त वगैरे
काही नसतेच सगळे करार असतात करारी

प्रत्येक डोक्यात तेच असते स्थिर पण
आतल्या आत ठिणग्या उडवणारे चक्र
साधूने ठरवले होते ते वापरायचेच नाही
ती कुमारी माता म्हणाली की मूल त्याचे आहे
नंतर म्हणाली त्याचे नाही दोन्ही त्याने मान्य केले

प्रत्येकाची वेगवेगळी किंचाळी चालू असते
प्रेमबीम नुसती एक तात्पुरती  सुटका
आणि लैंगिक नसलेले शुद्ध मन
तर मनाचा भ्रमच हेही आपले एकमताचे

पण मग दुसरे असणार तरी काय जगण्यात

मन असल्यावर
म्हणून करू दे मला प्रेम
माझ्या मनाने तुझ्या मनावर
--- ००० ---

## अधिक

काही सोडून गेले, काहींची हकालपट्टी झाली.
राहिले ते निष्ठावान, निर्भय, शूर, गोंधळलेले.
सगळेच थोडेफार गोंधळलेले, थोडेफार निर्भय.
थोडेफार तत्त्वनिष्ठ आणि आश्वस्त थोडेफार भवितव्याबद्दल.
न्यायाचे भोक्ते, जनतेचे हितचिंतक, डावपेचांचे पाईक.
आज आहे, उद्या असू-नसू.
सत्ता काय येते-जाते.
पैसा काय, कुणीही कमावू शकतो.
बरोबर असले सगळे तरी कायद्यात बसावे लागते साले.
काय कसे घडू शकेल हे कायद्याला आधी कुठे माहीत असते ?
बहुमतातले घरी जाऊ शकतात, अल्पमतातले जिंकू शकतात.
मतपरिवर्तन, हृदय परिवर्तन, विवेक आणि निस्पृहता.
जनता सद्गदित.
किती कष्ट, किती ताण, किती विचार !
जनतेला वाटते, खरे तर,
आपल्याला सगळ्यांचीच बाजू घेता यायला हवी.
वेगवेगळ्या बाजू असल्याने मर्यादा येतात.
किंवा मग एकच बरोबर बाजू असे का नाही होऊ शकत ?

बिचाऱ्यांना किती फिरावे लागते. कितीही उंची असले तरी
पेय, अन्न गोड लागत असेल ?
हवाबदलाची अलर्जी असणारच ना काहींना तरी.
कसे सहन करत असतील ते सर्दी आणि विरह ?
उरलेलेसुद्धा निर्भय राहायला कंटाळत नसतील ?
निष्ठावान राहायला घाबरत नसतील ?
जिद्द आणि सात्त्विक संताप
आणि वेळ पडल्यास प्राणार्पणाची तयारी
हे पाहून काहींना हा वेडेपणा वाटत असेल तर काहींना अभिमान.

कधीतरी हे मार्गी लागेलच.
शेवटी न्यायाची दिशा लागेल.
मग जनतेच्या न्यायासाठी झटता येईल
अधिक जोमाने, अधिक आत्मविश्वासाने,
अधिक नि:स्वार्थीपणाने,
अधिक निश्चित होत.
--- ००० ---

अभ्यास

नेहमीच्या ओळखीच्याने
ओळख दाखवली नाही
( लक्षच नसेल कदाचित )
एका भांडणात माझे बरोबर
म्हणणाऱ्या मित्राने
तिकडे वेगळेच मत मांडले
( वेळ मारून नेली असेल किंवा
कळलेच नसेल त्याला )

याने खट्टू होऊन चालता चालता
वाटते किती बरे आहे
कुणी कुणाच्या नादी नाही लागत
पक्षी वा कुत्री हल्ला नाही करत
झाडाची फांदी नेमकी
डोक्यात नाही पडत
चक्री वादळात
आपण उडून नाही जात

आपल्याला तीर्थ विठ्ठल
आवडायची सोय आहे
आणि बटर कट डोसा

नेमका कुणाला बोल लावायचा
याचा आपला अभ्यास नसल्याने
आपण सगळीच भाषणे ऐकतो
तन्मयतेने सगळेच पटवून घेत

मित्र म्हणतात वेडा आहेस
कळायची गरज नसते
तू जे मत तुझे समजतोस
तेच रेटत राहा
अभ्यास आपोआप होईल

तुझ्या मित्राने वेगळे मत मांडले तिकडे
याचे दु:ख व्हायलाच हवे योग्यच आहे ते
--- ००० ---

गाणी

तुमची ईश्वरावर श्रद्धा असो वा नसो, ही गाणी बघा –
जो भी है वो ठीक
है ज़िक्र क्यों करे
हम ही सब जहां
की फिक्र क्यों करे
किंवा --
दुनिया ने हम को दिया क्या
दुनिया से हम ने लिया क्या
हम सब की परवाह करें क्यूँ, सब ने हमारा किया क्या
आ ... दम मारो दम ...
किंवा –
मैं ज़िंदगी का साथ निभाता चला गया
हर फ़िक्र को धुँएं में उडाता चला गया
बरबादियों का सोग़ मनाना फ़िज़ूल था -
बरबादियों का जश्न मनाता चला गया
मैं ज़िंदगी...
जो मिल गया उसी को मुक़द्दर समझ लिया -
जो खो गया मैं उसको भुलाता चला गया
मैं ज़िंदगी...
ग़म और खुशी में फ़र्क न महसूस हो जहाँ -
मैं दिल को उस मुक़ाम पे लाता चला गया
मैं ज़िंदगी...
--- अशी बेफिकीर, बेदरकार, बेमुर्वत, बेजबाबदार गाणी मराठीत नाहीत. मराठी मेंगळट आहे. इथे फक्त फुकटचे शौर्य, बालिश तत्त्वशीलता आणि स्वप्नाळू आत्ममग्नता चालू असते. इथे एक तर ‘ चिंधड्या उडविन राई राई एवढ्या ‘ किंवा ‘ शुक्र तारा मंद वारा ‘ चालू असतो सतत. ‘ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति ‘ म्हणजे आपणच, असे समजून उत्साहात जगत असतात सगळे.
नदिया ना पिए कभी अपना जल, वृक्ष ना खाए कभी अपने फल ।
अपने तन का मन का धन का दूजों को दे जो दान है,
वो सच्चा इंसान, अरे इस धरती का भगवान है ॥ --- अशी सगळी माणसे असू शकतात असे त्यांना वाटते. तसे कुणी नसल्यामुळे ते दुगाण्या झाडत राहतात. पोटदुखी वा बीपी वा दोन्ही लावून घेतात. स्वरगंगेच्या काठी दिलेली वचनेही पाळणारे आपण आहोत असे त्यांना वाटते. व्यापार, कला, कारखानदारी यांत त्यांना फारशी रुची नसते. ते स्वाभिमानी, अस्मिता जपणारे आणि जातिवंत योद्धे असतात.
गाणी बदलल्याशिवाय मराठी चित्रपटाला हिंदी चित्रपटाची बरोबरी नाही करता येणार.
आणि आत्मप्रौढी आणि आत्मकीव यांतून मराठी भाषेची सुटकाच नाही होणार.
मराठी लोक नुसतेच उपरोध, टोमणे, टोले आणि प्रतिटोले यांत अडकून पडतील.
आणि करत राहतील परिस्थितीची हुशार विश्लेषणे.
--- ००० ---

जे उपरे

एकत्र उदासी
म्हणजे

समाधानच
तपशील

वगळणारे
सर्वच

जे उपरे
अनावश्यक

ना तू ना मी
ना नकार

हे दुतर्फी
तरी कसे

अचानक
गेलेला कंट्रोल

आणि खरे ते
घडणे परस्पर

सुखदु:खे
ज्याची त्याला

लखलाभ
विना मालकी

किती किती
भूतकाळ

हे अप्रस्तुत
या क्षणात

--- ००० ---

कहाणी

आपली कहाणी सांगेल
सगळेच आभासी असल्याने
काहीच नसण्याची यशोगाथा

ती सांगेल मतांच्या अवडंबरामुळेच
तयार झालेले पाताळयंत्री लपाछपीचे जग
जे या जगाच्या नाकावर टिच्चून
उपभोगते गुप्त जगणे
उघडाइतक्याच प्रभावीपणे
आभासी आणि नसलेले

आपली कहाणी उघड्या पाडेल
अनुरूपतेच्या मर्यादा
आणि सर्वमान्य तुरुंगांतून
फुटून निघण्याचे
अविरत नाइलाजाचे खोटेपण

आपल्या कहाणीची स्वप्ने असतील
कधीतरी उघड होण्याची कधीतरी
झेंडा फडकावण्याची अनैतिक बंडाचा

आपले हेतू निर्मळ पण अपराधी असतील
सापडलो तर विध्वंस करणारे असतील
बिचाऱ्या बऱ्याच आभाश्यांचा

एकमेकांना अडवत आपण कसे पोचलो
या निर्मनुष्य स्वर्गात हे खूपच
सनसनाटी असेल आणि
नाही नाही म्हणत झालेले तुझे समर्पण

तुलाही कळलेय आता आपल्या कहाणीचे इंगित
जे असणार जगाच्या आवाक्याच्या बाहेर
आपली कहाणी असेल वा नसेल
पण आता नि:संकोचपणे एकत्र जगू कारण
आपण आता आत्मवंचनेस पुरेसे सोकावलेले आहोत
--- ००० ---

## रिस्क

कधी तुम्ही रिस्क घेता
कधी असते गैरसमजाची शक्यता
कधी तर बदनामीची
कधी असते अजामीनपात्र
अटक होण्याची
अब्रूचे धिंडवडे निघून
आयुष्यातून उठण्याची
वा देशोधडीला लागण्याची

अंदाजांवर चालते तुमची गाडी
सगळ्याच अंदाजांना आवश्यक ते ते
सगळे नसते तुमच्याकडे
तुम्ही कधी कधी अवलंबून राहता
विश्वासघाताच्या भीतीत
वा साध्याच अपयशाच्या आणि विवंचनेत

आपल्या प्रतिमा सर्वत्र तडकत जाण्याच्या

हेतूपूर्वक तुम्ही
टाकलेले असतात डाव
आणि नंतर तुम्हाला वाटते
चुकलेच ते

कधी कधी तर काहीच न करता
तुम्हाला वाटते चुकतेय काहीतरी
अर्धवट वाटतेय

तेवढ्यात बातमी येते
जगबुडी नदीने ओलांडलीय
धोक्याची पातळी

तुम्ही नि:श्वास टाकता आणि
त्या नदीचे नाव ज्याने कुणी
हे ठेवले असेल
त्याचे तुम्ही मनोमन आभार मानता
--- ००० ---

लोखंड

लोखंडाच्या अंगाला घाम कसा येईल
पटत नाही
तुम्ही बातम्या सांगताय
की विमानात बसून चकाट्या पिटताय

तुमचे पूर्वज सगळे
पिटात बसून शिट्ट्या मारत
तेव्हा समजा झालाच बाहेर
सूर्योदय
तर तमाशातल्या नर्तकी
त्याला हळदकुंकू वाहात
आणि ससे सोडत हुंदडत उत्तेजक
अनुभव आणि साधना म्हणून
एकाच तिकिटात लोक पोचत ---
--- ००० ---

प्रेमच ....

आपल्यांत युद्धबंदी कधी झाली
ते कळलेच नाही त्याच वेळी
कदाचित
दिलजमाईही झाली असावी
छान वाटतेय
आता भीती नाही
प्रेमच म्हणू याला
हवं तर

आपली मते कुठे गेली
निर्धार आणि स्वभाव
कुठे गायब झाले
आपली घराणी कुठे लुप्त झाली
या सगळ्याचे भानच नाही राहिले
प्रेमच म्हणू याला
हवं तर

तुला हार्ट प्रॉब्लेम असेल
मला कॅन्सर
मी शंभरीत असेन
तू पन्नाशीत
या नुसत्या झाल्या
कागदी नोंदी
गरज नसलेल्या
प्रेमच म्हणू याला
हवं तर

तू एकाकी मी वैफल्यग्रस्त
तुझ्या समस्या घोर
माझ्या अफाट
अंतर खूप असूनही एकाच क्षणात
सगळे मिळून प्रतिमाच एक
जणू काल्पनिक
आपल्या इच्छेबाहेर नकळत
प्रेमच म्हणू याला हवं तर .....
--- ००० ---

पुतळा

सारकता साटे कणकाटा विसते
पराह विसते किणण विरणा तिसते
बक्स सिमदळ विघणण पिसते
जांब तीह

व्हीपी व्हीपी वपते तेड मकता
चाब चाब चिमगे एल पेगा
वादड वादड
फिरकाज

झिणण बांत मारुगी
पीखण बुंद रिकडा
साटे साटे
सांद

वंच घंच बलुनी
रिंघ टंघेन बाणी
अदमत विसदे
सांक जिल्हे बिरंगटे

वास्तगीर मालगंगे
परतिभे झिरकत बिनजमुरकी
सनमत बिरगी
साटे साटे

यमतारवामटा स्वमार पेठा
दिठी मस्त बांगूर चिमटा
बेह बेह
क

गाटे काटे बिरडा
पिन्न उदास मेळा
झिरकुटा
झिगण झिगण पुतळा
--- ००० ---

अनपेक्षित

ननग सैतेक
स्वल्प स्वल्प कन्नड बरतद
झळका माडिद्येनू
उटा माडिद्येनू
नानु होगतिनि
यल्ला छलो अद
निनग बरुदिल्ला
हिंग याक माडतिरी
कुडरी कुडरी
नानु माताडतिनी
नीनू माताड ब्याडा
ना हेळतिनि

हे असे अवशेष
माझ्या बालपणातले
ज्यांचा नक्कीच असणार
काही ना काही परिणाम
माझ्या आजच्या जगण्यावर
माझ्या स्वभावावर
तुमच्याशी माझे
पटण्या न पटण्यावर

तुम्हालाच काय
मलाही नाही कळणार
कशामुळे काय होतेय ते

ते कन्नड मित्र अजून आठवतात
आणि तो तीव्र उताराचा रस्ता
सायकलसाठी बेष्ट
आणि ती तास बावडी
प्रचंड आणि हिरवीगार
आणि शेजारीच एसटी स्टँड

मी काही अनपेक्षित वागलो तर ते
तुमच्या भाषेच्या अज्ञानावर ढकला
--- ००० ---

## तपन

समजा माझे नाव तपन असते
तर मुंबईत राहून
मी झालो असतो कम्युनिस्ट
आणि म्हटला असता
हनुमान चालिसा किंवा
समाजवादी होऊन गेलो असतो
खंडोबाच्या दर्शनाला

वाऱ्यावर उडणारे चुरमुरे
मी सहज पकडले असते
एका हाताने आणि अचंबित होत
लोकांनी उधळले असते माझ्यावर
अनुमोदनयुक्त ठरावांचे
सोनेरी कपटे

माझ्या कपटाला
लोकांनी म्हटले असते धूर्त डाव
आणि मी झालो असतो एक
अनभिषिक्त जातवादी
मी फारसे वाद न घालता
असे जगून दाखवले असते
की माझ्यामुळे वा माझ्यावर
लोकांना वाद घालावे लागावे
धबधब्यात भिजत

माझे नाव तपन असते
तर मी वेगळाच कुणी असतो
मग त्याची बाजू लढवत
मी केला असता अभ्यास
आकाश कसे फाटू शकते याचा

माझ्याच प्रतिमेचे दोन तुकडे करून
दोन्ही परिपूर्ण म्हणत एकमेकांशी
लढत राहिली असती माझीच दोन
जुळी मुले
--- ००० ---

भाई

आमची धुवांधार
मारामारी चालू असताना कुठूनतरी
आई आली धावत आणि मला म्हणाली
रुक जाव विजय
यह राकेश तेरा भाई है
आईवर आमचा दोघांचाही विश्वास होता
आणि तीच आपली आई असल्याचे
आम्हाला दोघांनाही माहीत होते

आमच्यांतल्या शत्रुत्वाची कारणे
तशीच असूनही लगेच
आम्ही गळाभेट घेतली
आणि पुढच्याच सीनमध्ये आम्ही
चालून गेलो राकेशच्या बॉसवर

लो मै आ गया हूं बख्तावर
बाहर निकल मी आरोळी दिली
माझ्याबरोबर राकेशला पाहून
तो प्रचंड संतापला
याने माझ्या पाठीत खंजिर खुपसला
असे म्हणत त्याने एक
एनर्जीची गोळी घेतली

दुष्टपणा करणे सोपे नसते
खोटे सांगून इतके दिवस
त्याने आम्हाला झुंजवले होते

ते पाहून लोक म्हणाले नको ही
रक्तलांछित मारामारी त्यापेक्षा
हेच सगळे करत
गुण्यागोविंदाने नांदू
लोकशाहीत
--- ००० ---

नंदनवन

काय झाले ? तुम्ही म्हणत होता की आठ दिवसांत संपेल सगळे आणि तुमची पिल्ले तर म्हणत होती, चारच दिवस ! असे नसते होत. आम्ही गेलोय यातून. आम्ही अनुभवी आणि परिपक्व आहोत. त्यामुळे, मनातल्या मनात हसलो फक्त आम्ही. आता, असे आतल्या आत हसणे म्हणजे युद्ध थोडेच असते ? पण तरीही तुम्ही गरजलात, कुणी मध्ये पडाल तर याद राखा – जगाची राखरांगोळी होईल. पडलो का आम्ही मध्ये ? तसे पडावेही नाही लागत. आमची सगळी राजनीती प्रेमावर आधारित असते. प्रेम आणि शांतता. आता काही आपले जिवाभावाचे, आपल्या प्रेमाचे मित्र असतात. वेळप्रसंगी त्यांना मदत करावीच लागणार ना ! आम्हाला  सगळीकडे प्रेमच हवे आहे पण तसे असू नाही शकत ना. आपल्या मित्रात आणि तिसऱ्या कुणात द्वेष असू शकतोच ना. मग आपण शांत राहून त्याला मदत करायची, इतकेच. आपल्या डोळ्यांदेखत त्याचा नाश आपण बघत कसे बसणार ? मध्ये न पडता शांत राहायचे पण सहानुभूतीने जमेल ते सगळे करत राहायचे, दुसरे काय करणार ? जगाच्या कल्याणासाठी आम्हीही करतो युद्धे पण कायमचा विजय असे काही नसते, हे आम्हाला समजते. हे समजणे म्हणजेच शांततेच्या दिशेने जाणे. आम्ही फक्त पुरेसा विध्वंस करतो आणि थांबतो. पृथ्वी आपली सगळ्यांची आहे, तिचा नाश होता कामा नये, हे तत्त्व सतत आमच्या मनात तेवत असते.

तसे तर आम्हाला तुमच्याबद्दलही प्रेमच वाटते. कोणताही धर्म घ्या किंवा तत्त्वज्ञान घ्या, वेगळी मते आणि वेगळ्या विचारसरणी यांसाठी युद्धे करा, माणसे मारा, असे सांगितलेय का कुठे ? पण याही सरळ साध्या समजुतीचा अनादर करणारे काही असतात. जुमानतच नाहीत ते. एककल्ली, हट्टी आणि मूर्ख असतात ते. एकूण मानवजातीचे हित लक्षात घेऊन काही करावे लागतेच मग. आता तुम्हाला वाटत असेल की आम्ही घातक आहोत, हुकूमशहा आहोत, पण, आम्हालाही तुमच्याबद्दल तेच वाटते, हे समजून घ्या. वन ट्रॅक माइंड नका ठेवू. जगाची समजूत ही एकरेषीय नसते. हजारो घटक असतात समोर. एक प्रकारे, तसे तर, तुम्ही वेडेच आहात. आपले तत्त्वज्ञान बरोबर आहे म्हणजे त्याला धरून आपण जे जे करू ते बरोबरच असणार अशी तुमची श्रद्धा आहे. यालाच आम्ही च्यूत्येनंदनगिरी म्हणतो. माणसाचे मनच करप्ट असते तर त्यातून अंतिम असे काही कसे अवतरू शकेल – हा साधा प्रश्न न पडणारे बाजारबुणगे नंदनवनाच्या कल्पना करत बसतात. जे कधीच कुणालाच शक्य होणार नाही त्याच्या मागे धावत राहतात. आम्ही तसे नाही करत. शांतताच महत्त्वाची हे आमचे ठरलेले आहे. आम्ही सगळ्यांच्या सगळ्या यंत्रणा समजून घेतो, त्यामागाचे असंख्य हेतूंचे जंजाळ समजून घेतो आणि आपल्याला आणि जगाला नुकसानीचे काही घडू नये, अशा व्यापक आवाक्यातून कृती करतो.

एक लक्षात  घ्या. तुम्ही कसेही, कितीही चांगले वागलात तरी काही झिंगूर लोक सतत तुमच्यावर टीका करणारे असणारच. जमल्यास शांतपणे त्यांचे जगणे मुश्किल करावे किंवा शक्य तितके दुर्लक्ष करावे त्यांच्याकडे, बास. आम्ही मानवी हक्कांचे आणि मानवी स्वातंत्र्याचे भोक्ते आहोत. दृष्टिकोण विशाल हवा, औदार्य हवे. आता तुम्हाला वाटेल की त्यांचे माध्यम वापरून आम्ही तुमच्याशी युद्ध करतो आहोत. तुम्हाला एक सांगतो, सगळे मनाचे खेळ असतात. पण एक मान्य आहे की त्यांतले काही खेळ खरे धरून वागावेच लागते.

हे सगळेच मनांचे खेळ आहेत असे आपण सगळ्यांनीच पूर्ण पाहणे हे तर नाहीच ना घडू शकत !

--- ००० ---

फोटो

वाट पाहणे
एक तर माझे वा तुझे
आणि मग भेटीचा योगायोग

गरज नसलेला हा पडदा
आता गेला तरी चालेल
हे तुझ्याच मनात
दाटून आले असणार

निसर्ग दाखवता दाखवता
नेमका तोच फोटो
शेवटी कसा आला
हमखास फुटणारा अणू

आकाशाला आकार
देणारे
तुझे मुसमुसते असणे
म्हणजे
असंख्य इमारती जमीनदोस्त
आणि सर्वच स्मृतींची वाताहात
होऊन उरणे फक्त वर्तमान

हे घडणारच होते
लोटला ना आता पुरेसा काळ

आणि तरीही पण
बंधने सगळी
गेली तरी
राहूनच जातेय
आकाशाला स्पर्श करणे
--- ००० ---

होकार

काही बोलायचे होते
तेवढ्यात तुझी ट्रेन चुकायची वेळ झाली
म्हणून मग फोनच्या टॉवरवर चढून
तुझी चाल पाहात राहिलो
मग बोलण्या ऐवजी
सौंदर्यच स्वीकारून
आढेवेढे न घेता
सरळ घर गाठले
म्हटले आता तरी
होकार भरून आणशील तू
भरून आलेल्या आकाशातून
--- ००० ---

न कळणे

कविता पोचावी
पण कळू नये
म्हणून मी विचार टाळतो

थांबणारी कविता
गुंताडा करून
गोंधळात पाडते
बसल्या बसल्या
वेडा होतो माणूस

हा गुन्हा
कोणताही शिंपी
कबूल नाही करत
पण खिशात विचार सापडतात
आणि तो पकडला जातो

या कवितेच्या कुणी
नादी नाही लागत
ही खूनी असो की अनैतिक
ही मुळात
दिसतच नाही

शब्द असूनही
अस्तित्वातच नसते ही
वाचणारे म्हणतात
ना लय ना भावना
नुसतीच भीती
च्यायला असण्याची

ते पुढे म्हणतात
कविता आपली वाटायला हवी
आधीच अनुभवात असलेली
ओळखीची सवयीतली
आणि रमवणारी आणि
वाह म्हणावे अशी
--- ००० ---

मृत्यू

विचारसरणीचा मृत्यू
संहितेचा मृत्यू समीक्षेचा मृत्यू
लेखकाचा मृत्यू
वाचकाचाही होऊ दे घाला तोही
मरू दे
हे सगळे कळते पण

स्वच्छंदतावाद आधुनिकतावाद
उत्तर वा उत्तर उत्तर आधुनिकतावाद
वास्तववाद अतिवास्तववाद अस्तित्ववाद
दादावाद ठसेवाद
हे तरी लागतेच जिवंत
नाही तर अभ्यास कसा करणार
विद्वत्ता कशी जमवणार
डॉक्टरेट कशी मिळवणार

कवितेचे लेबल कळले
की कविता कळलीच समजा
हेही पडतेय आता खोटे

खूप वाचावे लागते
हे तर
जगण्याच्या रेट्यानेच खोटे पाडलेय

लेबलांना मुका
खूप वाचनाला मुका
घाबरू नका

सत्य वाट पाहतेय
घ्यायला तुमचा मुका

दे मला मुका चंद्र सुका
झाड फिके फांदीवर धुके झुके
गद्याच्या वळणावर
चालीचे पद्य फुके
--- ००० ---

नित्य

थोड्याफार फरकांच्या काळ्या
शेडस अंधारे कोपरे आणि जखमी मेंदू
हेच रंगवत बसलेत शेकडो कवी
दुर्बोध असण्याचा प्रश्नच नाही
वाचायच्या आधीच
कळलेली कविता एंजॉय करायचीय फक्त

सत्ता अमानुष माणसे
विश्वासघातकी छळ करणारी
विभूतिभक्त असून
धर्मभक्तांना हेटाळणारी

सगळ्यांकडे सर्व प्रश्नांवर
उत्तरे असूनही
कुणीच कुणालाच न विचारणारे
आपापल्या मनांच्या
तुंबड्या भरण्यात मश्गूल

काळी संस्कृती होतेय समृद्ध
पारितोषिकांचे खच घरोघर

याला कंटाळून मेकप केलेल्या
सुंदर स्त्रिया गर्दी करताहेत
भावकवींच्या वस्त्यांवर
तिथे लाभताहेत त्यांना
गोड गोड अश्रूंचे उत्तेजक स्राव

काळे कवी होताहेत अधिकच उद्विग्न
मादक द्रव्यांचे अनुभव
करताहेत त्यांच्या कवितांना
अधिकच समृद्ध आणि आतून खोल

सगळे आहेत बिचारे सत्प्रवृत्त
श्रेयस प्राप्तीसाठी कार्यरत
नित्य परिवर्तनवादी
--- ००० ---

इटालियन जॉब चा शेवट

कोरला गेला होता आधीच मनात
आणि आता नाही माहीत
नेमके तेच कसे घडतेय
आयुष्यात आधीचे काहीच माहीत नसलेले

मी आहे जीत ती बस
चाक निसटल्याने गेलीय दरी कडे
तोल सावरला गेलाय
समोरचा भाग दरीकडे
आणि मी विरुद्ध दिशेला
संयमाने तोल सावरत

समोरच्या बाजूला सोनेच सोने
हे काही लुटीचे नाही
कसे आले इथे ते माहीत नाही
इकडे मी एकटाच आहे
कुणीही साथीदार नाहीत

सोन्याच्या दिशेने एक पाऊलही टाकावे
तर तोल बिघडून बस जाईल दरीत
माझ्यासह आणि सोन्यासह
मला तर जगायचेय आणि सोनेही हवेय

विचाराला खूप वेळ आहे उपलब्ध
हाती न लागणारे सोने बघत

ते सोने जिवंत आहे
ते एंजॉय करतेय
माझे त्याच्या मोहात असणे

आणि अचानक मी म्हणतो स्वत:शी
वा सुचतेय मला एक युक्ती
आणि तिथे सिनेमा संपतो हा इटालियन जॉब

पण मी अजून तिथेच आहे

--- ००० ---

जीवनगौरव

बुद्ध म्हणाला सॉरी
ते उत्तर आधुनिक मला नाही येत
तुमची दु:खमुक्ती करायला
तुम्हाला वेगळा तुमचा बुद्ध लागेल

आम्हीच ते विखंडित विदीर्ण
विस्कळित विभक्त
आम्ही नाही होऊ शकत
कुणाचेच भक्त

आमचे मेंदू फुटलेले आहेत
फुटण्याची
प्रत्येकाची शैली वेगळी आहे

परांपरावाले येडे होते
एका सरळ मनाने प्रेम शौर्य
आणि परिवर्तनाची बावळट
दिशा पकडू शकणारे

मॉल्स आणि संगणक तर सोडाच
आमच्या एका एका तुकड्याला
हवी असते वेगवेगळी प्रेयसी
घटस्फोटांची नाही आम्हाला अलर्जी

आम्ही लिहितो त्या कविता
कुणासाठीही नसतात
आम्ही एकेकच इतके असंख्य असतो
तर ती कविता आमच्यासह कुणालाही
पोचणार तरी कशी

लिहून होताच फाडून टाकतो आम्ही
आमच्या कविता आणि भिरकावतो ते कपटे
प्रदूषित हवेत जीवनगौरव द्यावा
रंगीत चिंध्यांचा बाँब उडवून तसे
--- ००० ---

## गेला तो काळ

गेला तो काळ सहा सहा महिने
बागेत फिरत
मेलडी करत बसण्याचा
आता ढाण ढाण संगीत वाजेल
त्या बधीर हवेत
करून घ्यायचा संभोग
हो तर हो म्हण नाही तर नाही

स्त्रीची फक्त शुचिता आणि पुरुष
जातिवंत अपवित्र
असे समजून तिला
मनवत बसायचा काळ
झाला आता इतिहासजमा
हो तर हो म्हण नाही तर नाही

एक तर संख्या खूप आहे
आणि प्रत्येकच आहे प्रॉब्लेमपरिप्लुत
कुणीच नाहीय
परिपूर्ण प्रतिसाद देऊ शकेल असे
कुणीच नाहीय खास महत्त्वाचे
हो तर हो म्हण नाही तर नाही

गूळ काढत बसणे
म्हणजे काहीतरी खास
अपवादात्मक मिळवण्याचे प्रयत्न
कुणाची बालपणे कशी गेली
कुणात कशा आहेत विकृती
आणि कोण होऊ शकेल हिंसक
हे नाही माहीत
हो तर हो म्हण नाही तर नाही

विद्युत नसेल तर डीझेल बघ
तेही नसेल तर लाकडे बघ
गया सो गया चल उरक लौकर
हो तर हो म्हण नाही तर नाही
--- ००० ---

अवडंबर

माझ्याही डोक्यात असतातच ना
बरोबर-चूकचे आडाखे
आणि माझ्या फायद्याचे बडिवार
जे मला माहीत असते आहेत
ब्रेक नसलेले अवडंबर
सदोदित तयार असणारे
मरायला वा मारायला

या मूर्ख खेळातून
सुटून जाण्यासाठी
मी बोलतो सुखदु:खांबद्दल
स्वप्नांबद्दल आणि भासांबद्दल
जे खेळत असतात सर्वांतच
कधी उघड कधी गुप्तपणे

मी बोलतो विकृतींबद्दल
ज्या असतात असंवेदनशील
आणि लपवलेल्या
नैतिक अवगुंठनात

मी मते सांगण्या ऐवजी
सांगतो
आवाक्याबाहेरचा भूलभुलैया
जो घडवतो मतांचा नरक

मी काहीतरी लपवतो आहे असे समजून
काहीजण मला म्हणतात आपमतलबी
ढोंगी मध्यमवर्गीय कुंपणावरचा आणि निर्लज्ज
--- ००० ---

तिजोरी

तुला मी ओळखतच नसताना
तू कशी आलीस स्वप्नात
हे जरी कळलेच नाही तरीही
नंतर तू आलीस प्रत्यक्षातही
हे मात्र मी
माझ्याबाहेर जाऊ दिले नाही

मी शिताफीने बंद केले
तुझ्याही मनाचे दरवाजे
चाखवत तुला
मी निर्मिलेल्या
गुप्त झऱ्याचे पाणी

ते पाणी होते एक
गुप्ततेचा खजिना
नुसते धुंद करणाराच नव्हे
तर विस्मृतीतही नेणारा

हे तुला कळेपर्यंत आपोआप
तू सरावली गेली होतीस
या जगाबाहेरच्या अंधाराला

आता तुलाही बाहेर नव्हते पडायचे
या नसलेल्या जगातून कारण
असल्याचे नाही करण्याची ही गुप्त जादू
सतत भारून टाकत होती तुलाही
जणू माझ्या मनाची आज्ञा असल्याप्रमाणे

आता डावपेच राहिलेच नव्हते
तुला काही थांबवायचे नव्हते
आणि मला काही कंट्रोलही
करायची गरज नव्हती

सगळे सेफ चालणार होते
आपल्या अमर्याद आभासी तिजोरीत
--- ००० ---